म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे

विषय नाटक

दा क्र ८८०

IRBK-0100880

IRBK-0100880

IRBK-0100880

ग्रं. क्र. ८८०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

प्रकाशक
धों. त. चिवटे
मालक—मनोहर स्त्री सं. मंडळी,
मिरज.

[ सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन ]

मुद्रक
अनंत सखाराम गोखले,
'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें.

राजेश ग्रंथसंग्रह नं.

# पदक्षेपापूर्वी

'पराक्रमाचा पाया' हें छत्रसालकालीन ऐतिहासिक नाटक मनोहर स्त्री संगीत नाटक मंडळीनें आपलेपणानें रंगभूमीवर आणलें आहे. या नाटकाची उभारणी 'गृहयुद्धाचा शेवट होऊन बेकीचें बलिदान केल्याशिवाय कोणत्याही राष्ट्राला स्वातंत्र्य मिळत नाहीं'; या ऐतिहासिक तत्त्वावर केलेली आहे. बेकीचें बलिदान हाच पराक्रमाचा पाया होय. हें नाटक रंगभूमीवर आणण्याचे कामीं श्री० बाळासाहेब चिवटे, यांनीं मला उपकारी करून ठेविलें आहे. रा० रामभाऊ केळकर, यांनीं पदांच्या चाली देऊन स्नेह-संवर्धन केलें आहे. रा० अनंतराव ऊर्फ आप्पासाहेब गोखले, यांनीं मुद्रणाच्या कामीं आपलेपणा दाखविला आहे. त्यामुळें वरील सज्जनांचा मी कृतज्ञतापूर्वक ऋणी आहें. पदक्षेपापूर्वी इतकेंच पुरें !

मुंबई—मौज कचेरी
७-१०-१९२९

सर्वांचा नम्र
लेखक

IRBK-0100880

संगीत

# पराक्रमाचा पाया

[ पृष्ठ ३३ वरील " कधीं बरें हे ताळ्यावर येतील ? " या भाषणानंतर—]

[ पद. ]

**काय ही हौस बाई ॥ सदा स्त्रीपणा रुचे ॥**
**पौरुषभाव सोडोनी ॥ शृंगारता सुचे ॥ १ ॥**
**बुडविती राजविभवा ॥ लौकीक सारा नुरे ॥**

## प्रवेश पहिला

[ **स्थळ**—वीरपुरुषाची समाधि. ]

**छत्रसाल**—पिताजी, वीरपुरुषांचा आशीर्वाद तरुणांच्या देशभक्तीला मिळाला हा शुभयोगच नव्हे काय ?

**चंपतराय**—बेटा, वीरांचा आशीर्वाद, पूर्वजांची पुण्याई, हरघडी तरुणांच्या अंतःकरणांत उत्साह आणि ओज उत्पन्न करीत असते. छत्रपूरच्या स्वातंत्र्या- करितां ज्यांनीं अलौकिक स्वार्थत्याग केला, परक्यांचे हल्ले परतविले, मातृभूमीचें

नवचैतन्य येत नाहीं. औरंगजेबाचें परचक्र छत्रपूरवर येत असतांना नुसता विचार करून तें परतवितां येणार नाहीं. तत्त्वज्ञानानें ज्याप्रमाणें व्यावहारिक समाधान होत नाहीं, त्याप्रमाणें नुसत्या तरवारींच्या कोरड्या तत्त्वज्ञानानें परक्या शत्रूचें परचक्र परतावितां येत नाहीं.

**विजया**—ऐकलंसना दादा! शब्दशूरांची नेहमीं अशीच विटंबना होत असते.

**छत्रसाल**—माझ्या मर्मावर घाव घालण्याची संधि केव्हां येते याची तूं वाटच पहात होतीस अगदीं.

**सेवक**—(मुजरा करून) सरकार, मोठा आणीबाणीचा प्रसंग आहे. औरंगजेबाच्या एका टोळीनें सरहद्दीवरच्या एका खेडेगांवाची अगदीं धुळधाण उडविली, आपल्या गरीब रयतेची तिनें अमानुषपणें कत्तल केली! स्त्रियांच्या अब्रूचे धिंडवडे केले! यामुळें तमाम रियासतीला असें वाटूं लागलें आहे कीं, बुंदेलखंडाचें स्वातंत्र्य आज नष्ट झालें; मातृभूमीची इभ्रत आज नाहींशी झाली! छत्रपूरची राजलक्ष्मी आज परक्यांच्या गोटांत गेली सरकार! अशा वेळीं, जर आपण स्वस्थ बसाल तर तमाम बुंदेलखंड परक्यांच्या हातांत जाऊन त्याच्यावर पारतंत्र्याचा शिक्कामोर्तब होईल!

**चंपतराय**—चक्रधर, नको; तुझी ही करुण कहाणी सांगूं नकोस. तुझ्या ह्या करुण कहाणींनें या वृद्धाच्या अंतःकरणाची नुसती कालवाकालव झाली आहे. हा चंपतराय बुंदेलखंडांत जिवंत असतांना परक्या शत्रूंनीं त्याच्या रियासतीवर अशी जुल्म जबरदस्ती करावी, ही त्याच्या क्षात्रतेजाला कमीपणा आणणारी गोष्ट आहे! आतांपर्यंत या चंपतरायानें परक्यांना धूळ चारली आहे. त्यांचीं समृद्धशाली सिंहासनें नेस्तनाबूत केलीं आहेत. असें असतांना दख्खनचा सुभेदार आपल्या रानटी फौजेसह हल्ला करतो, ही छत्रपूरच्या विमल कीर्तीला कलंक लावणारी गोष्ट आहे. छत्रसाल, लढाईचें रणशिंग फुंक! छत्रपूरच्या तमाम रियासतीला स्वातंत्र्याचा रण-संदेश कळीव. बुंदेलखंडांतील स्त्रियांच्या रक्षणाकरतां थोडेंसें सैन्य ठेवून बाकी सर्व सैन्य आघाडीवर पाठीव.

**विजया**—बाबा, बुंदेलखंडांतील स्त्रियांचं संरक्षण करायला ही तुमची विजया एकटी समर्थ आहे. रजपूत वीराप्रमाणें रजपुतांच्या स्त्रियादेखील आणीबाणीच्या प्रसंगीं हातांत शस्त्र घेऊन मातृभूमीच्या स्वातंत्र्याकरतां लढत असतात.

[ सर्व जातात.

## प्रवेश दुसरा

[ राग-तिलककामोद; ताल-त्रिवट.]

**निज देशा सुयशा मिळत रणीं ॥ रणरागिणी जय जनीं शुभ वाणी ॥ ध्रु० ॥ विलसे वैभव वाढवी गौरव ॥ रणव्रत शुभकर मानी योपा ॥ १ ॥**

[लढाईचीं रणशिंगें वाजतात.]

**शृंगार**—काय भलत्याच वेळीं लढाई निघाली ही ! मी माझ्या शय्यागारांत विप्रलंभशृंगारमंजरीसारखा पोषाख करून, स्त्रियांचे हावभाव करीत होतों. माझ्या केंसांचा संभार कसा खुलून दिसेल, म्हणून निरनिराळ्या पुष्पांनीं मी तो शृंगारीत होतों. माझ्या कोमजलेल्या गालांना टवटवी आणण्याकरतां हें नवीन चूर्ण लावण्याच्या बेतांत होतों. डाव्या पायांत तोरड्या घालून त्यांच्या मंजुळ नादांत मी अगदीं गुंग होऊन गेलों होतों ! अशा वेळीं एकाद्या अरसिकाप्रमाणें हें लढाईचें रणशिंग कोणीं फुंकलें ? आतां माझा शृंगारसाज कसा पुरा होणार ? स्त्री-वेषांत मी तुझ्यापेक्षां कांकणभर जास्त आहें, हे मी माझ्या गृहलक्ष्मीला पटवून देणार ! छेः, छेः ! राजे लोकांनीं लढाई करायची म्हणजे काय ? राजांचा जन्म लढण्याकरतां असतो हें जर कोणीं मला जन्मापूर्वीं सांगितलें असतें तर आज माझ्या शृंगारसाजाचा हिरमोड कधींच झाला नसता. (पुन्हा लढाईची नौबत वाजते.) अरेरे ! अरसिकपणाची कमाल झाली ! हा लढाईचा कर्णा पुरुषी आवाजाचा दिसतो. हें लिंगांतर अगोदर बंद केलें पाहिजे. मीं माझ्या महालांत याला सुरवात केलीच आहे. मी राजासारखा राजा, पण राणीसारखी राणी झालों आहें ! राजानें राणी होणें यांतच खरा राजेपणा आहे !

**प्रीति**—( प्रवेश करते. ) इकडचे हे विचार ऐकले म्हणजे असं वाटतं, कीं आपण राजकुलाला काळिमा लावण्याकरतांच अवतार घेतला आहे कीं काय ?

**शृंगार**—काळिमा ? कुठें आहे...... मी तर गालांना गुलाबी चूर्ण लाविलें आहे !

**प्रीति**—अहो, तो काळिमा नाहीं, कुळाला काळिमा—

**शृंगार**—काळिमा-याचें अगोदर लिंगांतर कर. मला लिंगांतराची अतिशय हौस आहे. इतकेंच नव्हे तर माझा असा आग्रह आहे. शृंगाराचे लिंगांतर हा त्याचा विशेष आहे. काळिमा म्हणूं नको !

प्रीति—जळो तुमचे लिंगांतर. तुमच्याशीं लग्न करून मला पुरा पश्चात्ताप झाला आहे.

शृंगार—हा तर माझ्या कीर्तीत भरच आहे. अग, माझें सारें बालपण शहाजहान बादशहाच्या जनानखान्यांत गेलें. मी जरी आज धारीरचा राजा असलों तरी दिल्लीच्या तक्ताचा हुजऱ्या आहें. यवनी वेषांत आणि त्यांतल्या त्यांत यवनी स्त्री-भूषणांत जन्मभर असा अभिनय करावा तुझ्या स्त्रीकरणी पतीचें आद्य कर्तव्य आहे. मर्दानी अलंकारांचा मला पहिल्यापासून कंटाळा आहे. माझें हें जनानी ध्यान पाहून तुला आश्चर्य वाटेल; पण मला त्यांतच समाधान वांटतें आहे, प्रीति, माझें हें स्त्रीकरण पाहून मी आज शहाजहानची मुमताज झालों आहें, असें मला वाटतें.

[ कवाली.]

**सुख खरें खरें मज हें वाटे ॥ करी प्रफुल्ल वेष हाच**
**नित स्वांता ॥ महिवरी वीरा खरा नव प्रेमानें ॥ १ ॥**

प्रीति—अहो, तुम्ही धारीरचे राजे ना ?

शृंगार—मग नाहीं कोण म्हणतो ? मी राजाच आहें.

प्रीति—मग असं भलतंच काय करतां ! तुमचं हें ध्यान पाहून, मेलेल्या माणसालाही तुमचं राजेपण पटणार नाहीं.

शृंगार—आम्हां दिल्लीश्वराच्या मांडलिकांचें राजेपण हें असेंच आहे. 'सेवा करूं नका !' असें म्हणून सर्व प्रकारची सेवा करणें हीच आमची राजनीति आहे. मांडलिकाच्या नशिबीं याशिवाय दुसरें काय बरें असणार आहे ?

प्रीति—राजेपण म्हणजे ईश्वराचा अंश ही कल्पना जर आज धारीरच्या प्रजेंत नसती तर तुम्हांला राजेपद कधींच मिळालं नसतं.

शृंगार—कां मिळालें नसतें ? राजा म्हणजे प्रजेचा सेवक असें तूंच मला शिकवलें होतेंस ना ? मग असा माझा पाणउतारा कां बरें करतेस ?

प्रीति—तुमच्या अंगांत पाणीच नाहीं, तेव्हां मीच काय; पण सर्व लोक तुमचा पाणउतारा करतील.

शृंगार—प्रीति, भलतेंच बोलून या मर्दाचा असा अपमान करूं नकोस.

प्रीति—कोण मर्द ?

शृंगार—मी मर्द ! मी जवानमर्द ! मी मर्दमर्देश्वर शृंगार !

**प्रीति**—तुम्हांला मर्द म्हणवयाचं म्हणजे मर्दपणाची व्याख्याच बदलली पाहिजे.

**शृंगार**—बदलत्या परिस्थितींत सर्वांचीच अदलाबदल झाली पाहिजे. मी फार धोरणी, खरा मुत्सद्दी, खरा भविष्यवेत्ता म्हणून मीं सर्व बदललें आहे. पुरुषी वेषाला रजा देऊन ही अशी नखरेल नजर करून दिल्लीपतीची नजरबंदी करण्याचें मीं ठरविलें आहे. पत्नी जशी पतीशीं एकनिष्ठ असते त्याप्रमाणें मी दिल्लीपतीशीं एकनिष्ठ भावनेनें वागेन आणि हें कार्य माझ्याशिवाय दुसऱ्या तिसऱ्याला होणारच नाहीं. याला पिढीजात अक्कल लागते.

**प्रीति**—अहो अकलेचे खंदक ! पुरे करा हें शहाणपण आणि —

**शृंगार**—आणि काय करूं ! दरबारच्या नर्तकीप्रमाणें नाचून तुला खूष करूं ? ठीक आहे. राणीसाहेबांची आज्ञा मंजूर आहे !

[ गजल. ]

**हा गानवेडा गाई चाले झुले ॥ वीरास सोडोनी झालों कुलीनकालीमा ॥ दिलास दिल दिला हो निराश रामा ॥ जनानी चालुनी दावीत प्रेमी या भावा ॥ १ ॥**

**प्रीति**—आतां काय करावं तुम्हाला ! अहो, तिकडे लढाईचं रणशिंग फुंकलं, सर्व बुंदेलखंडांतले वीर जरीपटक्याखालीं एकत्र झाले आणि तुम्ही असा जनानी पोषाख करून एखाद्या नर्तकीसारखें नृत्य–गायन करीत आहांत, याची लाज नाहीं का तुम्हाला ?

**शृंगार**—लाज तर माझ्या नसानसांतून खेळत आहे ! विनयानें माझें सर्व शरीर पादाक्रांत केलें आहे. अंतःकरणाच्या सिंहासनावर जनानी वर्चस्व आरूढ झालेलें आहे. एखाद्या स्त्रींत जी लज्जा नाहीं ती माझ्यांत आहे. माझी शहामृगी चाल मीं पार बदलून, गजगति केली आहे ! दिल्लीश्वराची मेहेरनजर खेंचून घेण्यास हाच एक उपाय आहे ! ( पुन्हा नौबत वाजते.)

**प्रीति**—ती पहा, पुन्हा नौबत झाली. सारे वीर शस्त्रास्त्रांसह रणांगणावर जाण्याकरतां एकत्र झाले. जा–हा पोषाख काढून लढाईचा पोषाख करा ! हातांत शस्त्र घ्या आणि धारीरचं नांव राखा.

**शृंगार**—काय ? लढाईवर जाऊं ? छे, छे ! मी नाहींहो जायचा लढाईवर ! लढाई ही माझ्यासारख्याकरितां नाहीं. हें पहा, लढाईच्या आघाडीवर जाण्यापेक्षां

मी आपला तुझ्या पाठीमागेंच राहतों. तूं वीराचा पोषाख कर; आणि लढाईवर जा. माझ्या नांवाची किंमत तुला आहेच. तूं पराक्रम गाजव म्हणजे मला त्याचें श्रेय आपोआप मिळेल.

**प्रीति**—तें कांहीं नाहीं. मीच वीराचा पोषाख चढवितें आणि आपल्या हातांनीं तुम्हाला रणांगणावर नेऊन पोंचवतें.

**शृंगार**—किती निर्दय अंतःकरणाची बायको आहेस तूं! अग, नवऱ्याला निर्दयपणानें लढाईच्या मैदानावर खेंचून नेतांना तुला त्याची दया नाहीं येत? छे, छे! ज्यांना अशा बायका आहेत, त्यांचे पुरे पुरे हाल होत असतील! हें पहा प्रीति, मीं कांहीं दिवस जगावें असें जर तुला वाटत असेल, तर मला लढाई-वर पाठवूं नकोस.

**प्रीति**—लढाईवर जातां कीं नाहीं?

**शृंगार**—अग, मला गोषांत ने! बुरखा आण! पण लढाई नको! अग बाईग! लढाई! नको, प्रीति, या शृंगाराला लढाईचें वावडें आहे! आण, गोषा आण - बुरखा आण! मी जन्मभर गोषांत राहीन, जेव्हां लढाई संपेल तेव्हांच मी बुरख्यां-तून बाहेर येईन.

**प्रीति**—गोषांत दडून बसण्यापेक्षां लढाईच्या मैदानावर मेलांत तरी चालेल. नामर्दाची औरत म्हणवून घेण्यापेक्षां मर्दाची विधवा म्हणवून घेणं फार बरं!

**शृंगार**—मी स्त्रीसारखा तुझा पति जिवंत असतां तूं विधवा होणार? अग, तुला बायकोचं कांहींच का अंतःकरण नाहीं?

**प्रीति**—हजार स्त्रियांचीं अंतःकरणें तुमच्या अंतःकरणांत एकवटलेलीं आहेत.

**शृंगार**—शाबास! जय झाला! प्रीति, आज तुझ्या नवऱ्याचा जय झाला! शृंगारराज की जय! धारीर नृपती राजराजेश्वर स्त्रीकरणकुलावतंस जनानी मर्देश्वर की जय!

**प्रीति**—तुम्ही अशानं ऐकणार नाहीं! दौलती, अरे दौलती, इकडचा पोषाख आण पाहूं!

**दौलती**—( प्रवेश करून ) जी सरकार!

**प्रीति**—पोषाख चढवितें आणि अशी खेंचून लढाईवर पाठवतें—

**दौलती**—हा घ्या पोषाख. ( स्त्रीपोषाख घेऊन येतो.)

**प्रीति**—अरे! हा कसला पोषाख?. हा तर स्त्रियांचा पोषाख!

**दौलती**—महाराजांचा हाच अत्यंत आवडता पोषाख आहे.

**शृंगार**—हो, हाच पोषाख मला आवडतो. दिल्लीला जातांना हाच पोषाख मी घालीत असतों. घाल, हा स्त्री-पोषाख माझ्या अंगावर घाल आणि माझ्या वैभवांत भर घाल.

**प्रीति**—गप्प बसा. दौलती, लढाईचा पोषाख आण. (दौलती पोषाख आणतो, ती तो शृंगारचे अंगावर चढविते.) हं, चला आतां.

[ राग—मांड; ताल—गर्भा. ]

प्रीति—

**वीरव्रता घ्या या नाथा मान्यता ॥ ध्रु०॥**

शृंगार—

**रणभय भयद जाण हरील प्राण विपदा लोकां**

प्रीति—

**बोल हरति सुख लाज ना कांहीं कांता ॥ १ ॥**


---

## प्रवेश तिसरा

[ **स्थळ**—सभाकरणाचें शिबिर. ]

**सभाकरण**—चंपतरायानें माझा अपमान केला आहे, याची स्मृति अद्याप माझ्या अंतःकरणांतून गेलेली नाहीं. त्याचा सूड उगविण्याची मीं प्रतिज्ञा केली आहे! त्या प्रतिज्ञेप्रमाणें त्याचा पुरेपूर सूड घ्यावयाला हीच संधि आहे. दिल्ली-श्वराच्या विरुद्ध चंपतरायानें युद्ध पुकारलें आहे. अशा वेळीं दिल्लीश्वराला कुमक देऊन चंपतरायाला नेस्तनाबूद केलें पाहिजे. बुंदेल वीरांच्या विरुद्ध शस्त्र उपसून मी माझ्या अपमानाचा मोबदला पुरेपूर उगवणार! बुंदेल वीर गुलामगिरींत खितपत पडले तरी बेहेत्तर आहे; परंतु हा सभाकरण बुंदेल्यांच्या विरुद्ध सार्वभौम दिल्लीश्वराला मदत करणार! बुंदेल्यांचें स्वातंत्र्य गेलें तरी त्याची काडीचीही पर्वा नाहीं. हरप्रयत्नानें मी चंपतरायाचा सूड उगवणार!

**हिरादेवी**—सभाकरण, तुमचेच ना हे शब्द? 'चंपतरायाचा सूड उगवीन' ही सागरच्या सम्राटाचीच ना प्रतिज्ञा!



**दलपत**— उपसलेल्या तरवारीने याच क्षणीं प्रथम तुझाच बळी घेतों.

[ पृष्ठ १३

आहे ! बाबा, आपण जशी प्रतिज्ञा केलीत तशी मीही करीत आहें, ऐक, देशद्रोही सभाकरण ! या तरुणाची प्रतिज्ञा ऐक ! परक्या शत्रूंचा निःपात करण्यापूर्वी घरच्या शत्रूंचा निःपात करण्याची मीं प्रतिज्ञा केली आहे ! परके शत्रु पुरवले; पण घरचे शत्रु नकोत ! घरच्या शत्रूंना नेस्तनाबूद केल्याशिवाय ही माझी तरवार म्यान होणार नाहीं–या उपसलेल्या तरवारीनें याच क्षणीं मी प्रथम तुझाच बळी घेतों.

[ तरवार उपसून त्याच्या अंगावर धांवतो, इतक्यांत छत्रसाल येतो.]

**छत्रसाल**—दलपत, हें काय करतोस ? शत्रूचें रक्त पिण्याकरतां ताहनेलेल्या शस्त्राला आपल्या परमपूज्य पित्याचें रक्त पाजतोस ! अरे, हीच का तुझी पितृ-भक्ति ? सर्वांनीं एक होऊन परक्यांशीं लढायचें, कीं आपसांत लढून गृहयुद्धें करायचीं ? घे,–तें शस्त्र परत घे.

**दलपत**—युवराज, मला माझ्या प्रतिज्ञेपासून परावृत्त करूं नका.

**छत्रसाल**—कसली प्रतिज्ञा ?

**दलपत**—बुंदेलखंडांतील तमाम देशद्रोह्यांना नेस्तनाबूद करण्याची !

**छत्रसाल**—या प्रतिज्ञेपासून मीच काय; पण कोणताही वीर तुला परावृत्त करणार नाहीं ! पण त्याचा सभाकरणाशीं काय संबंध ?

**सभाकरण**—छत्रसाल ! तुझ्या आणि तुझ्या बापाच्या स्वातंत्र्याच्या लढ्याला मीं अडथळा आणण्याची घनघोर प्रतिज्ञा केली आहे.

**छत्रसाल**—कार्याला जितके अडथळे येतील तितकें चांगलेंच असतें. कार्याची यशःसरिता अडथळ्यांच्या खडकांतून नेहमींच वहात असते.

**सभाकरण**—म्हणूनच मी तुमच्या कार्यांत अडथळे आणणार आहें.

**दलपत**—युवराज, हें शस्त्र असल्या देशद्रोह्यांच्या रक्ताशिवाय म्यान होणार नाहीं !

**छत्रसाल**—तें म्यान करूंच नकोस ! असल्या देशद्रोह्यांना कंठस्नान घालावया-चें हें ठिकाण नाहीं. वीराला कंठस्थान घालायचें असेल तर तें समरभूमीवर–रणांगणावर ! सभाकरणाला ठार मारावयाचें असेल तर लढाईच्या मैदानावर चल. घरांत ठार मारून पूर्वींच्या या वीराचा असा अपमान करूं नकोस.

[ राग–दुर्गा; ताल–एक्का.]

**वीरवाणी भावना हरी नति क्षमा नता ॥ समरभूमी**
**खरी वीरासी काय विसरसी निदानीं ॥ युद्धनीति**
**नच त्यजितां अनुसरतां ॥ शौर्यद यश दान लाभ**
**धर्म न्याय मिळत साच धैर्यदानी ॥ १ ॥** [ जातात.

---

## प्रवेश चवथा

[**स्थळ**—हिरादेवीचें मंदीर.]

**विमलदेव**—छे बुवा ! असलें हें वीराचें शिक्षण मला मुळींच नको ! हे तरवारीचे पट्टे मला मनापासून आवडत नाहींत. आईसाहेबांचा फार आग्रह कीं, मीं वीर व्हावें ! पण वीराचें बाळकडू माझ्या पित्यानें मला पाजलेंच नाहीं. यो तरवारी आणि हीं शस्त्रें माझ्या डोळ्यांसमोर नकोशीं झालीं आहेत. ओरछाचें युवराजपद जर मला अशा शस्त्रांच्या पहाऱ्यांत मिळत असेल तर तें मला मुळींच नको आहे. हें शस्त्रग्रहण करण्यापेक्षां शस्त्रसंन्यास पत्करला ! ( तरवार फेंकून देतो.)

**हिरादेवी**—(प्रवेश करून) बालराजे, हें काय केलंत ! शस्त्र काय फेंकलंत ! अहो, तुम्ही ओरछाचे युवराज आहांत ना ! तुमच्यावर माझी भावी आशा अवलंबून आहे. बुंदेलाच्या वीरांना नेस्तनाबूद करण्याची सर्व करामत तुमच्यावर आहे. तुम्हांला वीरोचित शिक्षण देण्याकरितां मी प्रयत्न करीत आहें. विमलदेव ! ओरछाची स्वातंत्र्यलक्ष्मी तुमच्या समशेरीवर अवलंबून आहे.

**विमलदेव**—आईसाहेब, मला हें शस्त्र म्हणजे भयंकर वाटत आहे ! मला जन्मापासुन शस्त्राचें वावडें आहे. शस्त्राशिवाय, युद्धाशिवाय जर ओरछाचें युवराजपद मला मिळत असेल तर तें मला पाहिजे आहे. पराक्रम करून राज्य संपादन करणें यांत कांहींच अर्थ नाहीं.

**हिरादेवी**—बालराजे, असं वेड्यासारखं काय बरळतां ! तुमच्यावर माझी सर्व आशा अवलंबून आहे. तुम्ही माझ्या आशेचे आधारतंतु आहांत. ओरछाचे युवराज म्हणून मीं तुमची प्रसिद्धि केलेली आहे. माझ्याकरितां तरी शस्त्राचा संन्यास

करूं नका ! वीरासारखे वीर तुम्ही ! तुम्हींच शस्त्राचा त्याग केलात तर या वीराची वृत्ति ओरछाच्या प्रजेला कशी बरं कळेल ! बालराजे, तुमच्या कर्तबगारीवर माझे भावी मनोरथ अवलंबून आहेत. तुमच्या भावी पराक्रमावर ओरछाचं राज्यवैभव अवलंबून आहे. तुम्हीं माझ्या जिवाचे आशातंतु आहांत ! तुम्हांला वीरोचित शिक्षण देऊन, पराक्रमी बनवावं म्हणून ही तुमची माता जिवाचं रान करीत आहे. तुमचं आणि विजयादेवीचं एकदां शुभमंगल झालं म्हणजे माझे डोळे खात्रीनं निवतील.

**विमलदेव**—विजयेशीं माझें शुभमंगल !

**हिरादेवी**—हो ! चंपतरायाच्या त्या मानी पोरीशीं तुमचं शुभमंगल.

**विमलदेव**—त्या जहांबाज राजकुमारीशीं मी शुभमंगल करूं ?

**हिरादेवी**—त्याला काय हरकत आहे ?

**विमलदेव**—आईसाहेब, मी युवराज नाहीं ना ?

**हिरादेवी**—मग कोण आहांत ?

**विमलदेव**—युवराज्ञी ! मी युवराज्ञी आहें ! ओरछाचा मी युवराज नसून युवराज्ञी आहें.

**हिरादेवी**—बालराजे, काय बोलतां हें ? हें असं कुणीं ऐकलं तर लोक हंसतील ना तुम्हांला ?

**विमलदेव**—आईसाहेब, परवां विजया मला हंसली.

**हिरादेवी**—बालराजे, ती पोर काय म्हणाली आपल्याला ?

**विमलदेव**—ती म्हणाली, आपण युवराज म्हणवितां आणि असे युवराज्ञी-प्रमाणें काय वर्तन करतां ?

**हिरादेवी**—बालराजे, हें राजकारण मीं तुम्हांला पूर्वींच सांगितलं आहे. माझ्या पोटीं पुत्रसंतान नसल्यामुळें ओरछाचं राज्य नाहींसं होईल. माझ्या नाशीबी-चं ओरछाचं राजमातापद नाहींसं होईल; म्हणून मीं तुम्हाला युवराजपदावर अधिष्ठित केलं. ओरछाचे युवराज म्हणून तुमचं युवराजपद चंपतराय व त्याचा पोरटा छत्रसाल कबूल करीना, म्हणून त्याचा सूड उगवून दिल्लीश्वराच्या मेहेर-नजरेनं ओरछाचें युवराजपद कायम राखण्याकारितां मीं आटोकाट प्रयत्न चाल-विलेले आहेत. राजकारणांत याला पाप म्हणत नाहींत.

**विमलदेव**—पण ही सगळ्यांची फसवणूक होते आहे.

**हिरादेवी**—फसवणूक मुळींच नाहीं. हा राजकारणांतला एक खेळ आहे.

आज ना उद्यां तुम्हांला ओरछाच्या तक्तावर दिल्लीश्वराच्या मेहेरनजरेनं तक्तनशीन व्हावयाचं आहे.

**विमलदेव**—दिल्लीश्वराच्या मेहेरनजरेनं तक्त मिळतें ना !

**हिरादेवी**—होय. सार्वभौम सम्राटाच्या मेहेरबानीनं इन्द्राचं इन्द्रपद देखील मिळतं !

**विमलदेव**—मग मासाहेब, मीं मघाशीं शस्त्र फेंकून दिलें तें बरोबरच केलें म्हणायचें.

**हिरादेवी**—तें कसं, बालराजे !

**विमलदेव**—मोठ्यांच्या मेहेरबानीनें जर छोट्यांना मोठें होतां येतें, तर मग त्यालीं कर्तव्याची आणि पराक्रमाची नाहक उठाठेव कशाला ?

**हिरादेवी**—राजे, अद्याप तुम्ही अज्ञ आहांत ! राजकारणाचे डावपेंच तुम्हांला समजत नाहींत. उगीच भलताच वादविवाद करूं नका ! वेळीं अवेळीं जर कांहीं असाच घोटाळा केलात, तर माझं रचलेलं कारस्थान उघडकीला येऊन सर्व बुंदेल-खंडभर माझी फटफजिती होईल.

**विमलदेव**—मी जाणून बुजून असे करणार नाहीं; पण माझा मूळ स्वभाव ऐनवेळीं जर डोकावूं लागला तर कसें काय करायचें !

**हिरादेवी**—ती खबरदारी मी घेतें. घ्या, हें शस्त्र घ्या आणि तरवारीचे पट्टे करा ! आतां दिल्लीश्वराच्या कुमकेला मी तुम्हांला घेऊन जाणार आहें.

**विमलदेव**—आई, दिल्लीश्वराच्या अफाट सैन्यांत मी एखाद्या करवलीसारखा मिरवीन अं ! मला किनई वधू होण्यापेक्षां वधूची पाठराखीण करवली होणेंच फार आवडतें.

[ कवाली. ]

**मिरवावें लग्नकार्यी कौमार्यें हौस भारी ॥ भावी कांता होता नाथा भयकर भासे फसवी स्नेहा, गेहा ॥ ध्रु० ॥ प्रेमळ निर्मळ रसनीं नटलें ॥ भुललें बाह्य स्वरूप जन सगळे ॥ चाले लीला सारी ॥ या जगतीं मौज भारी ॥ १ ॥**

**हिरादेवी**—( स्वगत ) ओरछाच्या सिंहासनावर बसविण्याकरितां तयार केलेलं हें बाहुलं मला केव्हांना केव्हां तरी दगा देणारच ! (उघड) पण छे! असा

भलताच विचार करून उपयोगीं नाहीं. या हिरादेवीनं आजपर्यंत अनेक कारस्थानं केलीं आहेत. त्या कारस्थानांत तिला अजूनपर्यंत अपयश आलं नाहीं. याही कारस्थानांत तिला चुकून देखील अपयश येणार नाहीं. बालराजे, सांगितलेलं ध्यानांत ठेवा. विजयेशीं मीं सांगितलं त्याप्रमाणं वागा अं!

**विमलदेव**—विजयेशीं वागण्यांत माझ्या हातून कधींही चूक होणार नाहीं; पण मासाहेब, अजून विजया कशी आली नाहीं! ती जर घटकाभर माझ्या दृष्टीला पडली नाहीं तर माझा जीव तीळ तीळ तुटतो! मासाहेब, विमलदेवी—

**हिरादेवी**—काय?

**विमलदेव**—चुकलों. विमलदेवाचें आणि विजयेचें शुभमंगल झालें म्हणजे गंगेंत घोडे न्हाले म्हणायचे.

**हिरादेवी**—लग्नाकरितां असे उतावीळ होऊं नका! होईल बरं लग्न!

**विमलदेव**—आई, तशी मला लग्नाची हौस नाहीं. लग्न करायचें तें तुझ्याकरितां!

**हिरादेवी**—इश्श! हें काय भलतंच बोलतां राजे? कुणीं ऐकलं तर काय म्हणेल?

**विमलदेव**—काय म्हणेल? मुलगा मातृभक्त आहे असें म्हणेल.

[राग–मिश्रकाफी; ताल–त्रिवट.]

**विमल विलसला विजयकाला ॥ वीरव्रत त्याला**
**साजणी सजला ॥ध्रु०॥ खुलवीत प्रवला मंगल**
**भाला ॥ हांसत खेळत विधी नव झाला ॥ १ ॥**

**हिरादेवी**—असं बोलूं नये बरं बाळ! हं जातें मी. सांगितलेलं ध्यानांत ठेवा अं! घ्या ती तरवार (जातांना) एकदां याला राज्याभिषेक केला म्हणजे सुटलें एकदांची. चंपतराय! तुझ्या पोरीशीं लग्न लावून विमलला जेव्हां ओरछाचा राजा करीन तेव्हांच हिरादेवी राजकारणापासून परावृत्त होईल. अगोदर राजमंडळाच्या सभेची व्यवस्था केली पाहिजे. [जाते.

**विमलदेव**—तरवारीचे पट्टे आतांशा मला चांगले येऊं लागले आहेत. आतां या महालांत जरी छत्रसाल आला तरी देखील त्याला ठार करीन. हातांत तरवार असल्यावर मी महालाचीच रणभूमि करीन. अरे पण ही कोण बुरखा घेऊन अशी लपत-छपत येते आहे. माझी विजया तर नव्हे? हो खास तीच! जरा गंमतच केली पाहिजे! कोण ग तूं? स्त्री कीं पुरुष?

**शृंगार**—दोन्हीही.

**विमलदेव**—दोन्हीही ! म्हणजे याचा काय अर्थ ?

**शृंगार**—अर्थ कशांतच नाहीं. मी पुरुषही आहें आणि स्त्रीही आहें. माझें एका स्त्रीशीं लग्न झाल्यामुळें मी वर या नात्यानें पुरुष ठरलों आणि पुरुषी वेषाचा मला कंटाळा असल्यामुळें स्त्रीवेष घेतल्यानें स्त्रीही ठरलों.

**विमलदेव**—म्हणजे मी यांतलें कांहींच समजलों नाहीं.

**शृंगार**—तुमच्या समजुतींत कांहीं घोंटाळा होऊं नये म्हणून मी स्त्रीही आहें आणि पुरुषही आहें असें मघांशीं सांगितलेंलच आहे.

**विमलदेव**—पण तूं भलत्याच वेळीं येथें कसा ?

**शृंगार**—भलत्याच वेळीं ! ही का भलती वेळ ! याला का भलती वेळ म्हणतात ! नवरा लढाईवर जावयाला खुशी नसतां बायकोनें त्याला वीरांचा वेष देऊन त्याच्यावर लढाईची जबरदस्ती केली तर त्यावेळीं त्यानें रणांगणावर न जातां राणीवसा गांठणें, ही कसली भलती वेळ ?

**विमलदेव**—हा कोण विचित्र प्राणी आहे हें पाहिलेंच पाहिजे.

**शृंगार**—हं ! माझा गोषा काढूं नको. लढाई संपेपर्यंत मीं गोषांतून बाहेर न येण्याची प्रतिज्ञा केली आहे !

**विमलदेव**—तें जरी खरें असलें तरी यावेळीं गोषा दूर झालाच पाहिजे. गोषा दूर करणार नाहीं तर या तरवारीनें—

**शृंगार**—तरवार !–महालांत देखील तरवार !–अरे बापरे ! ती तरवार बाजूला ठेवा.–म्हणजे या गोषांतील राजाचें दर्शन तुम्हांला घडेल.

**विमलदेव**—गोषांतील राजा ! काय रहस्य आहे हें ! ही पहा तरवार टाकली ! काढ पाहूं गोषा !

**शृंगार**—पण कांहीं आशानें ब्रह्मचर्याचा भंग नाहीं ना होत ?

**विमलदेव**—तुझ्याशीं वादविवाद करायला मला वेळ नाहीं. चल आटप ! गोषा दूर कर, नाहींतर नोकरांना बोलावून तुझा गोषा दूर करणें भाग पडेल.

**शृंगार**—नको ! नको ! परक्या पुरुषांनीं माझ्या गोषाला हात देखील लावतां कामा नये.

**विमलदेव**—ठीक आहे. तर तूं आपल्या हातांनींच गोषा दूर कर. ( शृंगार

हळुहळू गोषा दूर करतो.) कोण! धारीरचे राजे शृंगारराज!-शाबास! काय मर्द आहांत हो!

**शृंगार**—म्हणूनच अशी मर्दुमकी गाजवली.

---

## प्रवेश पांचवा

**विजया**—आज मला या वनश्रीच्या निरीक्षणांत कां बरं समाधान वाटत नाहीं? हा अमृतवर्षाव करणारा कलाधर, आज माझ्या दृष्टीला नकोसा कां बरं वाटतो? या चांदणी रात्रींचा मला कां बरं तिटकारा वाटतो. सर्व नभोमंडळ शुभ्रतेच्या साम्राज्यानं नटलेलं असतांना माझ्या रसिक मनाला अशी हुरहुर कां बरं वाटते.—

[ राग-खमाज; ताल-दीपचंदी.]

**स्वांत विकळ विदारि विकारी॥ मोद मम मना भासे विषारी॥ चंद्रकांत नटला सुसोज्वल॥ ध्वांत नुरवी भासत भयकारी॥१॥**

तो पहा तो मेघ आपल्या काळ्या वर्णानें नभोमंडळाला कालिमा आणीत आहे. आकाश अमृतांत हा मेघ म्हणजे भयंकर विषारी विषबिंदूच नव्हे काय? शुभ्र वस्त्र परिधान करून आपल्या नाथाची विमल अंतःकरणानें मार्गप्रतीक्षा करणारी रजनी ह्या कृष्णमेघामुळं दुःखी झालेली आहे. तिची पतिदर्शनाची उत्कंठा या कृष्णमेघाच्या दर्शनानं मावळणीला लागली आहे. शांततेनं नटलेली ही वनश्री, हा शीतल चंद्र, नी हें पवित्र वातावरण या कृष्णमेघांनीं नासून टाकलं आहे. स्वर्गीय शुभ्रता आपल्या लावण्याची प्रभा आकाशाच्या मैदानावर फेंकीत असतांना मध्येंच हा कृष्णमेघ कसा आला? या मेघामुळं व्योमभागीं हंसणाऱ्या तारकांचं हास्य मावळलं आहे. तारकांनों! रजनीराणीच्या मैत्रिणींनों, तुमचीं हास्यवदनें दाखवा हो या विजयेला! आलेला कृष्णमेघ फार वेळ राहणार नाहीं. हा कृष्णमेघ म्हणजे तुम्हांवर संकट आहे; पण या संकटानं तुमच्या कार्याची खरीखुरी कसोटी, रजनीनाथाला कळून येणारी आहे. जितकीं संकटं अधिक तितकीं कार्याची यशस्विता निश्चित असा निसर्गाचा नियमच आहे.

**दळपत**—( प्रवेश करून ) विजये, तुझें हें तत्वज्ञान अगदीं बरोबर आहे. कार्याला जितकीं जितकीं संकटें येतील तितकीं तितकीं तीं त्याच्या यशःश्रीची खात्रीच पटविणारीं असतात. व्योमभार्गी आलेला हा आगांतुक कृष्णमेघ अशाचपैकीं आहे. ती पाहिलीस का रजनी त्या मेघांची आपल्या मार्गावरून दूर होण्याविषयीं प्रार्थना करीत आहे.

**विजय**—खरंच.

[ राग–काफी; ताल–त्रिवट.]

**मधुमालिनी रजतांगणीं निराधार होवोनी ॥ ध्रु० ॥**
**प्रार्थित मेघा वांछित प्रेमा ॥ रजनी प्रिय खनी रसराणी**
**निशानाथ नादानी ॥ १ ॥**

**विजया**—तें असूंदे मेलं. पण दादा कुठं आहे ? सर्व बुंदेले वीर स्वातंत्र्य-संग्रामाकरितां अजून जमले नाहींत का ?

**दलपत**—सर्व जमले आहेत. या मेघासारखे जे कांहीं कुटिल अंतःकरणाचे देशद्रोही स्वातंत्र्यविरोधक आहेत त्यांच्याशिवाय सर्व वीर बुंदेलध्वजाखालीं एकत्र झालेले आहेत.

**विजया**—अशा ऐन वेळीं देशद्रोह करणारे कोण नराधम आहेत ?

**छत्रसाल**—(प्रवेश करून) तुझ्या या भावी वल्लभाचा पिता आणि ओरछाची विधवा राणी हिरादेवी.

[ राग–भीमपलास; ताल–त्रिवट. ]

**लांछन राजकुला विफला ॥ जनिता जनपदीं**
**ओपी नराला ॥ ध्रु० ॥ देशन मान न या शलभाला ॥**
**राज्यशासनीं मोदही कसला ॥ १ ॥**

**विजया**—सभाकरण आणि हिरादेवी आपल्या देशाच्या नरडीला नख लावायला कारण होणार ?

**दलपत**—विजये, तो भलताच वादविवाद नको. या देशकंटकांची वासलात लावण्याचा मीं निर्धार केला आहे. देशाच्या स्वातंत्र्याला विरोध करणारा माझा पिता असला तरी त्याची गय हें माझें तीव्र खड्ग केव्हांही करणार नाहीं.

**छत्रसाल**—तुमच्या खड्गाच्या पराक्रमावर ताईचा अढळ विश्वास आहे. आहेना ? ताई बोल ! अशी लाजतेस कां ?

**दलपत**—युवराज ! भलत्याच वेळीं काय तिची थट्टा करितां ?

**छत्रसाल**—चुकलोंच वरें का ताई ! क्षमा कर. थट्टा करण्याचा अधिकार या दलपतचा आहे; पण छे ! तो खरा अधिकार हिरादेवीच्या युवराजाचा विमलदेवाचा आहे.

**विमलदेव**—विजये ! अग मीं केव्हांपासून तुझी वाट पहातों आहें. कर्णधारांनीं नौका केव्हांच सरोवरांत लोटली, आणि अजून तूं इथेंच ! मासाहेब म्हणाल्या, मी राजमंडळाच्या सभेहून परत येईपर्यंत तुम्ही जलविहार करा.

**विजया**—राजमंडळाची सभा ? ती कशाची ?

**विमलदेव**—तुझ्या पित्याला स्वातंत्र्यसंग्रामांत कोणींही मदत करावयाची नाहीं; अशा गुप्तकटाची ती सभा आहे हें मीं तुलादेखील सांगितलें नसतें; पण सहजच तें माझ्या तोंडून चुकून निघालें. चल पाहूं लवकर !

**विजया**—पण ती सभा भरणार तरी कुठें ?

**विमलदेव**—विंध्यवासिनीच्या देवळांत–तुला काय करावयाचें आहे सभेशीं!–सभा आणि तेथलें राजकारण आपल्याला नकोच मुळीं, आपलं राजकारण म्हणजे जलविहार !

**छत्रसाल**—दलपत, चल. अनायासें माहिती मिळाली. बाबांच्या कानीं ही वार्ता घालून त्या राजसभेची धूळधाण उडवून टाकूं. [ जातात.

**विजया**—( स्वगत ) दादाला ही हकीगत समजली हें एका अर्थी बरंच झालं. ( उघड ) विमलदेव, तुम्हाला नाहीं का जायचं सभेला ?

**विमलदेव**—मासाहेब म्हणाल्या तुम्हीं येऊं नका ! म्हणून मी जाणार नाहीं. शिवाय ती तुझ्या बापाविरुद्ध–माझ्या सासऱ्याविरुद्ध सभा; मी कसा बरं तिथं जाईन.

**विजया**—तुमच्या मातेची तुम्हीं याबद्दल कांहींच का समजूत घातली नाहींत ? स्वातंत्र्याला विरोध आणण्याचीं तिचीं कारस्थानं तुम्हीं हाणून कां पाडलीं नाहींत ?

**विमलदेव**—विजये, मला मासाहेबांचें करणें मुळींच पसंत नाहीं. माझीं व त्यांचीं मतें अगदीं भिन्न आहेत.

**विजया**—विमलदेव, तुमचं माझ्यावर प्रेम आहे ही गोष्ट लक्षांत घेऊन मी तुम्हाला एक कर्तव्य सांगणार आहें.

**विमलदेव**—शस्त्रासंबंधींचें कर्तव्य सोडून वाटेल तें सांगा; तें बजवायला मी तयार आहें.

**विजया**—शस्त्रासंबंधींचं कर्तव्य बजवायला मी समर्थ आहें.

**विमलदेव**—तूं आहेसच तशी पराक्रमाची प्रतिमा!

**विजया**—पुरुषांनीं पराक्रमाचा संन्यास घेतला म्हणजे स्त्रियांनींच पराक्रम करावा लागतो.

**विमलदेव**—पुरुषांसंबंधीं तूं वाटेल ते प्रलाप काढ; बरें, काय कर्तव्य सांगणार आहेस?

**विजया**—तुमच्या मातेचीं सर्व प्रकारचीं होणारीं कारस्थानं, तिच्याकडून ऐकून तीं सर्व मला गुपचीपपणें सांगितलीं पाहिजेत.

**विमलदेव**—वा:! हें काम मी अवश्य करीन!

**विजया**—इतकं केलंत आणि माझी खात्री पटली म्हणजे मग मी तुमच्या मागणीचा विचार करीन.

**विमलदेव**—ठीक आहे. बरें, चल पाहूं; कर्णधार अगदीं कंटाळून गेला असेल.

**विजया**—तुम्ही व्हा पुढें, आलेंच मी.

**विमलदेव**—मी जाऊं म्हणतेस? बरें, पण तूं ये बरें का! [ जातो.

**विजया**—या मूर्खाला लग्नाच्या आशेवर असाच झुलत ठेवून बाबांच्या अन् दादांच्या विरुद्ध कारस्थानांचा सुगावा याच्याकडून काढून घ्यावा. आणि वेळ प्रसंग पाहून त्या हिरादेवीची–स्वराज्यांतील या पूतनेची आपणच परस्पर वासलात लावून टाकावी. विंध्यवासिनी आदिमाये, मला या कार्यांत यश देऊन माझ्या बाबांचं स्वातंत्र्ययुद्ध यशस्वी कर.

[ राग–बिहागडा; ताल–झपताल. ]

**संग्राम संसारीं ॥ यश ख्यात नरनारी ॥ स्वातंत्र्य-**
**राणी ॥ कुलस्वाभिमानी ॥ध्रु०॥ वांच्छा मनींची पुरवीं**
**सुखाची ॥ प्रार्थीं पदाधारी वैरी वारी ॥ १ ॥**

[ जाते.

---

# प्रवेश सहावा

[ **स्थळ**—मसलतखाना. पात्रें-बुंदेलखंडांतील राजे बसले आहेत. **सभाकरण** व **हिरादेवी** येते; नंतर **शृंगार** येतो.]

**हिरादेवी**—बुंदेलखंडांतील शूर वीर राजेलेकहो, आपल्या राजमंडळाची ही दुसरी राजसभा आहे. ह्या सभेला सुरवात होण्यापूर्वी, एक काळजी प्रत्येकानें घेतली पाहिजे; आणि ती म्हणजे आपल्या ह्या गुप्त मसलतींत आपल्या-शिवाय दुसरा तिसरा कोणींही येतां कामा नये. मी माझ्याकडून उत्तम व्यवस्था व कडेकोट पहारे ठेविले आहेत. तरी पण एखादा चंपतरायाचा संजय येथें येऊन आपल्या गुप्त कटाची बातमी त्याला निवेदन करायचा.

**शृंगार**—राणीसाहेब, आपण जातीनें एवढा कडेकोट बंदोबस्त ठेवला असतांना येथें परका मनुष्य येईल हीच कल्पना अव्यवहार्य आहे ! स्त्री गोषांत असल्यावर तेथे परका पुरुष जाणेंच शक्य नाहीं.

**सभाकरण**—शृंगार, तुम्हांला सदा सर्वदा स्त्री आणि पुरुषच दिसतात.

**शृंगार**—स्त्री-पुरुष कां दिसूं नयेत ? पुरुष आणि प्रकृति ही जोडी विश्वाच्या आदि-अंताला कारणीभूत होत असते ना ? जगांत जर स्त्री-पुरुष नसते तर जगाची उत्पत्तीच झाली नसती. स्त्री-पुरुष नसते तर येथें जमलेले राजे जन्माला तरी आले असते का ?

**हिरादेवी**—शृंगार, भलत्याच वेळीं तुमची स्त्री-पुरुष-मीमांसा नको. राजकारणाच्या वाटाघाटींत ही सामाजिक लुडबुड नको. आम्हांला आधीं राजकारण साधावयाचें आहे.

**शृंगार**—राणीसाहेबांची आज्ञा मला शिरसामान्य आहे. ( बायकांसारखा नमस्कार करतो.)

**हिरादेवी**—राजेलोकहो, आज आपल्याला अत्यंत महत्त्वाचा प्रश्न सोडवावयाचा आहे. आपल्या मंडळाचें ध्येय आणि प्रतिज्ञा लक्षांत घेऊनच आपल्याला तो प्रश्न सोडविला पाहिजे. आपणां सर्वांना बुंदेलखंडांतील राजकीय परिस्थिति माहीतच आहे. चंपतराय आणि त्याचा तो उन्मत्त कारटा छत्रसाल, दास्यविमोचन, मायभूमीचें स्वातंत्र्य, भूतदया, या गोडगोड नांवांखालीं आपली राज्यतृष्णा

वाढवीत आहे. त्या नराधमाचा लौकिक अग्नीप्रमाणें तमाम बुंदेलखंडांत पसरत चालला आहे. त्यांनीं आपल्या दुष्ट हेतूंच्या जोरावर लोकमान्यता संपादन केली आहे. 'स्वातंत्र्य' 'स्वातंत्र्य' असा जयघोष करून तो आपली साम्राज्यसत्ताभिलाषा दिवसें-दिवस वाढवीत आहे. तुम्ही आम्ही सर्व राजे आणि जहागिरदार त्याच्या पंजांत जाण्याची आजची परिस्थिति आहे. आपण जर त्याच्या वाढत्या राज्यतृष्णेला यावेळीं कसून विरोध करून पायबंद घातला नाहीं, तर तुम्हां राजांचें राजेपण तिळमात्र टिकणार नाहीं. या नराधमांनीं आपल्यावर वर्चस्व गाजविण्याकरितां एक फर्मान काढलें आहे. हें फर्मान सागरचे सम्राट्—आपल्या मंडळाचे पुढारी आपल्याला वाचून दाखवितील. सभाकरण वाचा पाहूं तें फर्मान !

**सभाकरण**—राजेलोकहो, या फर्मानाला स्पर्शही करूं नये असें हें आमच्या मतानें राजद्रोही फर्मान आहे. या फर्मानाला त्या साम्राज्याभिलाषी चंपतरायानें "स्वातंत्र्याचा संदेश" असें गोंडस नांव दिलेलें आहे. हें नांव गोंडस असलें तरी त्यांत भयंकर जहर भरलेलें आहे. या स्वातंत्र्याच्या संदेशाला आपण उत्तर दिलेंच पाहिजे. तुम्हां साऱ्यांच्या माहितीकरितां मी तें माझ्या इच्छेविरुद्ध वाचीत आहें.

**एक राजा**—आम्हाला देखील ऐकण्याची इच्छा नाहीं; पण हिरादेवीच्या आज्ञेकरितां म्हणून तें आम्ही ऐकत आहोंत. वाचा, सागरसम्राट् ! तें स्वातंत्र्याचें फर्मान वाचा.

**शृंगार**—पुरुषार्थाची भाषा मात्र हळूच वाचा हं !

**सभाकरण**—ऐका ! राजेलोकहो, हा त्या राज्यतृष्णेनें तृषित झालेल्या चंपतरायाचा 'स्वातंत्र्य-संदेश' ऐका !

**शृंगार**—कान लांब करून तो आम्ही ऐकणार आहोंत.

**सभाकरण**—बुंदेलखंडांतील तमाम राजेरजवाड्यांनों, मांडलिकांनों, सरदार-दरकदारांनों, शिपाईबारगिरांनों, मी स्वातंत्र्याचा संदेश जाहीर करीत आहें. ज्या अर्थीं तमाम बुंदेलखंड गृहकलहानें व गृहयुद्धाभिलाषी बुद्धीनें पोखरून गेले आहे अशी परक्यांची बालंबाल खात्री झाल्यामुळें ती परसत्ता बुंदेलखंडाचें स्वातंत्र्य नष्ट करण्याकरितां उद्युक्त झालेली आहे, त्याअर्थीं ही आपल्या मातृभूमीवरील आपत्ति टाळण्याकरितां, आपल्या मायभूमीचें स्वातंत्र्य रक्षण करण्याकरितां, या वेळीं सर्व बुंदेल्यांनीं एकदिलानें—दिलजमाईनें बुंदेलच्या निशाणाखालीं जमलें पाहिजे. बुंदेल-खंडाचे क्षात्रगुरु यांनीं या कामीं मला पुढाकार घ्यावयाची आज्ञा केली आहे. त्यांची

आज्ञा शिरसामान्य करून मी तमाम बुंदेलखंडाला—स्वातंत्र्याचा संदेश पाठवीत आहें. बुंदेलखंडांतील प्रत्येक धर्मवीरानें हातांत समशेर घेऊन मीं उभारलेल्या स्वातंत्र्यध्वजेखालीं जमावें. हा स्वातंत्र्याचा संदेश ऐकतांच जर कोणी येणार नाहीं, तर तो बुंदेलखंडाचा शत्रु समजला जाऊन त्याचा निःपात अगोदर केला जाईल. तो देशद्रोही समजून त्याची वासलात राष्ट्रीय कायद्याप्रमाणें करणें भाग पडेल.

सर्वांचा नम्र—स्वातंत्र्याभिलाषी

**चंपतराय.**

**हिरादेवी**—ऐकलंत ! हें आपला उपमर्द करणारं फर्मान ऐकलंत ? राजेलोकहो, या संदेशाचा स्पष्ट अर्थ तुम्हांला मांडलिक बनवीत आहे. तुमचं वर्चस्व यामुळें कमी होऊन तुमच्या सर्वांच्या शेंड्या चंपतरायाच्या हातांत जाऊन तुम्ही त्याच्या हातांतील खेळणं होणार आहांत ! तुमचीं सिंहासनं यामुळं चंपतरायाच्या लहरीवर व मेहेरनजरेवर चालणार आहेत. तुम्ही जर या फर्मानाप्रमाणं—या स्वातंत्र्याच्या संदेशाप्रमाणं—वागाल तर तुम्ही जन्मभर गुलामगिरींत खितपत पडाल. 'बुंदेलखंडाच्या स्वातंत्र्याकरितां माझ्या निशाणाखालीं या'. ही भाषा मानभावीपणाची आणि स्वार्थाची आहे.

**एक राजा**—चंपतरायाची ही भाषा स्वार्थाची आहे यांत शंका नाहीं; आम्हांला दिल्लीपतीचेंच वर्चस्व हवें आहे. स्वातंत्र्य मुळींच नको. दिल्लीपतीला खंडणी दिली, म्हणजे आम्ही स्वतंत्रच आहों. आम्ही त्याच्या निशाणाखालीं मुळींच जाणार नाहीं.

**शृंगार**—मला तर दिल्लीपतीचा हुजऱ्या केलें तरी चालेल; पण मला लढाई, स्वातंत्र्य, स्वराज्य यांपैकीं कांहीं नको !

**एक राजा**—मला रक्तपाताचा पहिल्यापासून तिटकारा आहे. मी माझ्या राणीचें कुंकू देखील काळ्या रंगाचें केलें आहे. तांबड्या रंगाला माझ्या रियासतींत मीं बंदी केली आहे. मऊ पराच्या गादीवर सुवासिक सौरभांत लोळणें हेंच माझें राजकारण आहे. दिल्लीपतीसारख्या प्रबल सार्वभौमाचा आश्रय सोडून त्याची नाराजी करून घेणें, म्हणजे आपल्या हातानें आपल्या राजमंदिराला आग लावणें आहे. आम्हांला स्वातंत्र्य नको, आणि बड्यांशीं वैरभावही नको ! आम्ही चंपतरायाच्या निशाणाखालीं मुळींच जाणार नाहीं.

**हिरादेवी**—कलिंजरपति, आपला काय मनसुबा आहे ?

**दुसरा राजा**—स्वातंत्र्य हा शब्दच मला अपरिचित आहे. प्रजेवर भयंकर

कर लादून रंगेल वृत्तींनीं जिवाची मौज उडवावी हेंच मला समजतें. परक्या सत्तेच्या प्रसारामुळें धर्माचा ऱ्हास कसा होतो, एवढा खुलासा ऐकला म्हणजे मग मी माझें मत राजमंडळापुढें निवेदन करीन.

**सभाकरण**—तो वादविवाद करण्याचें हें स्थळ नाहीं व ही वेळही नाहीं. माझ्या हाडवैरी चंपतराय यानें चालविलेला स्वातंत्र्याचा लढा चांगला आहे कीं वाईट आहे याचीही शहानिशा आज येथें करावयाची नाहीं. धर्म बुडेल कीं चढेल याचा विचार केला काय नी केला काय सारखाच! त्याचा प्रतिज्ञेशीं कांहीं संबंध नाहीं. तुम्हीं आम्हीं जो प्रतिज्ञा केली आहे ती म्हणजे चंपतराय आणि त्याचा तो उन्मत्त पोरटा छत्रसाल यांच्या सूडाचा संदेश होय. या फर्मानाला—या कागदाच्या चिटोऱ्याला—असा पायाखालीं ठेंचून हा सभाकरण—सागराचा सम्राट—तुमच्या वतीनें सूडाचा संदेश पाठवीत आहे. चंपतराय! आम्ही सर्व या राजमंडळांतील राजे लोक तुझ्या इच्छेविरुद्ध दिल्लीपतीला मिळणार आहोंत. आम्हांला बुंदेलखंडाचें स्वातंत्र्य नको. आम्हांला तुझा सूड उगवायचा आहे आणि म्हणून आम्ही बादशहाला—दिल्लीच्या शहानशहाला—मदतीचा व तुला सूडाचा असे संदेश पाठवीत आहोंत. आम्ही तुला स्वातंत्र्याच्या लढ्यांत मदत तर करणार नाहींच; पण कसून विरोध करून तुझ्या रक्ताचा अभिषेक दिल्लीपतीच्या चरणांवर करूं.—

**दलपत**—(प्रवेश करून) राजद्रोही राजांनों! मातृभूमीच्या नरडीला नख लावणाऱ्या नामर्द नृपतींनों! मी जिवंत असतां चंपतरायाचें रक्त तुमच्या प्रपितामहालादेखील सांडतां येणार नाहीं. या गुप्त सभेंत अगोदर तुमचें रक्त सांडीन आणि मग तुमच्या तुटपुंज्या रियासतीकडे पाहीन. स्वातंत्र्याचा संदेश तुम्ही जर ऐकणार नाहीं तर याच घटकेला मी तुमची कतल केल्याशिवाय राहणार नाहीं!

**एक राजा**—आम्हीं जरी आपल्या तरवारी शस्त्रागारांत ठेवल्या असल्या तरी आमचें धैर्य कांहीं विसरून आलों नाहीं.

**दुसरा राजा**—आम्हांला रक्त पाहून जरी घेरी येत असली तरी तुझ्यासारख्या पोराच्या रक्ताचा पाट या ठिकाणीं वाहवल्याशिवाय रहाणार नाहीं.

**शृंगार**—आम्ही कांहीं हातांत बांगड्या भरून आलों नाहीं.

**सभाकरण**—राजेलोकहो! शांत व्हा! या मूर्खाच्या दटावणीला भितां कसले! असल्या मशकाला मी एका चुटकीसरसा चिरडून टाकतों.

[ सभाकरण दलपतच्या अंगावर जातो. **विजया** आपल्या सैन्यासह येऊन सभाकरणाला गिरफदार करते.]

**विजया**—राजेसाहेब, खबरदार पुढें व्हाल तर !

**हिरादेवी**—विजये, सभाकरणाला मुक्त करतेस कीं नाहीं ?

**विमलदेव**—शिपायांनों ! सभाकरण मुक्त होण्यापूर्वी आमच्या मातुश्रींना चतुर्भुज करा. ( शिपाई हिरादेवीला पकडतात. )

**हिरादेवी**—बाळराजे ! काय करतां हें ?

**विमलदेव**—मातृभक्ति कशी असते हें आपल्याला पटवून देतों आहें ! आईसाहेब !

**हिरादेवी**—कट बरं-कट केला आहे मेल्यांनीं.

**छत्रसाल**—( प्र. क. ) कुणीं कट केला ? कैदासणी ! कुणीं कट केला ? आम्हीं कीं या जमलेल्या षंढांनीं ? स्वातंत्र्याला विरोध करण्याकरितां तुम्हींचना हा कट केलांत ? जारे ! या सापांना जन्मभर तुरुंगांत डांबून ठेवा ! स्वातंत्र्याला विरोध करणाऱ्या या घरांतल्या अधमाधम शत्रूंना अशीच शिक्षा केली पाहिजे. जा, यांना एकदम घेऊन जा ! दिल्लीच्या बादशहाला आमच्या विरुद्ध मदत करणाऱ्या या देशकंटकांना एकदम घेऊन जा !

[ शिपाई नेऊं लागतात, तोंच **चंपतराय** प्रवेश करतो.

**चंपतराय**—थांबा. स्वातंत्र्याच्या शिपायांनों ! थांबा ! या राजांना अशी मामुली शिक्षा नको ! शस्त्रविहीनांवर शस्त्र धारण करणाऱ्यांनीं असा केव्हांही हल्ला करणें ही युद्धनीति नाहीं. हा क्षात्रतेजाला भयंकर कलंक आहे.

**दलपत**—पण हे आपले शत्रु आहेत ना ?

**चंपतराय**—शत्रु जरी असले तरी ते वीर आहेत, राजे आहेत, पराक्रमी आहेत. तुमची आमची जी योग्यता तीच यांची आहे. त्यांच्या हातांत शस्त्रें द्या, त्यांच्याशीं लढा आणि मग त्या युद्धांत विजय मिळवून त्यांचा पराजय करा ! असों अकस्मात् घाला घालून त्यांचा अपमान करूं नका. गैरसावध असलेल्या शत्रूवरें अचानक हल्ला चढवणें हें अस्सल रजपुताचें ब्रीद नव्हे.

**छत्रसाल**—हे स्वातंत्र्याचा संदेश कबूल करीत असतील तरच त्यांना मुक्त करावें.

**चंपतराय**—बेटा छत्रसाल, अरे स्वातंत्र्याची भावना ही दडपशाहीनें कधींतरी अंतःकरणांत रुजते का ? स्वातंत्र्य हें चैतन्य आहे. आजन्म गुलामगिरींत स्वर्गाचें साम्राज्य आहे असें मानणाऱ्यांना स्वातंत्र्याची कल्पनादेखील असह्य होत असते. स्वातंत्र्याचा संदेश अशा गुलामगिरींतल्या किड्यांना मृत्यूचा संदेश वाटत असतो.

**विजया**—बाबा, यांनीं जर आपला जयजयकार केला तरच हे मोकळे सुटतील.

**शृंगार**—त्याला आम्ही सगळे तयार आहोंत.

**हिरादेवी**—शृंगार ! तोंड संभाळा !

**सभाकरण**—मी जन्मभर तुरुंगांत खितपत पडेन; पण माझ्या या ह्राड-वैऱ्याचा जयजयकार केव्हांही करणार नाहीं.

**हिरादेवी**—मी कट्यारीनं माझे डोळे फोडून घेईन; पण यांचा जयजयकार जिभेनं उच्चारणार नाहीं व कानांनींही ऐकणार नाहीं !

**चंपतराय**—अभिमानानें रसरसलेल्या माझ्या शूर शत्रूनों ! तुम्ही माझा मुळींच जयजयकार करूं नका. तुम्हांला आव्हान देऊन तुमच्याशीं दोन हात करूनच तुमच्याकडून जयजयकार करवीन ! छत्रसाल, विजया, विमल ! द्या, यांना सोडून द्या. मुक्त झालेल्या वीरांनों ! गृहयुद्धाचें मीं तुम्हांला उघड आव्हान देतों आहें. नीट तयारी करा आणि मला कळवा ! चला चालते व्हा येथून.

## अंक पहिला समाप्त

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

[ **स्थळ**—हिरादेवीचें मंदीर. पात्रें—**हिरादेवी, सभाकरण.** ]

**हिरादेवी**—परवांच्या गुप्त सभेंत त्या मेल्यांनीं ऐनवेळीं आमच्या काळजालाच हात घातला. सभेची व्यवस्था इतक्या कडेकोट बंदोबस्तानें ठेविली असून सर्वांच्या प्रतिज्ञेपूर्वी त्या मेल्या चंपतरायानें ऐनवेळीं हल्ला केला. साऱ्यांनीं आमच्यासारखाच पूर्वी कट केला होता कीं काय, नकळे! मला तर त्या राजमंडळांत अगदीं मेल्यासारखं झालं! बालराजांनीं देखील माझा पाणउतारा केला. समजलें, मी यांतील रहस्य पूर्णपणें समजलें. त्या विजयेनं माझ्या बाळराजांना फसवून ऐनवेळीं दगा केला. कांहीं हरकत नाहीं. या कारस्थानी हिरादेवीशीं गांठ आहे. हें लक्षांत ठेव! सभाकरणासारख्या शूर वीराला जिनं एका शब्दानं फितवला तिथं तुझ्यासारख्याची काय किंमत!

**सभाकरण**—हिरादेवी, त्या नीच चंपतरायानें आणि त्याच्या त्या उन्मत्त छत्रसालानें भरदरबारांत आपला अपमान केला! त्याचा सूड उगवायचा सोडून महालांत विचार कसला करीत बसलीस? चंपतरायाला आणि त्याच्या त्या नीच कार्ट्याला जगांतून नेस्तनाबूद करण्याची कांहींतरी युक्ति काढली पाहिजे. अपमान जर असा गिळूं लागलों तर आपल्यासारखे नामर्द दुसरे कोणी असणार नाहींत!

**हिरादेवी**—सागरसम्राट्, मी महालांत स्वस्थ बसून झालेल्या अपमानाचे नक्राश्रु गाळतें आहें असं का तुम्हांला वाटतं? छे, छे! ही तुमची दिशाभूल आहे. त्या नीचाचा कोणत्या उपायानं सूड उगवून आपल्या अपमानाचा मोबदला घ्यावयाचा याच्या विचारांत मी आहें. शृंगारराजांना आतांच निरोप पाठवून यांच्यावर एक जोखमीची कामगिरी मी नेमणार आहें.

**सभाकरण**—डंवचलेली नागीण कधींही स्वस्थ बसणार नाहीं, हें मी जाणून

आहे ! पण चंपतरायाचा सूड कसा काय घ्यायचा याचा अंदाज, निदान अंधुक कल्पना तरी मला समजूं दे.

**हिरादेवी**--ऐका. सर्व परिस्थितीचा विचार करून मीं माझ्या मतानं असं ठरविलं आहे कीं, आतां उघडपणें चंपतरायाशीं वैर करून भागणार नाहीं.

**सभाकरण**--म्हणजे ! त्याच्याशीं असलेलें वैर आपण सोडून द्यावें कीं काय ? वाः ! छान उपदेश आहे आपला हिरादेवी ! असा उपदेश करण्यापेक्षां आम्हीं त्या चंपतरायाचे बंदे गुलाम व्हावें असेंच कां सांगत नाहींस ?

**हिरादेवी**—सागरसम्राट्, आपण आपल्या मनाची अशी दिशाभूल करून घेऊं नका ! माझं म्हणणं शांतपणानं ऐका ! मग तुमच्या दिलाची वालंबाल खात्री होईल कीं, या हिरादेवीचं कारस्थान दर्शनीं दिशाभूल करणारं असलं तरी परिणामीं अत्यंत हितकर आहे.

**सभाकरण**—ठीक आहे ! या कारस्थानांत सर्वस्वीं आम्ही राजे लोक तुझ्याच सूत्रावर अवलंबून आहोंत.

**हिरादेवी**—मी तुम्हां साऱ्यांचा विश्वासघात करीन असं तुम्हांला वाटत असेल तर तसं स्पष्ट सांगा ! तुम्हांला जाणीव आहेच कीं, या हिरादेवीनं एकटीनं मनांत आणलं तर ती तमाम बुंदेलखंडाची राखरांगोळी करायला एकटीच समर्थ आहे !

**सभाकरण**—हिरादेवी, कारस्थानांच्या तुम्ही सम्राज्ञी आहांत, याची माझ्या दिलाला पक्की जाणीव आहे. बरं, सांगा पाहूं आपली काय युक्ति आहे ती !

**हिरादेवी**—सभाकरण, तुम्हांला माहीतच आहे कीं, आज आपले सर्व प्रजाजन स्वातंत्र्याच्या संदेशाकडे सहानुभूतीनं पहात आहेत. चंपतरायाच्या निशाणाखालीं ते एकत्र व्हायला सिद्ध झालेले आहेत. आपण सुष्ट दुष्ट उपाय योजून देखील, ते स्वातंत्र्याच्या ध्येयापासून परावृत्त होऊन आपल्या कटांत मिळतील असं वाटत नाहीं. वाटेल त्या हालअपेष्टा सोसून आपले सर्व प्रजाजन चंपतरायाच्या स्वातंत्र्याच्या लढ्याकरितां आपल्या जिवाचें घोर बलिदान करायला तयार झालेले आहेत. अशा वेळीं आपण जर त्यांना विरोध केला तर आपलं इच्छित ध्येय साध्य न होतां आपली फजिती होईल. तेव्हां वरकरणी आपण चंपतरायाशीं सलोखा दाखवून आंतून आपलीं कारस्थानं चालवून आपला सूडाचा संदेश खरा करावा !

**सभाकरण**—हा निव्वळ नामर्दपणा आहे! आंत एक आणि बाहेर दुसरें अशी दुटप्पी आणि दुहेरी वृत्ति हें नामर्दपणाचें लक्षण आहे. परवांच्या राजमंडळाच्या सभेंत चंपतरायानें दाखविलेली उदार वृत्ति आपल्याला विसरून चालणार नाहीं. त्याचा सूड घ्यावयाचा असेल तर तो समोरासमोर घ्यावा. हिरादेवी, तुझें हें कुटिल कारस्थान माझ्या सरळ बुद्धीला पटत नाहीं.

**हिरादेवी**—(स्वगत) याला आंजारून गोंजारून घेतला पाहिजे. नाहींतर हा आपल्या कटांतून सुटून जाईल. (उघड) सभाकरण, असा माझ्या म्हणण्याचा गैरसमज करून घेऊं नका. माझ्या स्त्री बुद्धीला जें समजतं तें मी निवेदन करणार आहें. आपल्याला जर हें पटत नसेल तर आपण एखादी युक्ति सुचवा! त्याप्रमाणं वागूं.

**सभाकरण**—बरं, सांग पाहूं तुझें कारस्थान?

**हिरादेवी**—मीं असं ठरविलं आहे कीं, चंपतराय आणि छत्रसाल यांच्याशीं अगदीं जिव्हाळ्याचा संबंध दाखवावा. आम्हीं तुमच्या निशाणाखालीं यायला तयार आहोंत असं बेधडक सांगून त्यांची आपत्ति टाळावी आणि त्याचबरोबर दिल्लीश्वराला असा गुप्त खलिता पाठवावा कीं, आम्हीं तुमच्या कुमकीला यायला तयार आहोंत.

**सभाकरण**—हा विचार ठीक आहे. पाहुण्याकडून साप मारण्याची ही युक्ति आहे खरी विचार करण्यासारखी. बरं, पण दिल्लीपतीकडे कोणाला पाठवावें? या कामगिरीला योग्य कोण आहे!

**शृंगार**—( प्रवेश करून ) माझ्याशिवाय दिल्लीपतीच्या राजमहालांत जायला दुसरा कोण लायक आहे? मशीदीपासून मजलशीपर्यंत; फकिरापासून अमीरा-पर्यंत माझी जानपछान! दिवाण-ई–आमपासून दिवाण-ई–खासपर्यंत मला सर्रास वावरण्याला शाही परवाना आहे. गोषांत इतरांना बंदी–पण बंद्याला मोक-ळीक! बोला! सभाकरण दिल्लीपतीच्या खासगींत निम्मा जन्म घालविलेल्या या धारीरच्या राजापेक्षां त्यांच्याकडे पाठवायला दुसरा कोण लायक आहे?

**सभाकरण**—तुमची कर्तबगारी माझ्या लक्षांतच आली नाहीं.

**शृंगार**—तुमचें माझ्याकडे लक्ष नाहीं, त्याचा हा परिणाम आहे, झालं! अहो, सर्वांच्या मीं चट्कन् लक्षांत यावं, पुरुषांच्या सभेंत बसलों तर मी त्यांच्यापेक्षां

निराळा दिसावा, म्हणून असें वेषांतर करीत असतों. इतका पुरुषार्थाचा स्वार्थ-त्याग करून देखील मीं तुमच्या लक्षांत येऊं नये हें माझेंच दुर्दैव नाहीं काय!

**हिरादेवी**—शृंगारराज! सभाकरणांच्या लक्षांत जरी तुम्ही आला नसलांत तरी माझ्या लक्षांत तुम्ही आहांत ना!

**शृंगार**—सजातीय स्वरांचा संधी नेहमींच होत असतो! स्त्रीजातीचें लक्ष माझ्याकडे असावें व त्यांनीं आपल्या खालीं मला आजन्म जमा करून घ्यावें हीच तर जगदंबेजवळ माझी अहर्निश प्रार्थना आहे.

**सभाकरण**—तुळशीला प्रदक्षिणा नाहीं ना घालायला लागलांत ?

**शृंगार**—माझ्या स्त्रीकरणाची अशी थट्टा करूं नका बरें; सागरसम्राट्. अहो, हा शृंगार कटांत आहे हें तुमच्या कटाला भूषण आहे बरें.

**हिरादेवी**—पण तें असूंद्या. शृंगार, तुम्हाला निकडीनं आमंत्रण पाठवायचं कारण समजलं असेलच तुम्हांला!

**शृंगार**—हो, हो. न समजायला काय झालें! आपल्यातर्फे दिल्लीच्या शहा-जादीला शृंगारसाज घेऊन जाण्याकरितांच मला बोलाविलें ना! ठीक आहे. धारीरचा राजा फक्त त्याच कामाला योग्य आहे. चला, द्या लौकर शृंगार-साहित्य; कीं मी निघालोंच परस्पर!

**सभाकरण**—राजकारणाचा शृंगार करून रंगेल राजकारण करणाऱ्या जिगर-दोस्ता! तुझी शृंगारलालसा बेहद्द वाढली आहे.

**शृंगार**—मी या बाबतींत बंधनांच्या पलीकडे गेलों आहें!

**हिरादेवी**—शृंगार, तुम्हांला वेळ अवेळ कांहीं समजते का ?

**शृंगार**—सदासर्वदा शृंगार करावा हेंच मला समजतें. वेळ अवेळेबद्दल इतकेंच सांगूं शकेन कीं, विप्रलंभाच्या वेळीं उत्तान आणि उत्तानाच्या वेळीं विप्रलंभ मात्र मी करीत नाहीं.

**हिरादेवी**—शृंगार, प्रीतीचें सौभाग्यच म्हणायचें.

**शृंगार**—हो, सौभाग्याची बरी आठवण केलीत! मला सुवासिनींना सौभाग्य-वायनें द्यावयाचीं आहेत.

**सभाकरण**—तीं दिल्लीहून आल्यावर द्या.

**शृंगार**—नाहीं. तो सौभाग्य-समारंभ मी दिल्लीला देखील उरकून घेईन.



**प्रीता**– कधीं वरं हे ताळ्यावर येतील ?

[ पृष्ठ २३.

**हिरादेवी**—शृंगारराज! तुम्हांला ताबडतोब दिल्लीला गेलं पाहिजे. दिल्लीला जाऊन दिल्लीपतीची भेट घ्या आणि त्यांना हा खलिता द्या. मात्र ही कामगिरी बेमालुमपणानं झाली पाहिजे अं!

**शृंगार**—त्याची तुम्हांला काळजी नको. हें काम यशस्वी झालेंच म्हणून समजा.

**हिरादेवी**—हा खलिता घ्या. दिल्लीपतीशिवाय दुसऱ्या तिसऱ्याच्या हातीं देऊं नका! नाहींतर सारंच कारस्थान उघडकीला येऊन पंचाईत होईल.

[ खलिता देते व दोघे जातात.

**शृंगार**—दिल्लीपतीची आणि माझी मुलाखत होणार! हा केवढा भाग्याचा दिवस! आहाहा! माझा दिल्लीपति मला केव्हां बरें भेटेल! दिल्लीश्वरा! मला तुझा विरह मुळींच सहन होत नाहीं.

[कवाली.]

**कधीं दिसे जिवाचा खुदाही मला ॥ध्रु०॥ जो विलासी**
**इष्क माषुक प्राणसौरभ धीनिधान ॥ या मना कांहीं**
**सुचेना भावना भोळी अजाण ॥ अशी आसही भारी**
**मनांत वसे ॥ कधीं दिसे ॥ १ ॥**

---

## प्रवेश दुसरा

[ **स्थळ**—शृंगाराचा राजमहाल. पात्रें—**प्रीति**, **शृंगार** व **सेवक**.]

**प्रीति**—काय करावं बाई इकडच्या स्वभावाला? परवां चांगलं लढाईवर जा म्हणून सांगितलं, तर मेलं कोणाच्या गोषांतच लपून बसणं झालं! पुरुषासारखे पुरुष हे; पण अगदीं दळूबाईसारखं वागणं होत असतं! सदासर्वकाळ स्त्रियांचे पोषाख करून नट्टापट्टा करायचा होतो! अशा नवऱ्याची बाईल होण्यापेक्षां मरणं फार बरं! केव्हां बरं स्वारीचा स्वभाव बदलेल? अलीकडे तर नाचणं व गाणं हेंच आवडूं लागलं आहे, राज्यकारभाराकडे मुळींच लक्ष नाहीं! इश्श! काय मेली हौस तरी! परवां परवां तर मलाच पुरुषी वेष देऊन आपण संपूर्ण स्त्रीवेष घेतला नी लागले नाचायला! देवा! कधीं बरं हे ताळ्यावर येतील?

**शृंगार**—दिल्लीपतीची भेट या पोषाखांत घेऊं कीं या यवनी पोषाखांत घेऊं ? तुर्कस्तानची परी बनून जाऊं कां रजपुताची रमणी होऊन जाऊं ? मराठमोळ्यांतील गजरा होऊं का एखादी प्यारी बेगम होऊं ? शहानशहा कोणत्या रिवाजावर बेहोष होईल ? शहाजहान बादशहाचा शोक मला माहीत होता; परंतु औरंगजेबाचा शोक मला तरी कुठें माहीत आहे ? पण नसला तर नसला ! त्यांत काय विघडणार आहे ? मी जुनापुराणा बंदा परवर तमाम खानखानांच्या मोहबतींतला आहे. तेव्हां मी जरी कोणत्याही पोषाखांत गेलों तरी मला मज्जाव होणार नाहीं. दिल्ली ! आहाहा ! दिल्लीची काय मजा वर्णावी ! दिल्ली म्हणजे वैकुंठ ! त्या वैकुंठाची सर वरच्या वैकुंठाला यायची नाहीं ! दिल्लीपतीचें दर्शन रोज ज्यांना घडत असेल ते खरोखर भाग्याचे ! दिल्लीच्या दरबारचें हुजऱ्या व्हावें; पण कोणत्याही रियासतीचा राजा होणें नको. आतां दिल्लीला गेलों म्हणजे मेल्यावरही परत येणार नाहीं !

**प्रीति**—दिल्लीला अशाच वेषानं जाणार ना ?

**शृंगार**—हो, याच वेषानें. अग, याशिवाय दुसरा वेष दिल्लीला प्रिय नाहीं. वैभवांत विलसणारी ती दिल्लीपतीची नगरी म्हणजे अमरपुरी आहे ! तिची योग्यता फार मोठी आहे !

[गजल.]

**मनास मुदित करी देहभान नुरवी ती ॥ध्रु०॥ खचित राशी जी नरा नरास मोहोनी ॥ हुजूरनगरी देवी दुजी ही माझी ती ॥ पुनित माता जी सुखासुखास ओपीती ॥ १ ॥**

**प्रीति**—पुरे झालं हें रडगाणं !

**शृंगार**—हें रडगाणें ? तुझी आपली गाण्याच्या नांवानें नेहमींच रड असते म्हणा !

**प्रीति**—हो. माझं आहेच तसं ! पण आपण पुरुषार्थाच्या नांवानं ?

**शृंगार**—अग, पुन्हा त्या पुरुषार्थाचं नांव काढूं नकोस !

**प्रीति**—तें कां ?

**शृंगार**—कां ? अग, तें नांव ऐकलें कीं, माझी ही मर्द छाती धडधडूं लागते.

चुकून स्वप्नांत एखादी वीरकृति माझ्या हातून होऊं नये म्हणून मी वीराच्या वाऱ्यालाही उभा राहत नाहीं !

प्रीति—पुरुषाला पराक्रमाचं वावडं असतं असं मला इकडच्या कृतीवरून पूर्णपणं पटलेलं आहे.

शृंगार—तें तसेंच सगळ्या बुंदेलखंडाला पटावें म्हणूनच मीं सारखी अशी धडपड चालविलेली आहे. ज्यावेळीं तमाम बुंदेला माझ्या वळणावर जाईल, तेव्हांच बुंदेल्यांत शांततेचें साम्राज्य पसरेल. बुंदेल्यांत शांतता प्रस्थापित व्हावी हेंच माझें आग्रहानें म्हणणें आहे.

प्रीति—अशा प्रकारची शांतता म्हणजे प्रेताचा शृंगार होय.

शृंगार—वाः ! काय पण राणी आहेस ! बुद्धीची आणि तुझी फारकत झाली आहे वाटतें ?

प्रीति—माझी बुद्धि अगदीं शाबूद आहे; पण आपल्याच बुद्धीचं दिवाळं निघालेलं दिसतं !

शृंगार—प्रमाणाबाहेर गेलेल्या शृंगारिक माणसाच्या बुद्धीचें दिवाळें हें निघायचंच.

प्रीति—तुमच्याशीं बोलायचें म्हणजे मूर्खाशीं उरस्फोडच होय !

शृंगार—अग, तूं पतिव्रता ना ?

प्रीति—आहें कीं नाहीं तें परमेश्वरालाच माहीत !

शृंगार—अग, शृंगार-प्रीतींत परमेश्वर कशाला ?

प्रीति—देवांना नसतात वाटतं रसिकविलास ?

शृंगार—तें देवलोकीं गेल्याशिवाय कसें समजणार ?

प्रीति—आतां तेवढाच पराक्रम करायचा बाकी आहे !

शृंगार—पुन्हा त्या पराक्रमाचें नांव काढूं नकोस ! तें कांहीं नाहीं ! मीं दिल्लीहून परत येईपर्यंत तुला या धारीर रियासतींत एक सुधारणा केली पाहिजे !

प्रीति—राजा असा असला कीं राणीलाच राज्यकारभार करावा लागतो.

शृंगार—संसाराचें राज्य ज्याप्रमाणें स्त्रिया करतात त्याप्रमाणें राज्याचा संसारही त्यांनीं कां करूं नये !

प्रीति—पण आपल्याला संसाराचा कंटाळा आला आहे ना ?

शृंगार—पुरुषी संसाराचा मला कंटाळा आला आहे; आणि म्हणूनच मी तुला एक सुधारणा करावयास सांगणार आहें!

प्रीति—कळूंद्या तरी आपली अक्कल!

शृंगार—एकूण मला अक्कल आहे तर!

प्रीति—नुसती आहेच कां, ती तर वाहती आहे!

शृंगार—वाहणारी अक्कल फार चांगली! सांचलेल्या पाण्यापेक्षां वाहणारें पाणी जसें अधिक फायदेशीर, त्याप्रमाणें सांचलेल्या बुद्धीपेक्षां वाहवत असलेली बुद्धि अधिक फायदेशीर!

प्रीति—काय कामगिरी सांगणार आहांत मला? असेल झालं नवीन गोष्टींतला नवा धडा!

शृंगार—हें काम करायला मी दोन पायांवर नेहमींच तयार असतों. मी परत येईपर्यंत तूं असं कर—

प्रीति—कसें करूं?

शृंगार—कसं करूं आणि काय करूं असा रडवा कर्मयोग मला मुळींच आवडत नाहीं.

प्रीति—कर्मानं असा योग आणला त्याला मीतरी काय करूं?

शृंगार—किती दुबळया दिलाची बायको आहेस ग?

प्रीति—नवऱ्याचं असल दुबळं दिल म्हणजे बायको असायचीच हवालदील!

शृंगार—दिलाचा हवाला दुसऱ्याकडे देण्याचा आमच्या कुळांतला पिढीजातपणा आहे. स्त्रियांनीं आपलें दील द्यावें, पुरुषांनीं दिलाचा होम करून दिलदार बनावें! माझे परमपूज्य बायकी वडील आणि पुरुषी माता यांनीं दिलाच्या दिवाळींत फाल्गुनमास केला होता बरें!

प्रीति—वडिलांचे सारे गुण इकडच्या अंगांत उतरले आहेत.

शृंगार—अशी अंगावर येऊन अंगचोरपणा करूं नकोस! वडिलांचे सारे गुण अद्याप माझ्या अंगीं उतरले नाहींत. अग, त्यांच्यांत आणि माझ्यांत फार अंतर आहे त्यांनीं उतारवयांत अंगचोरपणा केला; पण मी भरतीच्या भरांत अंग झाडून मोकळा झालों आहें. आतां अंगावर येण्याची अगर जाण्याची गोष्टच नको.

प्रीति—विषयांतर करूं नका!

शृंगार—अंतर्गृहांतला विषय हा माझा विशेष आहे. तुझ्या माझ्यांत जरी

तूं अंतर ठेवून वागत असलीस तरी समान्तर काटकोनांत येण्याचा माझा दृष्टिकोण मी मेल्यावरही बदलणार नाहीं! प्रीति, अग या लिंगांतरांत सदैव लोळावें, नटावें, रुसावें, हंसावें, असें मला वाटतें.

**प्रीति**—मला किनई तुमच्या वात्रटपणाचा कंटाळा आला आहे.

**शृंगार**—अग, हा का वात्रटपणा आहे? चावट कुठली! कांहींतरी बोलतेस झालें.

**प्रीति**—इकडून असं कांहींतरी करणं होतं मग माझ्यानं कांहींतरी बोलल्याशिवाय मुळींच राहवत नाहीं.

**शृंगार**—कांहींतरी करायला मी का उभयान्वयी अव्यय आहें, कीं तिसऱ्या वर्गांतला तृतीयपुरुष आहे?

**प्रीति**—पुरुषाच्या वर्गवारींत तुमचा दर्जा कोणता आहे हें सगळ्या लोकांना माहीत आहे. त्याची वाच्यता कशाला!

**शृंगार**—एवढेंच एक आतां प्रसिद्धीला साधन उरलें आहे. बरें तें असूंदे. मी दिल्लीहून परत येईपर्यंत तूं धारीरच्या रियासतींत पुल्लिंगी अक्षरांची एकदम हकालपट्टी कर! विष्णु, शंकर या देवळांतले देव काढून त्यांच्याजागीं म्हाळसा, जगदंबा, आदिमाया यांच्या प्रतिमा ठेव!

**प्रीति**—हें काय भलतंच बोलणं!

**शृंगार**—तूं सती ना? मग माझी प्रत्येक आज्ञा तूं शिरसामान्य केलीच पाहिजे.

**प्रीति**—देवा! अशा पतीची सती होण्यापेक्षां मरण बरं!

**शृंगार**—मरण बरं! अग, आतां मरणाची इच्छा कां? बाकी माझ्यासारख्या पतीच्या पत्नीचें जीवन म्हणजे जिवंतपणचें मरणच होय! बरं, मी दिल्लीला निघालों आहें. परत येईपर्यंत गांवाबाहेरच्या महाकालीला लक्ष वाती लाव!

**प्रीति**—तिकडून केंव्हां बरं परत येणं होईल?

**शृंगार**—परत फिरलों म्हणजे येईन.

**प्रीति**—तोंपर्यंत मी एकटी कशी राहूं?

**शृंगार**—विरहावस्थेचे तुला धडे मिळालेच पाहिजेत. तूं अशा स्थितींत राहिलीस म्हणजे माझ्या विरही मनांत आणि तुझ्या विरही अंतःकरणांत काय फरक आहे हें ताडून पहावयास ठीक पडेल. बरें, मला ओंवाळ—निरोप दे—पोंचव!

[ कवाली.]

प्रीति—

जा मोर्दे बाई नटुनि थटुनी प्रिय पांखरा ॥ हंसुनी
कथितें प्रेमें गोजिरा ॥ ध्रु० ॥

शृंगार—

घेवोनि यवनिवेष हा चकवीन शहा सुजा ॥ दिन-
रात रिझवी प्रियकरी बांदी जशी प्रजा ॥ फेंकी कटाक्ष
मोहक झुलवीन जहांपन्हा ॥ राजा खरा सुधाकर मी
राणी वने असा ॥

प्रीति—

याचपायीं नशिबाचे पुरे हाल हे ॥

शृंगार—

याचपायीं नशिबाचा पुरा लाल हा ॥

प्रीति—

त्यजुनि विचार हे वराल गुण गंभिरा ॥
हंसुनी करीन प्रेम साजिरा ॥ १ ॥

[ प्रीति आरती ओंवाळते व त्याला पोंचवते.

---

## प्रवेश तिसरा

[ पात्रें—चंपतराय, हिरादेवी व विजया.]

चंपतराय—दिल्लीपतींनीं छत्रसालाला इतक्या निकडीनें कां बोलावलें याचा अद्याप मला उलगडा होत नाहीं. या बोलावण्यांत कांहीं दगाफटका तर नसेलना ? औरंगजेबाचीं सर्व कारस्थानें मला माहीत असल्यामुळें मन जरा साशंक होतें. त्यानें जर छत्रसालाला कांहीं दगाफटका केला, तर त्याचा सूड उगविल्याशिवाय मी राहणार नाहीं. दिल्लीच्या सिंहासनाकरतां बुंदेलवीरांनीं आजतागायत आपलें

रक्त सांडलेलें आहे. याची औरंगजेबाला जाणीव असलीच पाहिजे. दिल्लीश्वराचें आणि माझें जें हाडवैर आहे तें फक्त त्याच्या स्वातंत्र्यापहारबुद्धीशीं. तुमच्या मातृभूमीचें स्वातंत्र्य मी हरण करणार नाहीं, असें त्यानें जाहीर फर्मानानें जाहीर केलें कीं, मी त्याचा दोस्त झालों. माझा स्वातंत्र्याचा संदेश त्याच्या कानीं ज़ाऊन तडजोडीकरतां तर त्यानें छत्रसालाला बोलावलें नसेल ना ? कांहीं असो. तूर्त त्या बाबतीकडे लक्ष देऊं नये ! छत्रसाल सिंहाचा छावा आहे, त्याची काळजी करण्याचें कारणच नाहीं ! अगोदर घरांतल्या शत्रूंचा विचार आणि मग परक्यांचा समाचार ! त्या हिरादेवीला आणि सभाकरणाला निर्वाणीचा खलिता पाठविलाच आहे. त्या देशद्रोह्यांनीं जर त्याचें उत्तर पाठविलें नाहीं तर लढाईची नौबद आतां झडते आहे तशीच झडेल. त्यांच्या हालचालीवर गुप्तपणानें नजर ठेवण्याची कामगिरी दलपत-कडे सोंपवलीच आहे. पहावें काय होईल तें ! पण ही कोण—

हिरादेवी—चंपतराय !

चंपतराय—कोण हिरादेवी ! चंपतरायाला नेस्तनाबूद करण्याची घनघोर प्रतिज्ञा करणारी हिरादेवी ! बुंदेलखंडाला आजन्म गुलामगिरीच्या गर्तेत खिचपत ठेवण्याचा कुटिल प्रयत्न करणारी हिरादेवी राजद्रोही चंपतरायाच्या महालांत कां ? हें कांहीं बुंदेलखंडाच्या स्वातंत्र्याविरुद्ध गुप्त कट करण्याचें ठिकाण नव्हे !

हिरादेवी—(स्वगत) मेला कसं अंतःकरणाला घरं पडणारे शब्द बोलतो आहे. पण करायचं काय ? आपल्या ध्येयाकरितां तें निमुटपणं सहन केलंच पाहिजे. परिस्थितीशीं जमतं घेतल्याशिवाय कार्याचं फळ मिळत नसतं.

चंपतराय—कां ? अशी स्तब्ध कां ? गुप्त हल्ला करून मला नेस्तनाबूद करावयाचें आहे, कीं राजरोसपणें माझ्या वाड्याला वेढा द्यावयाचा आहे ?

हिरादेवी—चंपतराय, तुमचा आमच्याविषयीं निष्कारण गैरसमज झाला आहे.

चंपतराय—गैरसमज ! गुप्त कटाचा स्फोट झाला असून देखील माझाच गैरसमज ! स्वातंत्र्याच्या नरडीला नख लावणारे तुम्ही, तुमच्याविषयीं कसला गैरसमज ? माझ्याबद्दल मात्र तुमचा गैरसमज झाला आहे. दिलजमाईनें स्वातंत्र्याचा लढा लढविण्याकरितां मी तुम्हांला देशप्रेमानें प्रेरित होऊन आमंत्रण पाठविलं, त्याचा भलताच अर्थ घेऊन तुम्हीं आपला गैरसमज करून घेतला आहे. तुम्हां राजेरजवाड्यांचें असें मत झालें आहे कीं, मी एकछत्री राज्य करतों आहें.

हिरादेवी, बुंदेलखंडाला जर आज स्वातंत्र्य मिळत असेल, तर मी आजच्या घटकेला मरायला तयार आहें! स्वातंत्र्यप्राप्ति हेंच वीरांचें जिवंत स्मारक आहे. व्यक्तीच्या माहात्म्याची तुम्हांला किंमत आहे. पण मला राष्ट्रीयत्वाची किंमत आहे. व्यक्ति बुडाली तरी चालेल; पण राष्ट्र स्वतंत्र झालें पाहिजे.

हिरादेवी—चंपतराय, क्षमा करा! अधिक बोलून माझ्या दुःखावर डागण्या देऊं नका! मी आज आपल्या दर्शनाला आपली वैरीण म्हणून आलें नसून आपल्या कार्यांत मदत करणारी मैत्रीण म्हणून आलें आहें.

चंपतराय—खरोखर जर अशा पवित्र उद्देशानें तूं आली असशील तर मला स्वर्गीय आनंद वाटेल; पण—

हिरादेवी—माझं गतवर्तन शंका घेण्याजोगं असलं तरी आतां माझं अंतःकरण साफ झालं आहे. साफ दिलानं मी आपल्या मुलाखतीला आलें आहें.

चंपतराय—खरोखर कां तुझं दिल साफ झालेलं आहे? माझी खात्री पटत नाहीं म्हणून विचारतों आहें.

हिरादेवी—माझं एकटीचं काय, पण सभाकरणाचं दिलही तुमच्याविषयीं साफ झालेलं आहे.

चंपतराय—सभाकरणाचें देखील?

हिरादेवी—हो; त्यांचं देखील!

चंपतराय—असें जर असेल तर माझ्या स्वातंत्र्याच्या संदेशाप्रमाणें जरीपटक्याखालीं या! तेव्हांच मला या सर्व गोष्टी खऱ्या वाटतील! एरव्हीं माझ्या दिलाची खातरजमा होणार नाहीं!

हिरादेवी—आपल्या व आमच्या दिलजमाईचा समारंभ करण्याचं ठरलं आहे. उद्यां माझ्या वाड्यांत मोठा समारंभ करण्याचं आमच्या राजमंडळांनीं ठरविलं आहे. मी मुद्दाम आमंत्रण देण्याकरतांच आलें आहें. छत्रसाल कुठं आहे?

चंपतराय—दिल्लीला गेला आहे!

हिरादेवी—असं काय बरं कारस्थान असावं? मग काय याल ना समारंभाला?

चंपतराय—हो! हो! अवश्य येईन! ज्याअर्थी तुमची व माझी दिलजमाई होत आहे तर मी माझा सारा अभिमान—अपमान बाजूला ठेवून अवश्य तेथें हजर राहीन.

हिरादेवी—मग येऊं ना मी?



**चंपतराय**—व्यक्ति बुडाली तरी चालेल; पण राष्ट्र स्वतंत्र झालें पाहिजे.

[ पृष्ठ ८०

**चंपतराय**—या. (हिरादेवी जाते. ) एकंदरींत होत आहे तें सर्व ठीकच आहे. कोणत्याना कोणत्या उपायानें आपसांतील वैरभाव जर मिटेल, गृहयुद्धाचा प्रसंग टळेल तर फारच बहार होईल. हिरादेवी म्हणते त्याप्रमाणें जर खरोखर दिलजमाई होत असेल, तर आमची सर्व शक्ति परवशतेशीं झुंजायला फारच उपयोगीं पडेल.

**विजया**—बाबा, कसला विचार करतां ? दादा दिल्लीला गेला त्याच्याबद्दल का विचार करतां ?

**चंपतराय**—बेटा ! तुझा दादा सिंहाचा छावा आहे ! त्याच्यासंबंधानें विचार करण्याचें कांहींच कारण नाहीं. प्रत्येक रजपूत बच्चा आपलें स्वतःचें संरक्षण करायला समर्थ असतो !

**विजया**—मग विचार कसला करतां, बाबा ?

**चंपतराय**—विचार-आतां विचार फक्त परशत्रूशीं लढण्याचा.

**विजया**—घरांतल्या शत्रूंचा निकाल लागला वाटतं ?

**चंपतराय**—हो; लौकरच लागणार आहे.

**विजया**—हिरादेवी इथें आली होती ? आश्चर्यच म्हणायचं ! नागिणीची स्वारी आज आमच्या राजवाड्यावर कां ? कांहीं तरी नवंच कारस्थान असेल.

**चंपतराय**—कारस्थान कसलं ? विजये, हिरादेवी कारस्थानाकरितां आली नव्हती.

**विजया**—मग कशाकरितां ?

**चंपतराय**—त्या राजमंडळाची आणि आमच्या पक्षाची दिलजमाई व्हावी, अशी तडजोड करण्याकरितां ती मुद्दाम येथें आलेली होती. उद्यां याकरितां दिलजमाईचा प्रचंड समारंभ होणार आहे.

**विजया**—बाबा, मला तर कारस्थान दिसत आहे. एकाएकीं हे सारे राजे-लोक आपल्याशीं दिलजमाई करतील असं मला वाटत नाहीं ! बाबा, यांत कांहीं तरी निराळाच डाव असला पाहिजे. वरवर जरी दिलजमाई होत असली तरी तसल्या वृत्तीच्या हृदयाची जखम इतक्या लौकर भरून निघेल असं मला वाटत नाहीं. बाबा, या वृत्तीचीं माणसं फार भयंकर असतात.

[ राग—कॉफी; ताल—त्रिवट.]

**रसनीं सुधा मधु मान्यता ॥ जरी मोद भावे मनिं अन्य बाधा ॥ ध्रु० ॥ विषारी मनाची गती ही दिसेना ॥ विधाता अशांना जनिता वसुधा ॥ १ ॥**

बाबा ! उद्यांच्या आतिथ्यसत्कारामुळं तुमचं अंतःकरण संतुष्ट झालेलं दिसतं; पण त्यांत भयंकर कारस्थान आहे, अशी माझी मनोदेवता मला सांगत आहे !

चंपतराय—छे ! छे ! वेटा ! ही तुझी दिशाभूल होत आहे ! सभाकरण आणि हिरादेवी यांच्या अंतःकरणांतील स्वातंत्र्यविरोधाची अमावास्या अस्ताला जाऊन त्या ठिकाणीं स्वातंत्र्याची चारु-चंद्रिका उदयाला आलेली आहे. त्यांनीं आपसांतील वैरभावाला तिलांजली दिलेली असून सर्व बुंदेले वीर एकत्र व्हावेत अशा पवित्र भावनेनें ते प्रेरित झालेले आहेत. आणि येवढ्याचकरितां माझ्या अंतःकरणांत संतोषाच्या उर्मी उसळत आहेत. बेटा ! आतां कालची हिरादेवी आज राहिलेली नाहीं. आज तिचें परिवर्तन झालेलें आहे.

विजया—बाबा, तुम्ही कांहीं म्हणा ! माझ्या मनाची कशीही समजूत घाला ! मला हा स्वागतसमारंभ, मृगजलाप्रमाणं भासतो आहे. उद्यांच्या स्वागतसमारंभांत सगळा मायावीपणा आहे. तुमच्या भोळ्या भावनांप्रमाणं अंतःकरणाला त्यांचे डाव समजत नाहींत. भावनाप्रधान अंतःकरण हें राजकारणांत उपयोगीं नाहीं.

[ राग—कानडी; ताल—केरवा.]

**न जाणे जीवा कावा खरा ॥ ध्रु० ॥ ना योग्य माना न भावना ॥ राजकाजा विरा ॥ सरळ वृत्ती भोळी ॥ मुलींना कुकाळीं ॥ फसवीं कार्यभारा ॥ १ ॥**

बाबा, या स्वागतसमारंभांत प्रेमाचा मुळींच संबंध नाहीं.

चंपतराय—वेटा, असल्या बुद्धिभेदामुळेंच महोबाचें आणि ओरछाचें हाडवैर वाढीला लागलें. परक्या वाणीवर विश्वास ठेवला म्हणजे वैरत्वाचा अग्नि बेफाम भडकून मैत्रीच्या सुंदर वृक्षाची राखरांगोळी करतो. एकादिलानें स्वातंत्र्याकरितां प्रयत्न करण्याची सुसंधि तुझ्यासारख्या अप्रबुद्ध मुलीच्या उपदेशानं दवडण्याइतका मी वेडा नाहीं.—जा—विजये—जा—हा चंपत उद्यां स्वागतसमारंभाकरितां जाणारच.

[ जातो.

विजया—गेले! बाबा रागानं निघून गेले! आजच्यासारखा त्यांनीं माझा कधींच धिक्कार केला नव्हता! सरळ वृत्तीमुळं त्यांनीं माझा धिक्कार केला असेल, नाहीं ? हो. याशिवाय दुसरं कोणतं बरं कारण असणार ? सरळ वृत्तीचीं जीं माणसं असतात त्यांना कारस्थानं पटत नाहींत; त्यांचा विश्वास वाटेल त्याच्यावर चट्कन् बसतो; पण हें जग अशा सरळस्वभावी लोकांकरितां नाहीं! हें जग कारस्थानं नि डावपेंच खेळणाऱ्या कुटिल लोकांकरितां आहे, हें बाबांना कसं समजत नाहीं. बाबा! तुमच्या सरळ स्वभाववृत्तीनं तुमचं आजपर्यंत अनन्वित नुकसान झालेलं आहे. हें कसं तुमच्या लक्षांत येत नाहीं? कुठं स्वातंत्र्याच्या पवित्र भावनेनं उल्हसित झालेलं तुमचं उदार अंतःकरण, नि तुमचा सर्वस्वीं नाश करावा म्हणून कुटिल कल्पनांनीं कलंकित झालेलं हिरादेवीचं अंतःकरण! सरळ अंतःकरणाला कुटिल अंतःकरणाची ओळख कशी पटावी? सरळ अंतःकरणाची ओळख सरळ अंतःकरणालाच पटत असते. बाबा, जगाचा कुटिल कावा असा आहे बरं!—

[ राग–दुर्गा; ताल-त्रिवट.]

**स्वानंदराशी प्राणगणीं ॥ वंचित कुलटा आमिष**
**भासवुनी ॥ ध्रु० ॥ प्रेम विमल वचनीं तदांतरीं ॥ पिता**
**भुलविला खलांतरीं ॥ वैरभाव पसरे निरंतरीं ॥ होत**
**वैरी रण-रंगणीं ॥ १ ॥**

तें कांहीं नाहीं! बाबांच्या स्वागतसमारंभाला विमलदेवांच्या मदतीनं तयार रहावं—आणि जर कांहीं दगाफटका झाला तर त्यांचे प्राण वांचवावे!

[ जाते.

## प्रवेश चवथा

[ **स्थळ**—औरंगजेबाची खासगी बैठक. पात्रें—**औरंगजेब व शृंगार.**]

**औरंगजेब**—बुंदेलावर मी स्वारी करणार अशी नुसती आवई पसरतांच त्या चंपतरायानें लढाईची कडेकोट व्यवस्था चालविल्याचें नुकतेंच मला कळलें आहे. बुंदेलखंडांतल्या निरनिराळ्या राजेरजवाड्यांत वैमनस्य आहे हें माझ्या कार्याला

एक प्रकारचें सुचिन्हच होय! चंपतरायाचा आणि सभाकरणाचा असे दोन भयंकर तट सध्यां अलम बुंदेलखंडांत पडलेले आहेत. अशा वेळीं आपली राजनीति लढवून तमाम बुंदेल्याला आपलें सार्वभौमत्व पत्करायला लावलें पाहिजे. बुंदेल्यांचें स्वातंत्र्य नष्ट व्हावें अशी माझी इच्छा नाहीं, फक्त आमचें सार्वभौमत्व त्यांनीं कबूल करावें हीच माझी इच्छा आहे. छत्रसालला एवढ्याच मसलतीकरितां जारीचें फर्मान पाठविलें आहे! तो आल्यावर या गोष्टीचा कायमचा निकाल लावून टाकूं.

सेवक—हुजूर! बुंदेलखंडाहून एक राजा मुलाखतीला आला असून परवानगी मागतो आहे.

औरंगजेब—बहुतकरून छत्रसाल असेल! जा त्याला आंत सोडून दे.

[ सेवक मुजरा करून जातो.

शृंगार—बंदगी, गरीबपरवर! बंदगी! बंदा बंदगी करतो आहे हुजूर!

औरंगजेब—कोण? धारीरचे राजे शृंगार! या बसा!

शृंगार—छेः! छेः! हुजूर, बंद्याला इतका मोठेपणा कशाला? मी आपल्या कदमापाशींच बसतों!

औरंगजेब—अहो, तुम्ही राजे आहांत ना?

शृंगार—हुजूरच्या भेटीला येण्यापूर्वीं मी माझें राजेपण माझ्या राणीच्या हवालीं करून आलों आहें, हुजूर!

औरंगजेब—तुमच्यासारखे राजे आम्हांला फार आवडतात बुवा!

शृंगार—निरुपद्रवी प्राणी आणि आमच्यासारखे राजे सारखेच असतात, हुजूर!

औरंगजेब—बरं, कां आलां होतां इतक्या तातडीनं?

शृंगार—हुजूर! आपल्याला माहीतच आहे कीं, मी राजनिष्ठ आहे, स्वातंत्र्याचा कट्टा शत्रु आहें, स्वराज्याचा काळ आहें! सध्यां बुंदेलखंडांत आपल्याविरुद्ध चंपतरायानें बंडाचें निशाण उभारलेलें आहे. तेव्हां ही बातमी कळवावी म्हणून आणि हा खलिता द्यावा म्हणून मुद्दाम धांवत आलों आहें, हुजूर!

औरंगजेब—कुणाचा खलिता आहे हा?

शृंगार—मजकूर वाचण्यापूर्वीं सह्या पाहिल्या म्हणजे समजेलच हुजूरला!

औरंगजेब—(खलिता वाचतो) शाबास! हिरादेवी, सभाकरण आणि इतर राजे आमच्या मदतीला यायला तयार आहेत, ही आनंदाची गोष्ट आहे. त्यांच्याकडून

चंपतरायाचा कांटा काढून टाकला पाहिजे. चंपतराय आमच्याविरुद्ध बंड करतो काय ?

**शृंगार**—परवां तर आपल्या एका टोळीला त्यांनीं गिरफदार केलें होतें ! हुजूर ! त्यावेळीं मला अतिशय रडूं आलें. हुजूरपक्ष व त्यांतील माणसें म्हणजे मला परमेश्वरापेक्षां प्यार. त्यांना तकलीफ झाली तर मला कां बरें रडूं येणार नाहीं ?

**औरंगजेब**—त्या लोकांना सोडून देण्याऐवजीं तुम्हीं रडक्या सुरतीनें हें सांगायला इथें आलांत ? बेवकूफ कुठले !

**शृंगार**—बेवकूफ ! आहाहा ! ह्या हुजऱ्याच्या गौरवाबद्दल बंदा निहायत खूष आहे !

**औरंगजेब**—पागलपणाची कमाल आहे अगदीं ! असले राजे असले म्हणजे अंदाधुंदीला ऊतच यावयाचा. शृंगार !

**शृंगार**—जहापन्हां—

**औरंगजेब**—तुमच्या या कामगिरीबद्दल आम्ही तुमच्यावर खूष झालों आहोंत. जे राजे आम्हांला कुमक पाठविणार आहेत, त्यांना आमचा शुक्रियादा कळवा. त्यांच्या राजनिष्ठेचें फळ आम्ही त्यांना लौकरच देऊं.

**शृंगार**—त्यांना इतर राजनिष्ठेचें फळ हवें तेव्हां द्या; पण या बंद्याला आपल्या कदमाची सेवा करायची पुन्हा एकवार परवानगी द्या. शहाजहान बादशहाच्या वेळेपासून माझी चाकरी दरबारीं रुजूं आहे.

**औरंगजेब**—तुमची सेवा आमच्या दिलांत आहे. आम्ही तुम्हांला विसरलों नाहीं. शृंगार राजे, तुमची सेवा विसरणें म्हणजे जनानखाना विसरण्यासारखेंच आहे !

**शृंगार**—नाहीं; हुजूर मला तसें विसरणार नाहींत, पण पुन्हा अर्ज पेष केला इतकेंच.

**औरंगजेब**—तुमचा अर्ज दप्तरीं दाखल केला आहे.

**शृंगार**—बंदा निहायत खूष आहे. बरें, घेऊं रजा ?

**औरंगजेब**—या. सांगितल्याप्रमाणें आमचा निरोप राजमंडळाला कळवा. थांबा ! हें शिक्कामोर्तबाचें फर्मानच घेऊन जा.

[ फर्मान देतो. शृंगार तीन वेळां नमस्कार करतो.]

**शृंगार**—येतों अं हुजूर.—

[कवाली.]

पद सलामत असो नत विनवी खुदा तरकारा ॥
झुकुनी करतोंही पदा कुर्नीसात बंदा हा ॥ हाच खरा
यजमानचांद दिल्लीनभीं भासे हा ॥ १ ॥

औरंगजेब—अनायासें हें बरेंच झालें ! राजमंडळाचा पाठिंबा मिळाला हा शुभयोगच आहे. चंपतरायांनीं आमच्याविरुद्ध बंडाचें निशाण उभारलेलें आहे ! ठीक, त्याची व्यवस्था अगोदर केली पाहिजे. छत्रसालची मुलाखत घेऊन त्याच्या दिलाचा अंदाज पहावा आणि मग या मसलतीचा शेवट लावावा. राजमंडळाला ताबडतोब स्वदस्तुरचें पत्र पाठवून त्यांना तयारींत रहावयास सांगावें. चंपतरायाचा पुरा विध्वंस केल्यावर आपल्या देशाविरुद्ध आम्हांला मदत करणाऱ्यांचा विचार करूं.

[ जातो.

---

## प्रवेश पांचवा

[ पात्रें—विमलदेव व प्रीति.]

विमलदेव—विजया जवळ नसली म्हणजे मला अगदीं चुकल्यासारखें होतें मीं तिला अनेक वेळां सांगितलें होतें, कीं तूं माझ्याजवळून मुळींच दूर होऊं नकोस. अलीकडे पाहतों आहें, तों ती माझा तिटकाराच करते आहे. याचें काय बरें कारण असावें. कांहींच उलगडा होत नाहीं. मी स्त्री आहें, असें तिला सांगून टाकावें असें पुष्कळ वेळां माझ्या मनांत आलें. पण मासाहेबांचें रहस्य फोडण्याचं पातक मी माझ्या शिरावर घेण्यापेक्षां तें त्यांच्याच कृतीनें बाहेर आलें तर फारच मौज उडणार आहे. मला युवराज बनवून, पुरुष बनवून, ओरछाच्या सिंहासनावर आईसाहेब मला बसविणार आहेत ! काय ही राज्यतृष्णा !

प्रीति—विमले !

विमलदेव—विमले ! माझ्या मूळ नांवानें मला कोण बरें हांका मारीत आहे ?

प्रीति—आईशिवाय दुसरं कोण बरं हांक मारणार, बाळे ?

विमलदेव—आई ! दोन आया असल्या कीं असा घोटाळा होतो.

प्रीति—विमले, तूं नाहीं का मला ओळखलंस ?

विमलदेव—माझी ओळखदेखील मला रहात नाहीं, तेथें मी दुसऱ्याला कसें ओळखणार !

प्रीति—बाळे, मी तुझी आई-धारीरच्या राजाच्या नाशिवीं बांधलेली प्रीति !

विमलदेव—प्रीति ! मग तुझ्यावर कोणीही प्रीति करील. आई, तूं जर माझी हक्कानं पहिली आई असलीस तरी मानानं नाहींस.

प्रीति—तूं मानमरातबांत असलीस, म्हणजे मला सगळा मान मिळाल्या-सारखाच आहे.

विमलदेव—पण, काय ग आई, अशी मी पुरुषवेषांत कशी किती दिवस राहूं ? मला या पुरुषीकरणाचा कंटाळा आला आहे. नेहमीं पदर सांवरणारा हात या खड्गानें कलमबंद झाला आहे. कंचुकीनें सुशोभित होणाऱ्या या उरोभागावर या लष्करी पोषाखानें नुसती जबरदस्ती केलेली आहे. छेः ! छेः ! मला तें युवराजपद नको आणि हा पुरुषी थाट नको.

प्रीति—बाळे ! तुला जरी तें नको असलं तरी हिरादेवीला तें हवं आहे. तुला तिकडच्या संमतीनं गुप्तपणानं दत्तक घेऊन तिनं हा डाव टाकला आहे.

विमलदेव—पण माझ्या नव्या आईच्या या डावांत तिची डावी होणार आहे. चंपतरायांना ही सर्व हकीगत सांगून मी याचा स्फोटच करणार आहें.

प्रीति—बाळे, असं करूं नकोस ! धारीरचं राज्य इकडच्यानंतर खालसा होणार असल्यामुळं कुठल्यातरी राजाची मीं राजमाता व्हावं अशी माझी इच्छा असल्या-मुळं मी या मुलीच्या दत्तविधानाला सम्मति दिली बरं.

विमलदेव—पण माझ्या पहिल्या घरचे बाबा कुठें आहेत ?

प्रीति—गेले असतील दुसऱ्यांच्या घरीं ! त्यांना दुसऱ्याच्या घरीं नेहमीं बरं वाटतं.

विमलदेव—स्वतःचें घर बरें नसलें म्हणजे दुसऱ्याचें घर नेहमीं बरें वाटत असतें. पण सांगना ते कुठें आहेत ? कुठल्या स्वारीवर कां गेले आहेत ?

प्रीति—स्वारी ! आहाहा ! दिसतच आहे त्यांचं शौर्य स्वारी करण्याचं ! विजया-दशमीला शिलंगणाला जातांना देखील घोड्यावर जबरदस्तीनं बसवावं लागतं ! नाहीं ग बाळ ! त्या बाबतींत ही तुझी आई दुर्दैवी आहे. आतां दिल्लीहून आल्या-वर मीच त्यांना लढाईचं शिक्षण देणार आहें.

विमलदेव—त्यांना जरूर शिक्षण दे !

प्रीति—पण हिरादेवी कुठं आहे ?

विमलदेव—नव्या आईसाहेब ना ? आज किनई चंपतरायांना मेजवानी आहे, तेव्हां त्या तयारींत गुंतल्या आहेत.

प्रीति—झाली वाटतं दिलजमाई ?

विमलदेव—दोन दिलांची जमाई होते केव्हां केव्हां !

प्रीति—तिकडून येणं झालं म्हणजे बोलावीन अं बाळ तुला; येशील ना ?

विमलदेव—जरूर येईन ! मलादेखील त्यांना भेटावयाचेंच आहे. पण कायग आई, स्त्रीवेषधारी बापाचा आणि पुरुषवेषधारी मुलीचा संगम, गंगाजमुनेच्या संगमाप्रमाणें होईल, नाहीं !

प्रीति—वेडी कुठली ! असं भलतंच बोलूं नये ! [ जाते.

विमलदेव—या आमच्या आईसाहेब ! काय करते बिचारी ! बाबा असे मवाळ निघाले म्हणून बिचारी सारखी झुरत असते. चालायचंच. जगाचा हा नियमच आहे. पति असला मवाळ कीं पत्नी असायचीच जहाल ! अगोदर बाबांच्या परपतिगमनाची नाजूक हकीगत विजयेच्या कानीं घालावी.

[ कवाली.]

**त्वरित सारी विजयकारी अविकारीं या ॥ ध्रु० ॥**
**सुज्ञ मानी यश निदानीं सुखद लालसा शिराणी ॥**
**अभिनव समया ॥ १ ॥**

---

## प्रवेश सहावा

[ **स्थळ**—औरंगजेबाचा खास महाल. पात्रें—औरंगजेब व छत्रसाल.]

औरंगजेब—छत्रसाल, आम्ही तुला मुलाखतीला बोलावलें याचें तुला आश्चर्य वाटलें असेल !

छत्रसाल—हो ! आश्चर्य कां वाटणार नाहीं ? माझे परमपूज्य वडील मोहबाचे स्वतंत्र सम्राट् चंपतरायजी विद्यमान असतां, ते तक्तनशीन असतां, आपण मला मुलाखतीला बोलावलेंत हें आश्चर्य नव्हे काय ?

औरंगजेब—चंपतराय जरी आजचे राजे असले, तरी तूं उद्यांचा राजा आहेसना ? झालें तर मग !

छत्रसाल—पण बादशहानें मेहेरनजर करून मला तातडीनें कां बरें बोलावलें ?

औरंगजेब—सांगतों ! अशी घाई नको ! छत्रसाल, तूं आणि तुझ्या पराक्रमी वडिलांनीं आमच्यावर फारच उपकार केले आहेत !

छत्रसाल—त्यांत उपकार कसले ! मित्रानें मित्रांना ऐनवेळीं मदत करणें हें त्याचें कर्तव्यच आहे. दिल्लीचे बादशहा बुंदेलखंडाच्या राजाच्या मैत्रीनें वागत होते तेव्हां त्यांच्याशीं बाबा व इतर राजे मैत्रीनें वागत होते !

[ राग-बागेश्री; ताल-एक्का.]

**उदार या विनयता रुचे न उपकृता ॥ ध्रु० ॥ सुहृद**
**रीती गणिता मति शुचिता ॥ जनपर व्रत करीं जरी ॥१॥**
**समान गण त्रिविधकाल त्यजुनी भेद करित सहाय ॥**
**नच धरितां मुळीं हिता गणित असुया ॥ २ ॥**

औरंगजेब—राज्याची बाबत सोडून दे ! तूं मला जिवावरच्या प्रसंगांतून वांचविलेंस, तेव्हां त्या उपकाराची फेड करावी, म्हणून मीं तुला निकडीनें बोलावलें आहे. छत्रसाल, काय हवें तें माग ! तें मी द्यायला तयार आहे.

छत्रसाल—फळाच्या आशेनें उपकार करण्यांत पाप होय ! आपली मेहेरबानी माझ्यावर रहावी म्हणून मीं आपल्या जिवावरचें संकट टाळलें नाहीं. कोणी एखाद्यावर आकस्मिक घाला घालीत असेल, तर अशा अन्यायी माणसाला यमसदनाला पाठवून दुसऱ्याला जीवदान देणें हें प्रत्येक रजपुताचें कर्तव्य आहे.

औरंगजेब—तें जरी खरें असले, तरी कोणाचाही फुकट उपकार घेऊं नये हें-ही तितकेंच खरें आहे. छत्रसाल, तुझ्या उपकाराचें ऋण या दिल्लीपतीच्या माथ्यावर आहे. आज तूं जर मला जिवावरच्या प्रसंगांतून वांचविलें नसतेंस, तर आज हा दिल्लीचा बादशहा म्हणून मिरवला नसताच, ज्याअर्थीं माझा पुनर्जन्म झाला आहे आणि तो केवळ तुझ्या वीरोचित गुणामुळें; त्याअर्थीं मला तुझा गौरव केलाच पाहिजे ! माग, दिल खुला करून माग. तें मी क्षणांत देऊन टाकीन. बोल, काय पाहिजे तुला ? दिल्लीचें वैभव, विलासनगरीचा विलास, खजिन्यांतील जडजवाहीर, मनसबदारी, पंचहजारी जहागिरी, काय पाहिजे तें माग !

**छत्रसाल**—बादशहा, तुमचा आग्रह आहे म्हणूनच मी मागतों आहें. त्या मागणीचा अव्हेर झाला तरी त्याची मला क्षिती नाहीं!

**औरंगजेब**—छे, छे! छत्रसाल, असें म्हणूं नकोस! अरे, माझ्या वजीरांना—खानखानांना जें करतां आलें नाहीं तें तूं केलें आहेस. अखिल विश्वाच्या साम्राज्यापेक्षां पूज्य असा जो माझा प्राण तो तूं मला दिला आहेस! मृत्यूच्या अभेद्य जाळ्यांत सांपडलेल्या माझ्या प्याऱ्या जीवाला तूं जीवदान दिलें आहेस.

**छत्रसाल**—बादशहा, मला कशाचीही जरूर नाहीं; माझ्या ऐहिक आवश्यकता सर्वतोपरी पुरविण्याची जिम्मेदारी माझ्या परमपूज्य पित्यावर असल्यानें त्याचीही मला आवश्यकता नाहीं. मला जें मागावयाचे आहे तें एकच!

**औरंगजेब**—माग, बेलाशक माग!

**छत्रसाल**—माझ्या देशाचें स्वातंत्र्य–माझी मायभूमि स्वतंत्र असावी–सर्व जनतेनें स्वातंत्र्याचें सौख्य उपभोगावें! दिल्लीपतीच्या वाऱ्यानें विझला जाणारा बुंदेलखंडाचा स्वातंत्र्यदीप विझूं नये! बुंदेलखंडाचें चैतन्य दिल्लीपतींनीं हिरावून घेऊं नये; इतकेंच नव्हे, तर बुंदेलखंडाच्या शिरोभागीं आपल्या तेजानें चमकणारा स्वातंत्र्यमुगुट तुझ्या साम्राज्यशाहीच्या पायीं चिरडला जाऊं नये, असें लेखी आश्वासन मला दे! कारण पारतंत्र्य ही पृथ्वीवरील पापाची दुर्गंधी आहे.

[ राग–शंकरा; ताल–एका.]

**परचरणधुळी दुता ॥ पदनता बरी दास्यता ॥ ध्रु० ॥**
**परतंत्रता ग्रहण महिला ॥ बरी मुक्तता विमल माता ॥१॥**

**औरंगजेब**—छत्रसाल, तुझें म्हणणें खरें आहे. मागणीही विचार करण्यासारखी आहे! दिल्लीपतीला बुंदेलखंडानें आजपर्यंत कमालीची मदत केली आहे.

**छत्रसाल**—या तक्ताच्या मजबुतीकरितां, सिंहासनाच्या खंबिरीकरतां, सोमगडच्या संग्रामांत बाप्पांनीं आपलें रक्त सांडलेलें आहे, प्राणदान आणि साम्राज्यदान आम्हीं पितापुत्रांनीं तुला दिलेलें आहे. याचा विचार करतां माझी मागणी धिक्कारली जाईल, असें मला मुळींच वाटत नाहीं.

**औरंगजेब**—(स्वगत) जबरदस्त पेंच घातला आहे यानें. वेड्या, तूं जरी माझा प्राण वांचविला असलास तरी तुझी भलती मागणी मी कबूल करीन हें कधींतरी शक्य आहे का?

**छत्रसाल**—माझी मागणी तुला पसंत पडणार नाहीं. स्वातंत्र्य हें भिक्षांदेहीनें कधींही मिळत नसतें, स्वातंत्र्याची चंद्रज्योत याचनेच्या फाल्गुनांत प्रकाशत नसते. तुझ्याकडून स्वातंत्र्याची प्राप्ति होणार नाहीं हें मी जाणून आहें. पण दिल्लीचा बादशहा आपल्या शब्दाला किती जागतो, व मनाचा किती सचा आहे, उपकारकर्त्यांची किती बरदास्त ठेवतो, हेंच पाहण्याकरितां मी स्वातंत्र्याचा संदेश ऐकवून मघांची मागणी केली आहे.

**औरंगजेब**—छत्रसाल, तूं तरुण आहेस, तुझा राष्ट्राभिमान वाखाणण्या-सारखा आहे. तूं केलेली मागणी मीं मनांत आणली तर ती सहज देईन; पण मी जर तुझा स्वातंत्र्याचा संदेश ऐकून, त्याप्रमाणें वर्तन केलें, त्या तर अल्लाच्या अदा-लतींत मी गुन्हेगार ठरेन ! तमाम विश्वावर माझ्या धर्माचा फैलाव व्हावा, सर्व जगावर आमचें साम्राज्य व्हावें, असा खुदाचा मला संदेश आहे. खुदाची आज्ञा मीं जर मानली नाहीं तर मी द्रोही ठरेन ! मला साम्राज्यापेक्षां, प्राणापेक्षां, माझ्या आवडत्या शहाजादीपेक्षां अल्लाची पाक आज्ञा अधिक आहे. मी त्या आज्ञे-पासून तसूभरही ढळणार नाहीं. अल्लाच्या इच्छेविरुद्ध मी कसा वरें जाऊं ! अलमदुनिया माझ्या खिलाफ झाली तरी चालेल; पण मी अल्लाच्या फर्मानाबाहेर कधींही वागणार नाहीं. जगावरचीं निरनिराळीं राज्यें काबीज करणे हें माझ्या जीविताचें ध्येय आहे. तमाम दुनियेवर इस्लामचा हिरवा चांद फडकत राहिला पाहिजे ! छत्रसाल, ज्याला ज्याला म्हणून स्वातंत्र्य हवें असेल, त्यानें त्यानें माझ्या धर्माचा स्वीकार केल्याशिवाय त्याला स्वातंत्र्यच काय; पण मूठभर सत्तेची जागा देखील मिळणार नाहीं !

**छत्रसाल**—असेंच, अगदीं अस्सेंच उत्तर उन्मत्त कौरवांनीं हक्कदार पांडवांना दिलेलें होतें, आणि या उत्तरामुळेंच घनघोर महाभारत होऊन कौरवकुलाचा निःपात झाला. तसा प्रसंग दिल्लीश्वरांनीं आणूं नये.

**औरंगजेब**—तसा प्रसंग आलाच तर अल्ला मला त्यांतही फत्ते करील ! छत्रसाल, अमिरी माग, वजिरी माग, वाटेल तें माग !—

**छत्रसाल**—माझी मातृभूमि स्वतंत्र असावी हाच माझा स्वातंत्र्याचा संदेश आहे.

**औरंगजेब**—मग आमचें सार्वभौमत्व कबूल कर !

**छत्रसाल**—सार्वभौमत्व कबूल करून तूं जर माझ्या मायभूमीला स्वातंत्र्य

देणार असलास तर ती मामुली गोष्ट आहे. तूं उपकाराची भरपाई अशानें करणार असलास तर ती मला नको आहे.

**औरंगजेब**—तुझी मागणी पुरी होणें शक्य नाहीं.

**छत्रसाल**—मग युद्धाशिवाय गत्यंतर नाहीं.

**औरंगजेब**—माझ्याविरुद्ध स्वातंत्र्याकरितां युद्ध करायला मी तुला मोकळा ठेवीन तरच ना ? कोण आहेरे तिकडे ? बांधा या हरामखोराच्या मुसक्या ! ठेवा तुरुंगांत ! ( त्याला बांधतात. )

**छत्रसाल**—उपकारकर्त्यांचा अशा रीतीनें सन्मान करणाऱ्या बादशहा, सत्याचाच अखेर जय होईल हें लक्षांत ठेव.

[ राग–अडाणा; ताल–त्रिवट. ]

**असत्या न विजया ॥ मिळत अंतीं त्या असुरी माया ॥ ध्रु० ॥ राजकारणा स्वार्थी दुर्मती ॥ योजी नित्य भाषा मधुतर अती ॥ फसवी भिन्न वचनांनीं महीपती ॥ धूर्त ह्या नीच अनया ॥ १ ॥**

---

## प्रवेश सातवा

[ पात्रें—दलपत आणि शृंगार. ]

**दलपत**—चंपतरायांनीं हिरादेवीच्या कारस्थानावर बारीक नजर ठेवण्याची अतिशय अवघड कामगिरी माझ्यावर सोपविली आहे. असल्या अवघड कामगिरी-पेक्षां रणांगणांत जाऊन शत्रूला चीत करण्याची कामगिरी फार सोपी आहे. वीराला मुत्सद्दीबुद्धि नसते आणि मुत्सद्द्याला वीराचा पराक्रम नसतो हें अगदीं खरें आहे. राज-कारणाचे डावपेंच मुत्सद्द्याच्या कारस्थानावर अवलंबून असतात आणि लढाईचें राज-कारण वीरांच्या खड्गावर अवलंबून असतें. मी जर खरा मुत्सद्दी असतों तर या हिरा-देवीचें कारस्थान मुत्सद्दी बुद्धीनें केव्हांच रसातळाला नेलें असतें. इतकी बारकाईनें चौकशी करतों आहें; परंतु हिरादेवीच्या कारस्थानाचा कांहींच सुगावा लागला नाहीं. परवांच्या कटाचा एकाएकीं स्फोट झाल्यामुळें तिनें कडेकोट बंदोबस्त



छत्रसाल—मग युद्धाशिवाय गत्यंतर नाही. [पृष्ठ ५२

ठेविला आहे. त्यामुळें कांहींच कळत नाहीं. एवढी गोष्ट खरी कीं, हिरादेवीच्या राजवाड्यांत कांहींतरी कारस्थानें चाललेलींच असतील. आपला एखादा गुप्त हेर जर तिकडे पाठवला तर तीही पंचाईत! मी यवनी वेष घेऊन सारखा या महाला भोंवतीं फिरतों आहें; पण अद्याप कांहींच सुगावा लागत नाहीं. आज वाड्यांत बरीच ये-जा होते आहे; पण ती कशासाठीं हें मात्र समजत नाहीं. मघाशीं मी असा बाजूला वेड्यासारखा उभा होतों, तेव्हां वाड्यांत शिरणारा प्रत्येक राजा मला अदबीनें कुर्निसात करून जात असे! हा माझ्या यवनी वेषाचा पराक्रम आहे, हें मी ओळखून आहें. अरेरे! काय ही आमच्या बुंदेल्यांतील अशा राजांची स्थिति! ही स्थिति अत्यंत शोचनीय आहे. अरे! पण ही कोण स्त्री अशी दबकत दबकत येते आहे. जरा बाजूला उभें राहून तलास केला पाहिजे.

[ बाजूला उभा राहतो.

शृंगार—(प्रवेश करून) जड पावलानें दिल्ली सोडली आणि गरुडाच्या भरारीनें हिरादेवीच्या महालाजवळ आलों. दिल्ली सोडतांना मला जितकें दुःख झालें तितकें माझ्या आईच्या मृत्यूनेंही झाले नाहीं कुठें ती दिल्ली आणि कुठें हें ओसाड बुंदेलखंड! पण करावयाचें काय? हिरादेवीचे काम तर झालें पाहिजेना? पहा म्हणावें कशी कामगिरी बजावून आलों ती. बादशहाचें हें फर्मान पाहिल्यावर सभाकरण, हिरादेवी आणि माझी राजा झालेली राणी एकदम खूष होऊन मला भरजरी शालूचाच अहेर करतील! बादशहाचें फर्मान म्हणजे वंदनीय फर्मान आहे.

दलपत—(स्वगत) हा तर शृंगार-आणि तें फर्मान कसलें!

शृंगार—एकदां हें दिल्लीपतीचें फर्मान हिरादेवीकडे पोंचवलें म्हणजे मग मरे-पर्यंत निरनिराळ्या पद्धतीचे स्त्रीवेष घेऊन जिवाची गंमत करावयाला हरकत नाहीं.

दलपत—(पुढें येऊन) राजे, अजून तुम्ही मागेंच?

शृंगार—मागच्या पावलानें चालत होतों म्हणून मागें राहिलों! शिवाय खां-साहेब, मला नेहमीं मागें मागें फिरायची जन्मसिद्ध संवय आहे; पण आपण केव्हां माझ्याबरोबर आलांत?

दलपत—दिल्लीपासून!

शृंगार—मग कुठें वाटेंत दिसलां नाहींत ते! मी वाटेंत आपली सेवा नसती का केली?

**दलपत**—हुजूरचा असा सक्त हुकूम होता कीं, शृंगारराजांच्या दृष्टीला न पडतां त्यांच्याबरोबर जा !

**शृंगार**—हुजूर आहेतच मुळीं माझ्यावर फिदा !

**दलपत**—तें कांहीं सांगायला का पाहिजे !

**शृंगार**—बरें ! तुम्ही चला आमच्या राजवाड्यांत मी तुमची तेथें सर्व व्यवस्था करतों. हो ! तुमची सर्व सोय मला केलीच पाहिजे. तसें जर मीं केलें नाहीं आणि आपली एखाद्या बाबतींत गैरसोय झाली तर हुजूर माझ्यावर नाहक खप्पा होतील ! चला; अगोदर माझ्या महालांत चला !

**दलपत**—महाल मागाहून ! अगोदर हिरादेवीला हुजूरचें फर्मान द्या.

**शृंगार**—हो ! तें मी अजिबात विसरलों ! पण कायहो, खांसाहेब !

**दलपत**—काय ?

**शृंगार**—शहाजादीनें दिलेला अरबी परीचा पोषाख चढवून मग हें फर्मान हिरादेवीला दिलें तर ?

**दलपत**—तसें करायला हरकत नाहीं; पण पोषाख कुठें बदलणार ?

**शृंगार**—त्या झाडाजवळ जातों.

**दलपत**—तोपर्यंत ते फर्मान माझ्याजवळ द्या.

**शृंगार**—हो ! हुजूरचें फर्मान खालीं कसे ठेवायचें ? घ्या हें-मी आलोंच वेषांतर करून. [जातो.

**दलपत**—अग चांडाळणी ! असें कारस्थान केलेंस काय ? तो मूर्ख तिकडे नट्टापट्टा करतो आहे तोपर्यंत हें फर्मान आपण तरी वाचून पहावें. (फर्मान वाचतो व पुन्हा बंद करतो.) अस्सें ! कुमक पाठवायला तयार आहांत हें ऐकून आनंद वाटला काय ?

**शृंगार**—(आंतून) खानसाहेब, फर्मान आहे ना ?

**दलपत**—राजे ! जल्दी आव-देरी होती है !

**शृंगार**—आता हूं सरकार.

**दलपत**—हें फर्मान नाहींसें करूं काय ?

**शृंगार**—ओढणी घ्यावयाची राहिली आहे-आलों अं !

**दलपत**—पण नको ! याच्या मागोमाग हिरादेवीच्या राजवाड्यांत जावें आणि तें फर्मान त्या साऱ्यांच्या देखत हिसकावून घ्यावें.

शृंगार—(स्वतःच्या पोषाखाकडे पहात हंसत येतो.) खानसाहेब! आतां मी कसा दिसतो?

दलपत—(स्वगत) लखनौचा माषुक माल! (उघड) अस्मानकी परी!

शृंगार—बरें आतां कसा दिसतो?

दलपत—(स्वगत) चांदणी चौकांतील चकली (उघड) तिरळी नजर.

शृंगार—बरें, आतां कसा दिसतों!

दलपत—(स्वगत) बेवकूफ गद्ध्या! (उघड) माषुक लैला!

शृंगार—बरें, आतां पहा बरें माझ्याकडे! कां तोंड फिरवलेंत?

दलपत—तुम्हांला पाहिलें कीं, कबरस्थानांत गेलेल्या माझ्या बेगमेची आठवण होते.

शृंगार—अगदीं माझ्यासारखीच तुमची बेगम होतीना?

दलपत—(स्वगत) अगदींच बेशरम आहे हा! (उघड) तुमच्यासारखी? तिच्यापेक्षां तुम्हीच खुपसुरत आहांत!

शृंगार—मी आहेंच तसा!

[कवाली.]

**रूप मना हरी गान जना करी मोद मधुसा संगिता**
**अधरीं॥ तरुणी डोळां पाहोनी मोद मानी मदिना॥**
**वरुनि वीरा या मानी क्षीण मारा अशिरा॥ १॥**

---

## प्रवेश आठवा

[ **स्थळ**—हिरादेवीचा महाल. हिरादेवी व इतर राजे बसलेले आहेत. चंपतराय येतो, त्याचें सर्व राजे आगतस्वागत करतात. ]

हिरादेवी—या! चंपतरायजी, या! ह्या हिरादेवीच्या राजवाड्यांत तुमचें स्वागत असो!

पहिला राजा—चंपतरायजी, आम्हीही आपलें अंतःकरणपूर्वक स्वागत करतों!

**दुसरा राजा**—या राजेसाहेबांच्या स्वागताला माझा दुजोरा आहे !

**तिसरा राजा**—माझेंही मत यांच्या मतांत सामील झालेलें आहे !

**चंपतराय**—तुम्हीं माझ्याशीं दिलजमाई केलीत यांतच माझें खरेंखुरें स्वागत झालें असें मी समजतों. हिरादेवी आणि इतर राजेहो, तुम्ही स्वातंत्र्याच्या विजयध्वजाखालीं मोठ्या प्रेमानें जमलांत याबद्दल मला मनापासून आनंद झालेला आहे. सर्व बुंदेलखंडानें असेच दिलजमाईनें जमावें आणि स्वातंत्र्यप्राप्ति करून घ्यावी, हीच माझी निर्वाणीची इच्छा आहे. आपण सगळे एक असलों तर आपल्या मायभूमीकडे वांकड्या नजरेनें पाहण्याची कोणाचीही छाती होणार नाहीं ! आपसांत फूट पडली, मनें परस्परांचीं परस्परांच्या मत्सरानें पेटलेलीं आहेत असें परक्यांना कळलें, म्हणजे मग राष्ट्राचा भयंकर नाश होत असतो.

**हिरादेवी**—तें आमच्या बुद्धीला पटलं आणि म्हणूनच आम्हीं सर्वांनीं मिळून हा दिलजमाईचा स्वागतसमारंभ जुळवून आणला. हा समारंभ माझ्या म्हणण्या-प्रमाणं यशस्वी तऱ्हेनं पार पडला म्हणजे यानंतर पुन्हा तुमच्या आमच्यांत वैरच राहणार नाहीं.

**चंपतराय**—पण या समारंभांत सभाकरण कसा आला नाहीं ?

**हिरादेवी**—मीं त्यांना आमंत्रण पाठविलं होतं; पण त्यांनीं आपण येण्यापूर्वीं असा संदेश पाठविला कीं, मी जरी जातीनं तिथं नसलों तरी मनानं तिथंच आहें. तुमच्या योजनेला माझी संमति आहे. कालिंजरच्या राजांनींच निरोप आणला.

**पहिला राजा**—हो ! मलाच त्यांनीं ही कामगिरी सांगितली !

**चंपतराय**—सभाकरण असें सांगेल असें मला वाटत नाहीं.

**दुसरा राजा**—माझ्यादेखत त्यांच्याजवळ तसा संदेश सांगितला आहे.

**हिरादेवी**—सभाकरणाची नि आणली दिलजमाई आम्ही पुन्हा करवून देऊं.

**चंपतराय**—ठीक आहे ! तुमच्या शब्दावर मी पूर्ण विश्वास ठेवतों आहे.

**पहिला राजा**—हिरादेवी, ताटें केव्हांचीं वाढलीं आहेत ! जेवतां जेवतां बोलूं हा विषय !

**दुसरा राजा**—हो ! अगोदर जेवण आणि मग राजकारण !

**हिरादेवी**—थांबा ! असं अधाशासारखं काय करतां ?

**पहिला राजा**—अधाशीपणाचा यांत काय संबंध ? मला वेळच्यावेळीं काम करण्याची संवय आहे. तेव्हां जेवणाच्या वेळीं जेवण आणि कामाच्या वेळीं काम !

**हिरादेवी**—चंपतराय, चला !

**चंपतराय**—जेवणाच्या समारंभाची कांहींच आवश्यकता नव्हती.

**हिरादेवी**—सहभोजनानं ऐक्य वाढतं ना ?

**पहिला राजा**—सहभोजनानें अंतःकरणाची दिलजमाई होते !

**दुसरा राजा**—सहभोजनानें वैरत्व दडपलें जातें !

**पहिला राजा**—सहभोजनानें सहकार्य साधतें !

**चंपतराय**—जशी तुमची इच्छा ! पण विमलदेव कुठें आहेत ? यजमानाशिवाय पाहुण्यांनीं सुरवात कशी करायची ?

**हिरादेवी**—बाळ राजे विजयेबरोबर शिकारीला गेले आहेत !

**पहिला राजा**—राजमाता आहेतच त्यांच्याऐवजीं.

**दुसरा राजा**—मुलापेक्षां आईचीच किंमत जास्त असते.

**चंपतराय**—ठीक आहे ! (सर्व पानावर बसतात.)

[पडद्यांत]

बाबा, थांबा ! बाबा, जरा थांबा ! तोंडांत घांस घालण्यापूर्वी माझं म्हणणं ऐकून घ्या !

**हिरादेवी**—हा विजयेचा आवाज !

**विजया**—(प्रवेश करून) बाबा ! थांबा त्या ताटांत विष आहे.

**हिरादेवी**—काय विष ! काय म्हणतेस विजये ?

**चंपतराय**—विष ! कोणीं नीचपणा केला हा ?

**विमलदेव**—हें आमच्याच आईसाहेबांचें सत्कृत्य !

**चंपतराय**—चांडाळणी ! तुझ्या शब्दावर विश्वास ठेवून मी पाहुणचाराला आलों, त्याचा हा परिणाम ! केदासणी, थांब ! तुझी कायमचीच व्यवस्था लावतों ! विमल, तुमच्या गोलंदाजाला ताबडतोब घेऊन या ! या विषारी नागिणीला, याच ठिकाणीं, या महालांत तोफेच्या तोंडीं देतों ! राजे, पकडा हिला !

[ राजे पकडतात. विमल जातो. ]

**विजया**—बाबा, झाली ना खात्री ? मी सांगत होतें तें झालंना खरं ?

**चंपतराय**—ह्या चांडाळणीचें कारस्थान इतक्या थराला जाईल, असें मला मुळींच वाटलें नव्हतें.

**दलपत**—( शृंगारासह प्रवेश करतो.) द्या ! ताबडतोब तें फर्मान द्या !

**शृंगार**—माझे डोळे त्या पक्वान्नांकडे लागले आहेत !

**दलपत**—हरामखोरा ! चल, काढ तें फर्मान !

चंपतराय—काय भानगड आहे ?

दलपत—चंपतरायजी, या राक्षसणीनें दिल्लीच्या बादशहाला आपल्या विरुद्ध कुमक करण्याचा गुप्त खलिता या षंढाबरोबर पाठविला होता. त्याचें उत्तर बादशहानें दिलेलें आहे, हें पहा.

चंपतराय—हा आणखी पुरावा ! शृंगार, तुम्हीं असा षाढवपणा केलांतना ?

शृंगार—मी काय करूं महाराज ! हिनें मला सांगितलें त्यांत माझा काय कसूर, महाराज ! मला गुन्हा माफ करा.

विजया—नामर्द नेहमींच क्षमेला पात्र असतो.

शृंगार—शेवटीं जातीला जातच उपयोगी पडते बरें का ?

विमलदेव—महाराज, गोलंदाज तोफेसह आला आहे.

चंपतराय—बांधा हिच्या मुसक्या ! ( राजे हिरादेवीच्या मुसक्या बांधतात. )

हिरादेवी—तोफेच्या तोंडीं देणाऱ्या राक्षसा ! माझा प्रयत्न फसला ! माझा नाइलाज झाला ! हिरा तोफेच्या तोंडीं गेली; पण चंपतरायाच्या स्वातंत्र्य-संदेशाला तिनें मरेपर्यंत विरोधच केला.

सेवक—(प्रवेश करून) सरकार ! दिल्लीपतींनीं युवराज छत्रसालाला अन्यायानें अटक केली आहे.

चंपतराय—त्यानें असा अन्याय केला काय ? ठीक आहे. अगोदर या विषारी नागिणीची व्यवस्था आणि मग बादशहाच्या अन्यायाचा विचार ! गोलंदाज उडव तोफ !

[ तोफ उडते. हिरादेवीच्या चिंधड्या होतात. पडदा पडतो. ]

## अंक दुसरा समाप्त

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

[ **स्थळ**—बाग. पात्रें—विजया. ]

**विजया**—बाबांच्या इच्छेविरुद्ध मी दादाला सोडवून आणण्याकरितां निघालें आहें; दादावर जसा प्रसंग आला, तसा माझ्यावर येईल, असं देखील बाबा म्हणाले ! प्रसंग येईल, म्हणून का कुणी आपल्या कार्याचा त्याग करतं ? संकट निर्माण करून त्यावर विजय मिळविणं, हेंच क्षत्रियाचं कर्तव्य आहे ! औरंगजेब जरी आमच्याविरुद्ध असला, तरी माझ्यावर तसला एखादा प्रसंग ओढवला तर, तो स्वस्थ बसेल, असं मला वाटत नाहीं. जरी वेळ सांगून येत नसली, तरी वेळे-ला तोंड देऊन तींतून सुरक्षित बाहेर पडणं, यांतच खरी मर्दुमकी आहे. रजपूत वीराप्रमाणं बायकांनींही आतांपर्यंत कांहीं कमी कर्तबगारी केलेली नाहीं. निर्वाणी-च्या केसरीकरितां रजपूत वीर जेव्हां समरभूमीवर जात असत, तेव्हां क्षत्रियां-च्या बायकांनींच ना आपल्या नगरीचं रक्षण केलं ! बाबांची शंका जरी बरोबर असली, तरी ती अकारण आहे ! शंकाकुशंकांनीं कार्याची निरर्थक हानि होते ना ? कार्यप्रवृत्त होणाऱ्यांनीं, शंकाकुशंका कधींच काढूं नयेत. माझी मनोदेवता मला तर असं बजावते आहे कीं, मी माझ्या दादाची मुक्तता खात्रीनं करीन. आत्मविश्वास अंतःकरणांत असला, परमेश्वराची कृपा असली, म्हणजे हवं तें कार्य यशस्वी होतं !

**दलपत**—महोबाची राजकुमारी आज क्षात्रप्रभा होऊन, कोणत्या स्वारीवर निघाली आहे ? या सुंदर हाताच्या नाजुक शस्त्रांनीं, कोणता महाभाग मृत्युलोक गांठणार आहे ?

**विजया**—तुमच्यासारख्या पुरुषांनीं हातांत बांगड्या भरल्या, म्हणजे स्त्रियांनींच हातांत शस्त्र घेतलं पाहिजे.

**दलपत**—आज बुंदेलखंडांतील वीर कांहीं नाहींसे झाले नाहींत ! बुंदेलची भूमि अजून निर्वीर्य झाली नाहीं ! जोंपर्यंत बुंदेलखंडांत वीर आहेत, तोंपर्यंत तरी विजये, तुझ्यासारख्यांनीं शस्त्रग्रहण करण्याचें कारण नाहीं.

विजया—बुंदेलखंडांत वीर आहेत, म्हणूनच माझ्यासारख्या स्त्रीवर शस्त्र घेण्याचा प्रसंग आलेला आहे ! दलपत, तुम्ही नुसते बोलके वीर आहांत ! शब्दशूर वीर होत नाहींत बरं !

दलपत—विजये, तुझ्या या शब्दांनीं माझ्या अंतःकरणाची नुसती कालवाकालव होत आहे. मी काय करूं, असें तुझें म्हणणें आहे ?

विजया—पुन्हा मला विचारतां ? केलेली प्रतिज्ञा विसरलांत वाटतं ?

दलपत—कोणती प्रतिज्ञा ?

विजया—तुमची बुद्धि इतकी विसराळू असेल, असं मला वाटत नाहीं. तुमच्या प्रतिज्ञेची आठवण मीं तुम्हांला करून द्यावी अं ?

दलपत—संग्रामदेवते, क्षमा कर. बाबांच्या वधाचीच प्रतिज्ञा ना ? मी ती प्रतिज्ञा कधींही विसरणार नाहीं. चंपतरायजींना बाबांनीं युद्धाचें आव्हान दिलेलें आहे, त्याचवेळीं मी माझी प्रतिज्ञा पुरी करीन.

विजया—तुमची प्रतिज्ञा पुरी करा, नी मगच मला भेटा !

दलपत—तुझ्या उत्साही वाणीबद्दल मी तुझा फार आभारी आहें !

विजया—मी दादाची मुक्तता करून येईपर्यंत, तुमची प्रतिज्ञा पुरी झाली पाहिजे, समजलांत ?

दलपत—प्रतिज्ञा पुरी करीन, तेव्हांच तुझ्या दर्शनाला येईन ! [ जातो.

विजया—हेंही बरंच झालं. आपण आतां विलंब न लावतां, दिल्लीला कूच करावं. विन्ध्यवासिनी, या दासीला विजयी कर !

[ राग—अर्बी; ताल—त्रिवट.]

**प्रणती पदांबुजीं अघ निदानीं करिता विनता ॥ध्रु०॥**
**यशानंद भक्ताप्रती दाता ॥ वारुनी अघ हरी दे शांतता ॥ सुरनरगणा विलोकिता ॥ १ ॥**

[ जाते.

## प्रवेश दुसरा

[ **स्थळ**—सभाकरणाचा महाल. ]

**सभाकरण**—हिरादेवीचें कारस्थान उघडकीला आलें, यानें मोठा घोंटाळा झाला खरा ! मी जर त्या समारंभाला हजर राहिलों असतों, तर निराळाच प्रकार झाला असता. हिरादेवीचे विचार, मला पहिल्यापासूनच पसंत नव्हते. विषप्रयोग करून, आपल्या शत्रूचा निःपात करणें, हा शुद्ध नामर्दपणा होय. चंपतराय जरी आज शत्रू असला, तरी तो वीर आहे, हें विसरणें बरें नाहीं. हिरादेवीची बायकी बुद्धि शेवटीं अशा रीतीनें फसली, आमच्या राजमंडळांतील एक कर्तीसवरती शक्ति अशा रीतीनें कमी झाली, हें वाईट झालें. चंपतरायाची बाजू आमच्यापेक्षां प्रबल होणार खास. हिरादेवीचें कारस्थान अधर्माच्या, अनीतीच्या पायावर उभारलेलें होतें, म्हणूनच त्यांची अशी फजिती झाली. पापाचा नेहमींच पराजय होत असतो. हिरादेवीच्या कारस्थानांत जरी मी होतों, तरी माझा बेत आणि हिरादेवीचा बेत हे फार निराळे होते

**शृंगार**—( प्रवेश करून ) सभाकरण, घात झाला, सर्वस्वीं घात झाला ! झालेला घात आतां पुन्हा होणार नाहीं अशी खबरदारी घ्या ! मेलेली हिरादेवी पुन्हा मरणार नाहीं, असें कांहींतरी कारस्थान करा !

**सभाकरण**—शृंगार, तुमच्यासारखा मूर्ख राजा, मीं उभ्या जन्मांत देखील पाहिला नाहीं !

**शृंगार**—मी जर याच जन्मांत जन्माला आलों आहें, तर पूर्वीं तरी आपण मला कुठें व कसे पहाणार ?

**सभाकरण**—तुमचा स्वभाव फारच विचित्र बुवा !

**शृंगार**—नुसता स्वभावच का ? वेष, हावभाव, नटणें, मुरडणें, सारें कांहीं विचित्र आहे !

**सभाकरण**—पौराणिक काळांतले तुम्ही विचित्रवीर्यच आहांत !

**शृंगार**—विचित्र आहें खास ! वीर, महावीर यांच्याशीं मीं काडी मोडली आहे. अहो सभाकरण, मी जर खरा आणि जातिवंत वीर असतों, तर चंपतरायांनीं जेव्हां हिरादेवीला तोफेच्या तोंडीं दिलें, तेव्हां तिच्या ऐवजीं, मला तोफेच्या तोंडीं द्या, असें नसतें का सांगितलें ?

**सभाकरण**—मरणावर तुमचें अतिशय प्रेम दिसतें आहे!

**शृंगार**—पुरुषी मरणावर माझें मुळींच प्रेम नाहीं!

**सभाकरण**—पुरुषी मरण म्हणजे? मरणांत देखील स्त्री–पुरुष असा भेद आहेच का?

**शृंगार**—तुमच्या पुरुषी अंतःकरणाला त्यांतला भेद कळणार नाहीं! हा भेद कळायला माझ्यासारखी भेदक दृष्टि लागते. पुरुषी मरण म्हणजे लढतां लढतां मरणें!

**सभाकरण**—आणि बायकी मरण म्हणजे?

**शृंगार**—विरहानें झुरून झुरून, अस्थिपंजर होऊन मरणें!

**सभाकरण**—(हंसतो.) तुमच्या मेलेल्या अकलेपुढें, हात टेंकावेसे वाटतात बुवा!

**शृंगार**—छट्! हात टेंकणें, हें टेंकीला आलेल्यांचें लक्षण! हात टेंकण्यापेक्षां गुडघे टेंकणें मला फार पसंत आहे! परवां दिल्लीपतीपुढें मीं गुडघे टेंकले मात्र, झालें-तावडतोब त्यांनीं मला फर्मान दिलें!

**सभाकरण**—कुठें आहे तें फर्मान?

**चंपतराय**—(प्रवेश करून) हें पहा! सभाकरण, हें पहा! तुझ्या देशद्रोही बुद्धीचें, हें फर्मान पहा! स्वराज्यद्रोहीपणाचा हा ताम्रपट पहा! स्वतःच्या घराला आग लावण्याचा हा धडधडीत अग्नि पहा! सभाकरण, स्वबांधवांचा धुव्वा उडवायचा असेल, तर तो स्वतःच्या तरवारीनें उडवावा! स्वातंत्र्यदेवीचें मंदीर उध्वस्त करायचें निंद्य कृत्य करायचें असेल, तर स्वतः तरी करायचें होतेंस! परक्यांची मदत मागण्याची याचना, तुझ्यासारख्या वीराला शोभत नाहीं. ज्याच्या मनगटांत जोर नसतो, छातींत कणखरपणा नसतो, हातांतलि खड्गावर ज्याचा दृढ विश्वास नसतो, अशा नामर्दांनीं स्वसंरक्षणाकरतां, शत्रूचा निःपात करण्याकरतां, परक्यांच्या पायीं लोळण घ्यावी! हा देशद्रोही ताम्रपट तुझ्या नामर्दपणाची डंकानौबत, तमाम बुंदेलखंडांत वाजवीत आहे. हें फर्मान, सभाकरण देशद्रोही आहे, असें तमाम देशबंधूंना जाहीर करीत आहे!

**सभाकरण**—चंपतराय, गैरसमजानें तुमच्या रागाचा अग्नि प्रज्वलित झालेला आहे! संरक्षण किंवा सर्वस्वीं नाश करण्याची शक्ति या माझ्या खड्गांत आहे. माझा सर्वांपेक्षां जास्त विश्वास माझ्या खड्गावरच आहे!

**चंपतराय**—तुझा आत्मविश्वास जर तुझ्या हातांतील खड्गावर असता, तर असला नामर्दपणा तुझ्या हातून कधींही झाला नसता. ज्याच्या मनगटांत

जोर आहे, त्याच्या हातून असें लांछनास्पद अधम कृत्य केव्हांही झालें नसतें ! नामर्दपणाचें कृत्य करून आत्मविश्वासाची प्रौढी मारणें, हें रजपूतब्रीदाला शोभत नाहीं.

**सभाकरण**—दिल्लीपतीच्या याचनेवर आजपर्यंत सभाकरण जगलेला नाहीं, त्याला जगण्याची इच्छा नाहीं, किंवा तसा सभाकरण जगणारही नाहीं.

**शृंगार**—दिल्लीपतीच्या याचनेवर जगण्याचा अधिकार, फक्त माझा आहे ! मी हुजुरच्या पायांचा बंदा गुलाम आहें !

**चंपतराय**—नामर्द राजा, जनानखान्यांत लपून बैस. अशा आणीबाणीच्यां वेळीं तुझें हें रडकें तोंड दाखवूं नकोस ! चल, चालता हो इथून !

**शृंगार**—अरसिकांच्या मैफलींत, माझ्यासारख्या रसिकांची किंमत कधींच होणार नाहीं ! [ जातो.

**चंपतराय**—सभाकरण, बुंदेलखंडाच्या नरडीला नख लावणाऱ्या बादशहाचें, स्वदस्तुरचें फर्मान तुझ्या प्रौढीला कमीपणा आणीत आहे ! सभाकरण, इतर राजांनीं या आतां गेलेल्या जनानखान्यांतील जनानी जंगबहाद्दरांनीं, असा नामर्दपणा केला असता, तर त्याचें मला मुळींच वाईट वाटलें नसतें; पण तुझ्या हातून, असें वर्तन घडलें, याचें मला आश्चर्य वाटलें आणि मीं निषेधही केला.

**सभाकरण**—चंपतराय, या सर्व गोष्टी कोणींही केल्या असतां, इतरांच्या बरोबर माझेंही नांव त्यांत गेलें असेल; पण माझी गत कारकीर्द लक्षांत घेतां, तुझ्याकडून असा आरोप माझ्यावर व्हावा, हेंच आश्चर्य आहे !

**चंपतराय**—आश्चर्य ! आश्चर्य नव्हे, सत्य आहे ! तूं पूर्वींचा खंदा देशभक्त; पण आज पक्का देशद्रोही झाला आहेस. पूर्वींचा सज्जन जर आज दुर्जन झाला तर त्यानें पूर्वींच्या सज्जनपणावर चालू दुर्जनता झांकण्यांत काय अर्थ आहे ? मनुष्याचा लौकिक, लौकिकी घराण्यावरून होत नसून, लौकिकी कृत्यांवरून होतो !

**सभाकरण**—चंपतराय, माझा स्वभाव आणि मनोरचना तुला माहीत आहे ! मी मानी स्वभावाचा हटवादी आहें. मला सर्वांपेक्षां माझ्या मानाची अधिक किंमत आहे. माझें सर्वस्व गेलें तरी चालेल; पण मानाची खंडना होतां कामा नये.

**चंपतराय**—मानाकरतां परक्यांच्या मदतीची आशा करणाऱ्या मानी वीरा, झालेल्या अपकृत्याबद्दल पूर्वजांची क्षमा माग.

**सभाकरण**—क्षमा मागणें, नामर्दांच्या नशिबीं असतें.

**चंपतराय**—याचना करणें मात्र, तुझ्यासारख्याच्या नशिबीं असतेंना ? सभाकरण, बुंदेलांतील तुझ्यासारखे महाप्रतापी वीर याचनेवर जगतात, असा दुर्लौकिक अखिल भारतवर्षांत झाला, तर त्यांत तुझा मानमरातब कसला ! माना-करितां देशबंधूंच्या माना मुरगळून कसाईपणा करण्यापेक्षां, मायभूमीचा मान राखण्याचा प्रयत्न कर ! स्वतःच्या मानापेक्षां देशाचा मान अधिक आहे. आहे. अरे ! देश बुडाला, तर त्यांस तुझ्या शुष्क मानाला कोण विचारणार ? बुंदेलखंडाचा निःपात झाला, तर त्यांत तुझा मान कसला ?

**सभाकरण**—अपमानाचा सूड घेणें, हाच माझा मानमरातब ! सूडाचा संदेश हाच माझा मानसन्मान ! चंपतराय, या सभाकरणाला अपमानाच्या सूडाशिवाय दुसरी तिसरी गोष्ट माहीत नाहीं. मला देश-परदेश समजत नाहीं. राष्ट्राभिमानापेक्षां स्वाभिमान-वैयक्तिक अभिमान, मला जास्त प्रिय आहे. हिरादेवींच्या अंतःकरणांत राज्यतृष्णा होती; पण माझ्या अंतःकरणांत सूडाची भावना आहे. या माझ्या अंतःकरणांत तुझा सूड ! चंपतरायाचा सूड ! सारखा धगधगत आहे !

**चंपतराय**—माझा सूड घ्यायचा असेल, तर वाटेल त्या वेळीं घे ! हा पहा, हा चंपत तुझ्यापुढें उभा आहे. उपस तें शस्त्र आणि उगव आपला सूड !

**सभाकरण**—छेः, छेः ! अशा प्रकारानें सूड घेणें, मला शोभत नाहीं. कोणताही वीर कोणत्याही वीराचा अशा रीतीनें सूड उगविणार नाहीं ! मला जरी तुझा सूड उगवावचा असला, तरी लढाईचें आव्हान देऊन !

**चंपतराय**—त्यालाही माझी तयारी आहे ! तूं वाटेल तेव्हां आव्हान दे. त्याला माझी तयारी आहे.

**सभाकरण**—बरोबर आठ दिवसांनीं मी तुला लढाईचें आव्हान देतों आहे. आहे कबूल ?

**चंपतराय**—कबूल म्हणून काय विचारतोस ? वीराला लढाईचें आव्हान म्हणजे संजीवनी आहे. जो वीर लढाईच्या आव्हानाला नाकबुली देईल तो नामर्द होय ! सभाकरण, आठ दिवसांच्या मुदतीचें आव्हान मला कबूल आहे.

**सभाकरण**—ठीक आहे !

[ जातात.

---

## प्रवेश तिसरा

[ पात्रें—शृंगार, प्रीति व विमलदेव. ]

[ राग-मांड; ताल-केरवा. ]

**कांता खुले प्रतिमा युवाची रिझवितें ॥ ध्रु० ॥ भोळी जवानी कोणी भुलें जनीं ॥ लाभेल ज्याला त्या नराला सुख नच तें ॥ १ ॥**

प्रीति—मीं हा पुरुषवेष घेतला खरा; पण मला यांत मुळींच मौज वाटत नाहीं. स्त्रीनं पुरुष होणं, यांत मौज कसली ? घरांतल्या पुरुषांचा स्वभावच बाई विचित्र ! कालच सांगणं झालं कीं, मी स्त्रीवेष घेतों नी तूं पुरुष वेष घे. इश्श मेलं ! ही कसली भलतीच आवड ! मी स्त्रीसारखी स्त्री, ती पुरुषासारखा पोषाख करूं ? बायकी बुद्धीचे नवरे काय करतील नी काय न करतील याचा नियमच नाहींग बाई ! इकडची हौस मुलखावेगळीच आहे ! पुरुषीपणाचा तर स्वारीला जन्मापासून कंटाळा आहे ! बारशाच्या दिवशीं, मुलाचं नांव ठेवतांच, स्वारी पाळण्यांतच रडूं लागली ! हा प्रकार पाहून मामंजींना नी सासूबाईंना आश्चर्य वाटलं ! आपल्या उदरीं कुलाचा उद्धार करणारा मुलगा जन्माला यावा, असं प्रत्येक आईबापाला वाटत असतं. पण मुलाच्या ऐवजीं कुलाची कीर्ति वाढविणारी मुलगी जर जन्माला आली तर, माहेर बुडून सासरचाच उद्धार होत असतो. तशीच गत माझी झाली आहे ! माझ्या या पुरुषीकरणानं माहेरचा उद्धार होण्याऐवजीं सासरचाच उद्धार होत आहे ! काय हा पुरुषवेष ! या पुरुषी पोषाखांत पदराचा तर मुळींच पत्ता नाहीं ! स्त्रियांची नाजूक चाल या चालींत वाटेला लागलेली आहे ! नको ग बाई ! मी या पुरुषी वेषाला रजा देतें, नि साजुक साजणीचा वेष घेऊन तिकडची वाट पहात बसतें. [जाते.

शृंगार—( प्रवेश करून )—

[ ठुंबरी. ]

**युवति नवतीच्या शृंगार सुखाचा माझा ॥ भुलवि जनांसि खुलवी सुराजा ॥ ध्रु० ॥ रमणी रसालमयी तरणी त्वरित गती ॥ हृदया हृदया मिळवाया झणीं या साजा ॥ १ ॥**

ही डोक्यावर घागर घेतल्यापासून मला तर असें वाटतें कीं, मी गोकुळांतली एक गोपीच आहें! ही घागर डोक्यावर घेतल्यापासून रास-क्रीडेचे विचार सारखे माझ्या डोक्यांत घोळत आहेत! खरोखरच गोपी मोठ्या भाग्यवान्! मथुरेच्या बाजारांत दहींदुधाचे हंडे नेतांना त्यांना जेव्हां श्रीकृष्ण भगवान् अडवून त्यांच्यांशीं शृंगार करीत असे, तेव्हां त्यांच्या जिवाला अतिशय समाधान वाटत असे! श्रीकृष्णाचा गोपी-विलास माझ्या जिवंतपणीं मला लाभेल का? गोपीचा पदर धरून दान मागणारा भगवान् श्रीकृष्ण या धारीरच्या गोकुळांत अवतार घेईल का? घेईल! खात्रीनें घेईल! आम्ही राजे लोक म्हणजे प्रत्यक्ष ब्रह्मदेवाचे बाप आहोंत! जोंपर्यंत आमच्या हातीं राजसत्ता आहे तोंपर्यंत आम्ही वाटेल तें करूं! रावाला रंक करणें, किंवा रंकाला राव करणें, हा आमच्या हातचा नुसता मळ आहे. त्याचप्रमाणें गोपीला कृष्ण करणें किंवा कृष्णाला गोपी करणें, हाही आमच्या हातचा मळच आहे! मी या धारीरच्या कुळांतला श्रीकृष्ण, पण आज गोपी झालों आहें! तसेंच माझ्या पट्टराणीला मीं श्रीकृष्ण व्हायला सांगितलें आहे. मी गोपी आणि ती श्रीकृष्ण, अशा परिवर्तनांत, परस्परांच्या लिंगांतरांत, कालचा शृंगार आणि आजची शृंगारमंजरी, प्रेमाची लयलूट करणार आहे! मीं हा गोपीचा वेष घेतल्यापासून माझ्या नसानसांतून रासक्रीडा उसळ्या मारूं लागली आहे! कात्यायनी व्रताची सांगता केव्हां होईल या आशेवर, माझें स्त्रीकरणी अंतःकरण, तरंगूं लागलें आहे! राधेला ज्याप्रमाणें श्रीकृष्णाचा विरह असह्य झाला, त्याप्रमाणें या पुरुषी-राधिकेला स्त्रीरूपी श्रीकृष्णाचा विरह असह्य होऊं पहात आहे! माझी राणी–प्रीतीची फुलराणी, आज प्रफुल्लचंद्र झाली असेल, नाहीं? स्त्रीदेहाचें पुरुषीकरण केलेल्या श्रीकृष्णा, पुरुषी श्रीकृष्णाची राधिका झालेल्या या तुझ्या गोपीला विरहवन्हींत कां बरें लोटतोस? सख्या, तुझी ही राधा तुझी वदनचंद्रिका पहाण्याकरतां अतिशय उत्सुक झाली आहे! चित्तचकोरा, केव्हां बरें मला दर्शन देशील? उत्कंठेनें एकादा अभिसारिकेप्रमाणें मी तुझी वाट पहात आहे! ये तुझ्या आलिंगनसुखाकरतां तुझी ही पुरुषवेषधारी राधिका उत्सुक झाली आहे! या आलिंगनाचा लाभ देऊन सुखी कर!

**प्रीति**—हें काय वेड्यासारखं करायचं तें? आज आपल्या राजवाड्यांत रासक्रीडा आहे का गोपीविलास आहे?

**शृंगार**—राजवाड्याचें गोकुळ करून, राजनीतीचें कुंजवन करण्याचा माझा विचार आहे!

**प्रीति**—हा शुद्ध वेडगळपणा दिसतोय् मला !

**शृंगार**—वेडगळपणा कसचा ? कुंजवनांत विलास करणारा श्रीकृष्ण, हा राजाच होताना ? झालें तर मग ! राजानें कुंजवनांत गोपीविलास करावा, हें तर खऱ्या राजाचें आद्यकर्तव्य आहे !

**प्रीति**—पण अशा स्त्रीवेषांत, गोकुळांत तुळशीवन करणें, यांत कसलं राजेपण ?

**शृंगार**—गोकुळाला तुळशीवन बनवणें, यांतच खरें राजेपण आहे ! अग, राजानें राजा होण्यापेक्षां राणी होणें यांतच खरी अक्कल आहे !

**प्रीति**—दुसऱ्याची नक्कल करण्यांत स्वतांची अक्कल जगाला दिसते आहे !

**शृंगार**—जग हें दृश्य आहे, तेव्हां या दृश्य जगांत आपली अक्कल सर्वांना दिसलीच पाहिजे.

**प्रीति**—आतांपर्यंत जगाला अक्कल दाखविलीत तितकी पुरे, आणखी जास्त दाखविलीत तर, जगाकडून हंसं मात्र करून घ्याल !

**शृंगार**—सर्व लोकांच्या हास्याचा मीं विषय होऊन रहावें, हीच तर माझी इच्छा आहे ! बरें, तें असूंदे. माझ्या सांगण्याप्रमाणं तूं तर श्रीकृष्ण झालीस !

**प्रीति**—मी राधेची श्रीकृष्ण झालें नी आपण श्रीकृष्णाचे राधा झालांत ! छान ! फारच छान झालं हें ! धारीरच्या राजघराण्यांत असं दिव्य कधींही कुणी केलं नव्हतं, तें तुम्हीं केलंत.

**शृंगार**—दिव्य करायला दिव्य अक्कलच लागते ! माझ्या पांच पिढींतल्या पूर्वजांना जें साध्य झालें नाहीं, तें मीं केलें आहे ! जें कधीं कुणीं केलें नाहीं, तें करण्यांतच मोठेपणा असतो ! जगांत नेहमीं नव्या नवलाईचें कौतुक होत असतें ! ठराविक पद्धतीच्या कल्पना, कल्पनेच्या बाजारांत मंदीच्या भावानें विकत असतात !

**प्रीति**—तुमच्यावरून बाजारभाव अजमावयाचा झाला म्हणजे असं म्हणतां येईल कीं, पुरुषाच्या स्त्रीकरणाला तेजी असून, स्त्रियांच्या पुरुषीकरणाला मंदी आहे !

**शृंगार**—आजकालच्या बाजारभावांत तेजीमंदी अशी आहे. सतीचा भाव मंदींत असून गांवगंगेची तेजी आहे; प्रामाणिकपणाला मंदी असून अप्रामाणिकपणाला तेजी आहे; एकपत्नीव्रताला मंदी असून बहुपत्नीव्रताला तेजी आहे. स्त्रीच्या पुरुषीकरणाला मंदी असून पुरुषांच्या स्त्रीकरणाला तेजी आहे !

**प्रीति**—तुमचा हा बाजारभाव म्हणजे दशांश अपूर्णांकाचा व्यवहारी अपूर्णांकच होय !

**शृंगार**—पुरुषार्थाचा लघुतम हें माझें राजकीय अर्थशास्त्र आहे ! पुरुषानें स्त्री होऊन, स्त्रीनें पुरुष होणें, ही माझी त्रिकोणमिति आहे !

**प्रीति**—ही तृतीयपंथी त्रिकोणमिति लीलावतीच्या भास्कराचार्यालाही सुटणार नाहीं !

**शृंगार**—ती त्याला जरी सुटली नाहीं, तरी मीं ती उत्तम प्रकारें सोडविली आहे ! बैस बरें या आसनावर ! तुला श्रीकृष्ण समजून, मी गोपिकेच्या भूमिकेंत राधागीत गाऊन तुझ्या अंतःकरणाचें समाधान करणार आहें !

**प्रीति**—तुम्ही राधा झालांत तेव्हांच माझ्या अंतःकरणाचं समाधान झालं आहे !

**शृंगार**—असें कुचकें बोलून माझा धिक्कार करूं नकोस !

**प्रीति**—बायकी वृत्तीच्या नवऱ्याचा जगांत नेहमींच धिक्कार होत असतो !

**शृंगार**—तो अरसिक विचार तूर्त सोडून दे आणि या आसनावर बसून या तुझ्या पति-राधिकेचें नृत्यगायन लक्षपूर्वक ऐक !

**प्रीति**—मी नाहीं बसायची ! ही कसली भलतीच हौस !

**शृंगार**—अग, हौसेला मोल नसतेंना ? बैस इथें. (ती आसनावर बसते.) सांग पाहूं आतां कोणती रागिणी गाऊं म्हणजे तुझा राग शांत होईल ? भैरवींत तोडी मिसळूं कीं जोगींत जयजयवंती मिसळूं ?

**प्रीति**—माझं मनोरंजन करायचं असेल, तर रागिणींत राग मिसळा !

**शृंगार**—रागिणींत राग मिसळूं ? काय म्हणतेस हें ! मला ही गोष्ट मुळींच पसंत नाहीं. मी रागिणींत राग कधींही मिसळणार नाहीं. दोन रागिणींचा संयोग हाच माझ्या गाण्याचा सुयोग असतो ! ऐक—

**विमलदेव**—(प्रवेश करून) शाबास ! काय रंग भरला आहे आमच्या राजवाड्यांत. या दोघांपैकीं बाबा कोणचे आणि आई कोणची हेंच समजेनासें झालें आहे ! चेहऱ्यावरून परस्परांची ओळख पटत असली, तरी पोशाखावरून माझीही दिशाभूल होते आहे ! बाबांचा हक्क आईनें हिरावून घेतला असून, आईच्या हक्काचें अतिक्रमण बाबांनीं केलें आहे ! जन्मसिद्ध हक्काची ही अदलाबदल मला घोंटाळ्यांत पाडीत आहे !

**प्रीति**—बाळे ! या भलत्याच वेळीं इथं कशाला आलीस ?



विमलदेव—बाबा कोणचे नी आई कोणची ! [ पृष्ठ ६८

**विमलदेव**—आईबापांच्या भलत्याच प्रसंगीं, मुलांमुलींनीं अतिक्रमण करूं नये हें खरें; पण प्रसंगच तसा पडला, तेव्हां यावें लागलें !

**शृंगार**—विमलदेव, असा कोणता प्रसंग आला तुझ्यावर ?

**विमलदेव**—मुलीचें दत्तविधान फसलें, तेव्हां दुसऱ्या ठिकाणीं तिचें दत्त-विधान करतां येण्यासारखें असलें तर पहावें; म्हणून विचारायला आलों आहें.

**शृंगार**—या राजा झालेल्या राणीच्या मांडीवर तुला आजन्म दत्तक देण्याचा माझा विचार आहे.

**प्रीति**—आईची मुलगी तिच्याच मांडीवर कधीं तरी दत्तक दिली जाते का ?

**शृंगार**—कायदे करणाऱ्या राजांना, आपल्या सोईसाठीं वाटेल ते कायदे करून या गोष्टीची अंमलबजावणी करतां येते !

**विमलदेव**—बाबा, तुमची ही गोष्ट निसर्गाच्या विरुद्ध आहे. मला ती मुळींच पसंत नाहीं. तुम्ही मला युवराज बनवून, हिरादेवीच्या मांडीवर दत्तक दिला, पण हिरादेवीचा काळ झाल्यामुळें मी या युवराजवेषाला रजा दिली आहे !

**शृंगार**—ऐनवेळीं आईच्याच वळणावर गेलास अगदीं !

**विमलदेव**—आईबापांत जिथं मला फरक दिसत नाहीं, तिथं मी कुणाच्याही वळणावर गेलों तरी त्यांत फारसें बिघडलें असेंही मला वाटत नाहीं !

**प्रीति**—विमल, झालेला सर्व प्रकार तुला माहीतच आहे ! त्याची अधिक मीमांसा करून आमच्या अंतःकरणाला कां बरं दुखावितेस ?

**विमलदेव**—आई ! बाबांचा हा पराक्रम पाहून, माझं अंतःकरण मात्र दुःखानं होरपळत आहे ! बाबांची ही अनावर हौस त्यांच्या राजेपणाला कमीपणा आणणारी नाहीं का ?

**प्रीति**—तुला जरी असं वाटत असलं, तरी स्वारींना यांतच भूषण वाटत आहे !

**शृंगार**—हिचें म्हणणें अगदीं बरोबर आहे ! मला स्त्री होण्यांतच अधिक भूषण वाटत आहे !

**विमलदेव**—तुमच्या ह्या अनावर हौसेमुळं, जगांत तुमची छीःथू होत आहे. बाबा, ही भलतीच हौस सोडून द्या ! कांहींतरी पुरुषार्थ करून, चंपतरायजीं-सारखें राष्ट्रकार्य करा !

**शृंगार**—माझें हें कार्य, सर्व कार्यांपेक्षां श्रेष्ठ आहे ! तुझा हा भलताच उपदेश

ऐकून, मी माझ्या पवित्र कार्यापासून, कधींही निवृत्त होणार नाहीं! विमल, तुला जर पुन्हा मला असा उपदेश करायचा असेल, तर तुला हें माहेर आजपासून बंद आहे!

**विमलदेव**—नामर्द बापाच्या घरीं रहाण्यापेक्षां, मर्द नवऱ्याच्या घरीं राहणें यांतच खरा मर्दपणा आहे! बाबा, तुमचा स्त्रीवेष तुम्हाला लखलाभ असो!

[ राग-खमाज; ताल–त्रिवट.]

**कुलाचा कलंकी खरा ॥ नारीवेषें खुलवी गोपा परीजन खरा ॥ध्रु०॥ कुंकुम भाला कज्जल डोळां ॥ धिक्कारी ही नारी संसारी सारा ॥ १ ॥**

[ रागानें जाते.

**प्रीति**—विमल—विमले! थांब जरा. या आईकडे तरी पहा! [जाते.

**शृंगार**—स्त्रीकरण झालेल्या पतीला सोडून, त्याची पत्नी आणि संतति अशीच निघून जाते. जाऊं द्या! मला या पुरुषी संसाराचा अगदीं कंटाळा आला आहे. कोण हा अरसिकपणा! जनानखान्यांत जाऊन नव्या पद्धतीचा स्त्रीवेष घ्यावा! आणि या अरसिकपणाचें परिमार्जन करावें! [ जातो.

---

## प्रवेश चवथा

[ **स्थळ**—तुरुंग. पात्रें—**छत्रसाल व औरंगजेब.**]

**छत्रसाल**—दिल्लीच्या बादशहानें दगलबाजी करून, मला कैद केलें आहे! उपकारकर्त्यांचा अशा रीतीनें गौरव करणें, ही पद्धत यवनांच्या रियासतींत प्रत्यहीं दिसत आहे. स्वातंत्र्याकरितां अहर्निश झटणारीं माणसें, साम्राज्यशाहीची मदिरा पिऊन धुंद झालेल्या दृष्टीला स्वराज्यद्रोही दिसणार! मी माझ्या मायभूमीकरितां दिल्लीपतीच्या कानांत स्वातंत्र्याचा संदेश सांगितला, त्यानें त्याचें पित्त खवळलें! दिल्लीपतीनें आज जरी मला प्रतिबंधांत ठेविलें आहे, तरी त्याची मला मुळींच पर्वा नाहीं. सत्याचा जय हा केव्हांना केव्हांतरी होतच असतो! त्रिविध जगांत, हक्काच्या लढाईत स्वातंत्र्य हें सत्य आहे! आणि त्या सत्याचा जयजयकार सत्यासत्यतेच य

झगड्यांत केव्हांना केव्हांतरी होतच असतो ! मला असहाय स्थितींत बादशहानें गिरफदार केलें, हा त्याच्या मतानें मोठा पुरुषार्थ झाला असेल; परंतु मर्दांच्या दृष्टीनें त्यानें हा नामर्दपणा केला आहे ! स्वातंत्र्याचा लढा लढणाऱ्यांच्या नशिबीं तुरुंगवास नेहमीं येत असतो ! स्वातंत्र्यवीराला तुरुंग आणि महाल यांत मुळींच तफावत वाटत नाहीं ! बादशहानें आज जरी मला गिरफदार केलें आहे, तरी त्याच्या कपटनीतीचा स्फोट झाल्याशिवाय रहाणार नाहीं !

औरंगजेब—(प्रवेश करून) का छत्रसाल ? तुझ्या वेड्या दिलांतून स्वातंत्र्याचें वेड गेलें कीं नाहीं ? नीट शुद्धीवर ये आणि माझें सार्वभौमत्व कबूल करून, या हालअपेष्टांतून आपली कायमची मुक्तता करून घे. भलत्याच भावनेला बळी पडून, आपलें सोन्यासारखें आयुष्य मातीमोल करूं नकोस !

छत्रसाल—सुवर्णभूमीच्या स्वातंत्र्याकरतां, आयुष्याची माती झाली तरी, त्याची मला पर्वा नाहीं ! बुंदेलखंडाच्या स्वातंत्र्याकरतां, मला मरण आलें तर, त्यांत मला स्वर्गाचा आनंद आहे !

औरंगजेब—स्वर्गाचा आनंद ? मरणांत स्वर्गीय आनंद मानणाऱ्या छत्रसाला, तुझी ही गल्लत आहे ! माझ्यासारखा कर्तुमकर्तुं सम्राट् दिल्लीला जिवंत असतां तुझी स्वातंत्र्याभिलाषा निमिषभरसुद्धां टिकणार नाहीं ! तुला जर स्वातंत्र्य हवें असेल, तर माझें सार्वभौमत्व कबूल कर, म्हणजे तुला मी स्वातंत्र्य देईन.

छत्रसाल—साम्राज्यांतर्गत स्वातंत्र्य हें माझें ध्येय नाहीं ! संपूर्ण स्वातंत्र्य हाच बुंदेलखंडाचा विशेष आहे !

औरंगजेब—तुझा हा विशेष म्हणजे मृगजलांतील नौका आहे !

छत्रसाल—बादशहा, असंभाव्य गोष्टी कधीं कधीं शक्य होतात !

औरंगजेब—नाहीं कोण म्हणतो ?

छत्रसाल—झालें तर मग ! आज माझ्या विशिष्ट गोष्टीची तूं जरी थट्टा आरंभिली असलीस, तरी असा दिवस खात्रीनें उगवेल कीं, तुला कृतकर्माचा पश्चात्ताप होऊन, या आज कैदी असलेल्या छत्रसालाचा तुला गौरव करावा लागेल !

औरंगजेब—आजदेखील मला तसें करतां येईल ! तुझा दुराग्रह सोडशील तर आज या घटकेला मी तुला वजीरउल्मुल्क करीन. छत्रसाल, तुम्ही आम्ही सर्व एक झाल्यावर आणखी काय हवें आहे ?

छत्रसाल—एकी बरोबरीच्याच माणसांत होते. स्वतंत्र आणि गुलाम यांची

एकी होत नाहीं ! तुझ्या एकीची मायावी भाषा म्हणजे आमच्या स्वातंत्र्यापहाराची मधुर मायाविनी आहे ! बादशहा, अन्यायानें प्रतिबंधांत ठेवून, माझीं मतें बदलण्याच्या दुष्टदुष्ट प्रयत्न जरी केलास, तरी तीं कालत्रयीं बदलणार नाहींत. स्वातंत्र्य हेंच माझें जीवन व मरण आहे—

[ राग–देसकार, ताल–त्रिवट. ]

**राष्ट्रमुक्तता जीवन माझें सुखदुःख सारें ॥ परवश जनता सुखा मुके नितांतता ॥ध्रु०॥ परवशतेचा पाश विषाचा मुळीं ना गमतही ॥ नरा विरा सुखान्विता ॥१॥**

**औरंगजेब**—स्वातंत्र्य मागतांना मागणाऱ्यांनीं आपल्या लायकीचा विचार नको का करायला ? शस्त्राची मागणी करणारांनीं, शस्त्र धारण करण्याची आपल्या अंगीं शक्ति आहे किंवा नाहीं, याचा अवश्य विचार केला पाहिजे ! मागणी करतांना लायकी हरदम पाहिली पाहिजे !

**छत्रसाल**—आपल्या पित्याला गिरफदार करून, दिल्लीचें तक्त काबीज करणाऱ्या कृतघ्न मुलानें, तक्तनशीन होतांना, आपल्या लायकीचा विचार केला होता काय ? लायकीची सबब, ही पोकळ सबब आहे ! बुंदेलखंड स्वातंत्र्यालाच काय, पण साम्राज्यालाही लायक आहे !

**औरंगजेब**—बुंदेलाच्या हातीं जर आज स्वातंत्र्याचा ताम्रपट पडला, तर सर्वत्र अंदाधुंदी होऊन तमाम बुंदेलखंडाची बेचीराख होईल !

**छत्रसाल**—परमेश्वरानें सर्व बुंदेलाची काळजी वाहण्याचें काम, तुझ्याकडे सोंपविलेलें नाहीं.

**औरंगजेब**—अलबत ! खुदाचा मला तसा हुकूम आहे ! तमाम जनतेची निगा राखून तिला इस्लामी चांदाखालीं आणणें, ही खुदाची आज्ञा आहे. छत्रसाल, तो निरर्थक वादविवाद नको. तुला थोडी मुदत देतों. त्या मुदतींत विचार कर. आणि आपली मुक्तता कर ! माझें–दिल्लीपतीचें सार्वभौमत्व कबूल कर आणि आपली मुक्तता करून माझी दोस्ती करून घे. जर असाच हट्ट कायम ठेवलास, तर मात्र मी काय करीन आणि काय करणार नाहीं, याचा नियम नाहीं. परवांच्या आंत याचा मला जाब मिळाला पाहिजे ! [ जातो.

**छत्रसाल**—असल्या दडपशाहीनें, मी माझीं मतें बदलीन असें या नीचाला

वाटतें काय? बादशहा! सार्वभौमत्वाच्या वेडानें पछाडलेल्या वेड्या सुलतांना! हा छत्रसाल असा कच्चया दिलाचा नाहीं! मी मरेपर्यंत या तुरुंगांत खितपत पडेन, पण तुझें सार्वभौमत्व कधींही कबूल करणार नाहीं!

**विजया**—(प्रवेश करून) दादा, तुझी बहीण तुझ्या मदतीला तयार असतांना तुझ्यावर अशी पाळी कधींही येणार नाहीं!

**छत्रसाल**—कोण? विजया! आहाहा! परमेश्वरानें खैर केली. पण तूं महोबा-हून थेट येथें कशी आलीस?

**विजया**—औरंगजेबाच्या आवडत्या मुलीच्या कृपेनं, शहाजादीनं मेहेरबानी केली नी मला ही सुसंधि लाभली! शहाजादीनं आपले पूर्व-उपकार लक्षांत घेऊन ही कामगिरी बजावली! आपल्या बापाच्या नकळत तिनं हें कारस्थान केलं आहे!

**छत्रसाल**—शाबास, शहाजादी शाबास! तुझ्या या उपकाराची फेड हा छत्र-साल केल्याशिवाय रहाणार नाहीं!

**विजया**—दादा, आतां मुळींच वेळ गमावूं नकोस! पहारेकरी जागे होण्यापूर्वी आपल्याला येथून कूच केलं पाहिजे. गुप्त रस्त्यावर शहाजादी जातीनं उभी राहिली आहे. आपल्या खासगी लोकांना बरोबर देऊन, तिनं मला इथं पाठविलं आहे! शहाजादीच्या सेवकांनो, करा माझ्या दादाला मुक्त! (शिपाई बेड्या काढतात.)

**छत्रसाल**—शिपायांनो, तुमच्या शहाजादीला माझा सलाम कळवा!

**विजया**—ही खुणेची अंगठी शहाजादीला द्या आणि तिच्या भगिनीचा तिला नमस्कार कळवा.

**शिपाई**—जल्दीसे निकलो. नहीं तो खप्पडखां यहां आजायगा, और सब मामला बिघड जायगा! ये गुप्त रस्तेसे चले जाव!

**विजया**—त्या पहारेवाल्यांवर नजर ठेव! आम्ही या वाटेनं जातों. चल दादा!....लौकर चल!...

**दुसरा शिपाई**—अरे! पकडो—पकडो!

**विजया**—ठेहरो! हरामखोर, ठेहरो!

[ विजया, छत्रसाल व दुसऱ्या बाजूचे शिपाई यांच्यांत लढाई होऊन त्यांना ठार मारून दोघे निघून जातात.]

## प्रवेश पांचवा

[ पात्रें--प्रीति, विमल, शृंगार वगैरे.]

**शृंगार**—कबूल! तुझें म्हणणें सर्वस्वी कबूल आहे! माझें जर स्त्रीकरण तुला कबूल नसेल, तर मी आजपासून त्याला रजा देतों. झालों! प्रीति, आजपासून मी पुरुष झालों, पुरुषोत्तम झालों, नर झालों! निम्में आयुष्य बायकी जगांत घालविलेल्या या शृंगाराचें परिवर्तन झालें. आतां झालें ना तुझ्या मनासारखें? वाटला ना आनंद?

**प्रीति**—आनंद कां बरं वाटणार नाहीं? इकडून लौकर शुद्धीवर येणं झालं! बरं झालं बाई! माय मोहिनी पावली नवसाला!

**शृंगार**—देवी बायकांच्या नवसाला, लौकर पावत असते!

**प्रीति**—आतां नाहींना पुन्हा असले वेडगळ चाळे करणार?

**शृंगार**—नाहीं. मेल्यावर देखील करणार नाहीं! बरें, पण विमलेचें काय करायचें? ओर्छाचें राज्य तर चंपतरायानें खालसा केलें, हिरादेवीनें आपला मार्ग सुधारला. आतां कैलासवासी हिरादेवीच्या इहलोकवासी मुलाचें कसें काय करावें?

**प्रीति**—मला तर तीच काळजी उत्पन्न झाली आहे!

**शृंगार**—अरेरे! काळजीनें तूं अगदीं वाळून कोळ झाली आहेस! भोपळ्या-सारखी तुझी शरीरयष्टि, पण पोरीच्या काळजीनें नुसती चवळीची शेंग झाली आहेस!

**प्रीति**—पुरुषांना बायकांची थट्टा करायची संवयच असते मुळीं!

**शृंगार**—मग काय? पुरुषांनीं पुरुषांची व बायकांनीं बायकांची थट्टा करावी असें का तुला वाटतें?

**प्रीति**—इश्श! भलतंच कांहींतरी बोलायचं झालं!

**शृंगार**—अशी भलत्या थराला गोष्ट नेऊं नकोस!

**प्रीति**—तुम्हांला वितंडवाद घालायची संवयच आहे मुळीं!

**शृंगार**—अग, पण आतां मीं माझ्या सर्व संवयी बदलल्या आहेत. स्त्री-अभिनय, स्त्री-विनय यांना रजा देऊन मी आज मर्दमर्देश्वर बनलों आहें! कर! प्रीति, या परम पुरुषोत्तमाचा जयजयकार कर!

**प्रीति**—पुरुषांनीं पुरुषार्थ केला, तर त्यांचा जयजकार कसला करायचा?

**शृंगार**—मग कुणाचा जयजयकार करायचा?

**प्रीति**—माझा. इकडून माझा जयजयकार केला पाहिजे!

**शृंगार**—तो कां?

**प्रीति**—कां? समजत नाहीं वाटतं? अगदीं दुधखुळेच किनई? अहो, मी तुम्हांला पुरुष बनवलं, तुम्हांला नव्या जगांत आणलं, तुम्हांला ताळ्यावर आणलं! असं असून माझा जयजयकार कां करावा, म्हणून विचारतां? जिभेला कांहीं हाड आहे कीं नाहीं?

**शृंगार**—तूंच मुळीं जीभ सैल सोडली आहेस. स्त्रीला सैल सोडलें, म्हणजे जसा घोंटाळा होतो, तसा जिभेला सैल सोडलें म्हणजे ब्रह्मघोंटाळा होतो. जीभ ताब्यांत तर जग ताब्यांत असें म्हणतात, तें अगदीं खरें!

**प्रीति**—जीभ माझ्या ताब्यांतच आहे!

**शृंगार**—पण माझ्या जिभेचें ताबेगहाण, तुझ्या खातीं जमा झालेलें आहे!

**प्रीति**—हा जमाखर्च राहूं द्या! विमलेचं काय करायचं?

**शृंगार**—आतां तेवढाच प्रश्न आहे!

**विमल**—(प्रवेश करून) बाबा! चंपतरायजींचा तुम्हांला निर्वाणीचा निरोप आहे!

**शृंगार**—त्या राक्षसाची संक्रांत, वळली का माझ्याकडे? काय निरोप आहे बुवा? हा चंपतराय म्हणजे मोठें प्रस्थच आहे!

**प्रीति**—कांहीं घाबरण्यासारखं नसेल!

**विमल**—घाबरणं हा तर बाबांचा, पिढीजाद हक्क आहे!

**शृंगार**—विमल, आतां असं बोललीस, तर मी ऐकून घेणार नाहीं! कारण मी आतां पुरुष झालों आहें! आणि या तुझ्या बापाला तुझ्या आईनें पुरुष बनविलें आहे!

**विमल**—आणि म्हणूनच पुरुष बनलेल्या बाबांनीं, कांहीं तरी पुरुषार्थ गाजवावा म्हणून चंपतरायांनीं आपल्याला लढाईला बोलावलं आहे!

**शृंगार**—लढाई! अरे हें लढाईचें भूत शिरलें कीं महालांत! विमले, चंपत-रायाला सांग, लढाईला बोलावण्यापेक्षां, मेजवानीला बोलवा! लढाईची हौस भागवायची असेल, तर सभाकरणाला आव्हान द्या!

**विमल**—सभाकरण आणि चंपतराय यांचं युद्ध होणारच आहे. बाकीच्या राजांना निर्वाणीचा सन्देश पाठवितांच, त्यांनीं स्वातंत्र्याचा संदेश कबूल करून, ते सर्व चंपतरायाला शरण आले आहेत, आतां तुमचा निकाल बाकी आहे.

**शृंगार**—माझा निकाल! लाव बाळे! तूंच लाव, म्हणजे हिला सती जाण्याची संधी मिळेल!

**प्रीति**—मी नाहीं जायची सती! मला राणीच राहायचं आहे!

**शृंगार**—मग मी एकटाच जाऊं?

**प्रीति**—हं! बेलाशक!

**शृंगार**—अग, इतक्या लांबचा प्रवास मीं एकट्यानें अजून केला नाहीं!

**प्रीति**—संवय झाली म्हणजे अंगवळणीं पडेल!

**शृंगार**—इहलोकवासी प्रीति, शृंगाराला कैलासवासाच्या कायमच्या स्वारीवर पाठवितांना तुझ्या अंतःकरणांतली पार्वती वणवणत नाहीं का?

**प्रीति**—तें पार्वतीला विचारा!

**शृंगार**—कुठें? कैलासाला जाऊनच ना?

**प्रीति**—मग काय? इथंच कैलासवास करतां?

**विमल**—चला बाबा, चट्‌कन् बोला! लढाईला येतां कीं शरण येतां?

**शृंगार**—शरण येतों! साष्टांग नमस्कार घालतों! शरणचिठ्ठी लिहून देतों—

**विमल**—चंपतरायजींच्या स्वातंत्र्य-सन्देशाला कबूल आहांत ना?

**शृंगार**—कबूल! हजार वेळां कबूल!

**विमल**—पहा, फिराल वरं!

**शृंगार**—अलीकडे मी फिरण्याचें आणि फिरवाफिरवी करण्याचें, हिच्या आज्ञेवरून सोडून दिलें आहे!

**प्रीति**—विमल, चंपतरायजींना माझा नमस्कार सांग. स्वारी शुद्धीवर आली असून, ती आपल्या बाजूला आहे, हें कळीव!

**विमल**—ठीक आहे! हें ऐकून चंपतरायजींना, अतिशय आनंद होईल!

**शृंगार**—मलाही मरणानंद झाला आहे!

**प्रीति**—आलेलं मरण शरणावर गेलं, म्हणजे मरणानंद होतो वाटतं?

**शृंगार**—ही आनंदाची शेवटची पायरी आहे!

**प्रीति**—शेवटची घटका नव्हे ना?

**विमल**—आई, जातें मी, चंपतरायजींना मला हा निरोप कळविलाच पाहिजे.

[ जाते.

**शृंगार**—प्रीति, सुटलों या त्रासांतून ! चल, आतां या त्रासाचें परिमार्जन घटकाभर जलक्रीडा करून करूं !

**प्रीति**—चलावं गडे !

**शृंगार**—

[ राग–जीवनपुरी; ताल–त्रिवट. ]

**सुवीर नर सजला ॥ स्त्रैण न उरला ॥ भूषा या मी त्यजिला ॥ ध्रु० ॥ राजा नर मी तूं नृपमहिला ॥ मृदु मंदाकिनी सुरस सारिका ॥ सरिता सरसी विमला काला ॥ १ ॥**

---

## प्रवेश सहावा

[ **स्थळ**—चंपतरायाची छावणी. **पात्रें**—**सभाकरण.** ]

**सभाकरण**—ज्या दिवसाची मार्गप्रतीक्षा करीत होतों, तो दिवस उगवला. आज माझी प्रतिज्ञा मी पुरी करणार ! आजच्या निर्वाणीच्या दिवशीं, चंपतराय तरी जगांतून नाहींसा होईल किंवा हा सभाकरण, आपलें मरण आपल्या डोळ्यांनीं पाहील. अपमानाचा मोबदला, चंपतरायापाशीं मुकाबला करून घेतल्याशिवाय, माझें भडकलेलें मस्तक शांत होणार नाहीं ! अंतःकरणांत पेटलेली सूडाची ज्वाला थंड होणार नाहीं. बुंदेलच्या गृहयुद्धाचा आज शेवटच होणार खास ! दोघांनींही कोणाचें सैन्य आणूं नये, अशी अट आमच्या युद्धांत घातल्यामुळें, एक प्रकारें चांगलें झालें आहे ! दोघां वीरांचा हा संग्राम अपूर्व आहे. आजपर्यंत चंपतराय आणि मी एका बाजूनें परक्याशीं लढत होतों; पण आज दोघांचे दोन पक्ष होऊन आम्ही दोघे परस्परांचे शत्रू झालों आहोंत. आज स्वतःचें घर सुरक्षित ठेवण्याकरतां लढायचें नसून, स्वतःच्या घराची धुळधाण करण्याकरितां लढायचें आहे ! आपसांतील लढाई ही जरी सर्व बाजूंनीं वाईट असली, तरी तें कटुकर्तव्य बजावल्याशिवाय गत्यंतर नाहीं. आजचें युद्ध, बुंदेल्यांच्या इतिहासांत, काळ्या शाईनें लिहिलें जाईल, हें खरें. परंतु क्षत्रियाच्या अपमानाची गोष्ट अशा थराला

अनेक वेळां गेलेली आहे! आज चंपतराय तरी धारातीर्थी पडेल, किंवा सभाकरणाचा देह पवित्र होईल! चंपतरायाला आपण आल्याची बातमी द्यावी. आणि त्याची मार्गप्रतीक्षा करील, ठरलेल्या जागी उभें रहावें! सूडाचा सन्देश वातावरणांत घुमतो कीं स्वातंत्र्याच्या संदेशाचा जयजयकार होऊन, निसर्गांत त्याचा प्रतिध्वनि उमटतो, हेंच पाहिलें पाहिजे!

[ जातो.

चंपतराय—राजे लोकहो! तुमचा गैरसमज दूर झाला, ही अत्यानंदाची गोष्ट आहे. हिरादेवीच्या मसलतीनें तुमचीं मनें कलुषित झालीं होतीं, असें तुम्ही म्हणतां; ती गोष्ट मलाही कबूल आहे. माझ्याविषयीं तुम्हां सर्वांचा गैरसमज झाला होता. परंतु माझ्या पवित्र हेतूंचा जर तुम्हीं शांतपणानें विचार केला असता तर फार बरें झालें असतें! स्वातंत्र्याचा संदेश सर्व बुंदेलखंडाला सांगण्यांत माझा यत्किंचितही स्वार्थ नव्हता. विलासाची, सुखाची प्राप्ति हव्या त्या सुष्टदुष्ट उपायांनीं वाढविण्याकरितां प्रत्येक मानवी मनाची प्रवृत्ति असते. समरकंदाच्या बोटभर राज्यावर संतुष्ट न रहातां, बाबरानें इस्लामी सत्तेची हांव धरून, भारतवर्षांत पाऊल टाकलें. अकबरानें रजपुतांशीं संगनमत करून, रजपुतांच्या आपसांतल्या फुटीची संधी साधून, आपली सर्व सत्ता हिंदुस्थानभर करण्याची हांव धरली आणि आज दिल्लीचा औरंगजेब ह्याच गोष्टीची पुनरावृत्ति करीत आहे. अशा वेळीं आपण जर मतभेदानें आणि मात्सर्यानें वागलों, तर आपलें बुंदेलखंड पारतंत्र्यांत पडल्याशिवाय रहाणार नाहीं. स्वातंत्र्य नष्ट होण्यापेक्षां मरण फार बरें ही रजपुतांची नीति आहे! आपण जर असे निरनिराळे राहिलों, कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं, अशी स्थिति झाली, तर स्वातंत्र्य हरण करायला, इतर शत्रूंना फारसा प्रयास पडणार नाहीं. स्वातंत्र्यसोपानावर चढण्यापूर्वीं, एकीचें सामर्थ्य पटवून देऊन, सर्व जनतेने सुसंघटित व्हावें म्हणून स्वातंत्र्याचा संदेश सांगून सर्वांना स्वातंत्र्याच्या ध्वजाखालीं जमविण्याची मीं आज्ञा केली, यांत माझा कसलाही स्वार्थ नव्हता!

पहिला राजा—चंपतरायजी! आम्ही राजे, म्हणजे नांवाचे राजे! खंडणी देणें हेंच आमचें कर्तव्य! तेव्हां तुम्हांसारख्यांची मुत्सद्देगिरी आम्हांला येणार कोठून? बाकी कांहीं जरी असलें, तरी आतां आम्ही तुमच्या बाजूला झालोंच आहोंत!

दुसरा राजा—आम्हांला काय, कुणाच्या तरी पुढारीपणाखालीं रहायचें, तुमच्याच राहूं! स्वतंत्र वागणें आमच्या पचनीं पडत नाहीं!

**तिसरा राजा**—माझेंदेखील यांच्याच मताप्रमाणें, मत आहे. आतांपर्यंत मला स्वतंत्रपणें मत देण्याची पाळी आली नाहीं !

**विमल**—(प्रवेश करून) चंपतरायजी ! धारीरचे राजे शृंगार आपल्या निशाणाखालीं यायला तयार आहेत.

**चंपतराय**—एकट्या सभाकरणाशिवाय बाकीचे सारे राजे, माझ्या निशाणाखालीं जमले ही आनंदाची गोष्ट होय ! आतां औरंगजेबापेक्षां बलाढ्य शत्रु जरी आला तरी त्याची पर्वा नाहीं !

**पहिला राजा**—तुमच्यासारखे लढवय्ये असले म्हणजे, आम्हांला कसलीचं काळजी नाहीं.

**चंपतराय**—तुमच्या पाठिंब्यावरच सर्व यश अवलंबून आहे !

**दुसरा राजा**—यशाकडे माझी नेहमींच पाठ असते !

**तिसरा राजा**—यशवंताच्या पाठीमागून जाणे हेंच तर माझें ब्रीद आहे !

**पहिला राजा**—दुसऱ्याचा विजय तोच आमचा विजय, असें आमचें विजयी तत्त्व आहे !

**विमल**—तुमच्यासारखे मांडलिक या बुंदेलखंडांत आहेत, हें त्याचे नशीबच म्हणायचें !

**पहिला राजा**—आम्ही सारे भाग्यवान् आहोंत !

**चंपतराय**—असो. राजेलोकहो, तुमचें एकवार पुन्हा अभिनंदन करून तुम्ही स्वातंत्र्याच्या सन्देशाला मान दिलात, याचा पुनर्निर्देश करून, तुमची परवानगी मागतों. सभाकरणाची द्वंद्वयुद्ध करण्याची वेळ नजीक आली आहे !

**राजा पहिला**—तर मग आम्हांला आमचे महाल अगोदर गांठले पाहिजेत. येतों आम्ही. [ जातात.

**चंपतराय**—गृहयुद्धाचा आज शेवट होणार, यांत शंका नाहीं. सभाकरणासारख्या शूरवीराला बुंदेलखंड मुकणार ! हें त्याचें एक प्रकारचें नुकसानच होय !

**सभाकरण**—चंपतराय ! वेळ झाली आहे ! काय विचार ठरला ?

**चंपतराय**—विचाराला आतां अवसर कसला ? एकदां बोललों तेंच शेवटपर्यंत ! तूं युद्धाचें आव्हान दिलेंस, त्याचवेळीं मीं त्याचा स्वीकार केला आहे ! त्यापासून, तूं एक वेळ परावृत्त होशील, परंतु मी केव्हांही होणार नाहीं !

**सभाकरण**—हा सभाकरण आपल्या प्रतिज्ञेपासून ढळेल, हीच कल्पना

सपशेल चुकीची आहे! प्रतिज्ञेपुढें मुलांबाळांचीं बंधनें तुच्छ आहेत! दोस्तांच्या दोस्तीची किंमत नाहीं. प्रतिज्ञापूर्ति हाच माझा उद्देश! सूडाचा सन्देश हाच माझा निर्वाण! आणि अपमानाचा मोबदला, हेंच माझें जीवितसाफल्य!

**चंपतराय**—दुर्दैव बुंदेलखंडाचें! म्हणून दोन दोस्तांत शौर्याची स्पर्धा लागली आहे! तुझ्या मनानें तसेंच घेतलें असेल तर, त्याला मी तरी काय करणार?

**सभाकरण**—सैन्याची अट!

**चंपतराय**—किती भीरु अंतःकरण आहे तुझें! अरे, तुझ्यासारख्या मशकाला, यमसदनाला पाठवायला सैन्य! हा चंपतराय जरी वृद्ध असला, तरी तुझ्यासारख्या शंभर मशकांना चुटकीसरसा चुरडून टाकायची ताकद याच्या कणखर मनगटांत आहे!

**सभाकरण**—मी कांहीं हातांत बांगड्या भरून आलों नाहीं! उगीच वायफळ बटबट कशाला? चल, तयार हो! तुझें रक्त प्राशन करण्याकरतां, माझी तरवार आतुर झाली आहे!

**दलपत**—(प्रवेश करून) आणि माझी तरवार, तुमचें रक्त प्राशन करण्याकरितां सारखी वाट पहात आहे! चंपतरायाचें रक्त तुमच्या तरवारीला लागण्यापूर्वी माझी तरवार तुमच्या रक्तानें न्हाली पाहिजे!

**सभाकरण**—चंपतरायाच्या अगोदर मी तुझ्याशीं लढायला तयार आहें, परंतु मीं अगोदर आव्हान दिलें आहे!

**चंपतराय**—दलपत, शांत रहा. माझें आव्हान मीं जर पुरें केलें नाहीं, तर माझ्या बाणेदारपणाला कलंक लागेल!

**दलपत**—पण माझी प्रतिज्ञा जर पुरी झाली नाहीं तर, माझ्या प्रतिज्ञेचा भंग होईल! ते कांहीं नाहीं! मी माझी प्रतिज्ञा पुरी करणार!

**चंपतराय**—माझें आव्हान अगोदर पूर्ण झालं पाहिजे!

**दलपत**—तुमचं आव्हान नंतरचें आहे! पण माझी प्रतिज्ञा पूर्वीची आहे! चंपतरायजी, मला माझी प्रतिज्ञा पुरी केली पाहिजे!

**विजया**—( प्रवेश करून ) दलपत! अजून तुमची प्रतिज्ञा पुरी झाली नाहीं! दादासह मी दिल्लीहून परत येण्यापूर्वी, तुमची प्रतिज्ञा पुरी व्हायची होतीना? मी दिल्लीहून परत आलें, तरी कांहीं अद्याप तुमची प्रतिज्ञा पुरी झाली नाहीं!

**चंपतराय**—छत्रसाल दिल्लीहून परत आला?

**सभाकरण**—( स्वगत ) अनायासें हेंही ठीक झालें. चंपतरायाबरोबर छत्रसालाचाही निकाल लावून टाकावा !

**विजया**—शहाजादीच्या साहाय्यानें दादाची मुक्तता झाली !

**दलपत**—औरंगजेबाच्या मुलीनें ?—

**चंपतराय**—दलपत, शहाजादीचा छत्रसालावर, फार दिवसांचा लोभ आहे !

**दलपत**—बाबा ! अगोदर माझ्याशीं लढा. माझी प्रतिज्ञा पुरी झाली पाहिजे !

**चंपतराय**—मोठा पेंच पडला आहे !

**छत्रसाल**—( प्रवेश करून ) दलपत ! प्रतिज्ञा पुरी कर !

**विजया**—दलपत ! मघांच्या वाणीची आठवण आहे ना ?

**दलपत**—बाबा ! चला व्हा तयार !

[ दलपत व सभाकरण लढतात; दलपत सभाकरणाला मारतो.]

**चंपतराय**—शाबास ! दलपत, शाबास !

**दलपत**—झालीना माझी प्रतिज्ञा पुरी ?

**छत्रसाल**—सभाकरणाचें मरण, तुझ्या तलवारीवर लिहिलें होतें, हें खरें ! बाबा, या वीराची व्यवस्था केली पाहिजेना ?

**चंपतराय**—हो, अवश्य केली पाहिजे ! कसा झाला तरी तो वीर आहे ! दलपत, सभाकरणाची व्यवस्था कर.

**दलपत**— ठीक आहे !

**चंपतराय**—छत्रसाल, चल बेटा ! [ जातात.

---

# प्रवेश सातवा

**विजया**—( प्रवेश करून ) आज बुंदेलखंडांतल्या गृहयुद्धाचा शेवट झाला. बाबांचा नी दादांचा मार्ग निष्कंटक झाला ! स्वातंत्र्याचा सन्देश आतां सर्व बुंदेलखंडभर पसरल्याशिवाय राहणार नाहीं. आपसांतील फूट, आपसांतील मत्सर आज तात्पुरता तरी नाहींसा झाला. दलपतनें आपली प्रतिज्ञा पुरी केली ! आहाहा ! आजचा सुवर्णदिन, आजचा आनंदीआनंद अपूर्व होय ! बुंदेलखंडांत आज आनंद झाला असेल. आपसांतल्या वैरभावाला तिलांजली दिली म्हणून ही सृष्टी-

सुंदरी देखील आनंदानं वागडत आहे. आकाशांतल्या तारका आनंदाश्रु ढाळीत आहेत. तारकांनो! रजनीकांताच्या प्रेमळ सहवासांत रहाणाऱ्या तारकांनो, तुमचा आनंद तोच माझा आहे. कोणत्याही कार्याचा प्रारंभ करणं कठीण असतं! अडचणीचं असतं; पण शेवट मात्र गोड होतो. प्रारंभीं कठीणतर वाटणारा माग धैर्यानं नी धडाडीनं यशस्वी होतो. बाबा आज तसेच यशस्वी झाले आहेत! आज मला त्यामुळं आनंद झाला आहे. मात्सर्याचे ढग बुंदेलच्या व्योमांतरानं पार नाहींसे झाले आहेत! आहाहा! आज जसं हें आकाश निरभ्र दिसत आहे, तसंच बुंदेलखंड निरभ्र दिसत आहे. निसर्गापासून पुष्कळ शिकतां येण्यासारखं असतं म्हणतात, तें हेंच! आकाश निरभ्र, बुंदेलखंड निरभ्र; तारका आनंदित तर सर्व जनता आनंदित! मला तर आज हा अपूर्व आनंद अननुभूतच वाटतो आहे!

[ राग–भैरवी. ]

**नभीं उदेला स्वातंत्र्यकेसरी । दुरावला अरी वन्ही**
**आसुरी । मुदित सुजन गमला ।। रिझाला देशव्रता**
**शुभ योगाला ।। उदित आशा माधुरी ।। १ ।।**

अगबाई! मी या आनंदांत, दादाच्या राज्यारोहणाचं विसरलेंच! बाबा माझी मार्गप्रतीक्षा करीत असतील अगदीं! [ जाते.

---

# प्रवेश आठवा

[ **स्थळ**—महाल-राज्यरोहण. चंपतराय, सर्व राजे, शृंगार, छत्रसाल
वगैरे सर्व, प्रीति, विमल, विजया, स्त्री-पुरुष
सरदार, बसलेले आहेत.]

**चंपतराय**—राजे, आणि सरदार लोकहो! प्राणनाथ प्रभूंच्या आज्ञेनें, आज मोहबाच्या तक्तावर, मी माझ्या लाडक्या छत्रसालाला बसवीत आहें! गृहयुद्धाचा शेवट झाल्यावर, छत्रसालाचें राज्यारोहण करायचें होतें. गृहयुद्धाचा शेवट होऊन, आज तो मंगल प्रसंग आला आहे. आज आपण बेकीचें बलिदान केलें आहे. बेकीचें बलिदान हाच पराक्रमाचा पाया होय. पारतंत्र्यांत खिचपत पडलेल्या

राष्ट्राला स्वातंत्र्य संपादन करावयाचें असेल तर त्यानें ऐक्यबन्धनाचा-पराक्रमाचा पाया मजबूत केला पाहिजे. तुम्ही सर्वांनीं आज असा मंगल प्रसंग आणून दिलात, याबद्दल मी तुमचा फार आभारी आहे माझ्या जागीं छत्रसाल आहे. मला आपण जशी मदत केली, त्याप्रमाणें याला कराल अशी उमेद आहे !

शृंगार—छत्रसाल आणि चंपतराय यांत आम्ही मुळींच फरक मानीत नाहीं.

पहिला राजा—मी या बाकीच्या राजांच्या वतीनें, असें जाहीर करतों कीं, आम्ही सर्वजण महाराज छत्रसाल यांना, हवी ती मदत करायला तयार आहोंत.

छत्रसाल—तुम्हां साऱ्यांच्या मदतीवरच मी स्वातंत्र्याची लढत लढणार आहें. आजच्या दरबारांत तुम्हां साऱ्यांच्या वतीनें, दोन महत्त्वाच्या गोष्टी उरकून घ्यावयाच्या आहेत ! सागरच्या गादीवर दलपतना बसविणें व ओरछाचें राज्य खालसा करणें !

शृंगार—ओरछाचें राज्य खालसा करण्यापेक्षां, विमलेचें लग्न ज्याच्याशीं होईल त्याला तें बक्षीस म्हणून द्यावें !

चंपतराय—महाराज शृंगार राजाचें म्हणणें कबूल आहे !

छत्रसाल—मी तुम्हां सर्वांच्या बाहेर मुळींच नाहीं. तसेंच दलपतजींनीं आपली प्रतिज्ञा पुरी करून, गृहयुद्धाचा शेवट केला, म्हणून मी माझी लाडकी ताई, त्यांना अर्पण करतों. ताई ये, अशी इकडे ! दलपतजी, या वीरकुमारीचा स्वीकार करा.

दलपत—असल्या जवाहिराचा स्वीकार मी कसा बरें करणार नाहीं ?

शृंगार—माझी विमल महाराजांना अर्पण करण्याचें मीं ठरविलें आहे ! छत्रसालमहाराज ! माझ्या विमलचा स्वीकार करा !

बिजया—दादा ! माझ्या मनांतलीच गोष्ट शृंगारराजांनीं केली !

चंपतराय—छत्रसाल, कर ! या विमलचा स्वीकार कर.

शृंगार—विमल, ये इकडे.

[ छत्रसालच्या हातांत विमलचा हात देतो. ]

सर्व राजे—महाराज छत्रसाल यांचा विजय असो !

विजया—दादा, ज्या विंध्यवासिनीच्या कृपेमुळें, सर्वत्र आनंदीआनंद झाला तिच्या चरणीं कृतज्ञतेचें पुष्प वाहून आनंदवर्धन करूं व इच्छित दर्शवूं !

छत्रसाल—पराक्रमाचा पाया हीच हिंदमातेची जयश्री आहे.

## प्रार्थना

सुजन सुगण, जन सुमन विमल मानसीं करि सुगान ॥
सुखानंद लाभो पुरवो ॥ अघही सकल स्वजनीं ॥ध्रु०॥
परवशता तिमिर जावो । जनसत्ता उदित होवो ।
नुरवो दमननीति शुभचित्ता ॥ परसत्ता, विधाता, ।
अभंगा सदा दे ॥ चरणीं नमुनी प्रणती ॥ १ ॥

अंक तिसरा समाप्त

संपूर्ण

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ........ नों. दि ........
वि. ....नाटक.... क्र. ........
IRBK-0100880